# १

# सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन :

१.२.१ आधुनिक साहित्याचा कालखंड

१.२.२ आधुनिकता आणि मराठी साहित्य

अ) सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य – मागोवा

ब) साहित्य समाज संबंध –

१.२.३ ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप-शरदचंद्र मुक्तिबोध

१.२.४ ललित वाङ्मय आणि भाषा

१.२.५ 'जाणीव'- व्यक्ती आणि समाज

१.२.६ साहित्य, समाज आणि क्रांती - डॉ.म.ना.वानखडे

१.३ समारोप

१.४ प्रश्न

१.५ संदर्भ

अ सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य - मागोवा

ब) साहित्य समाज संबंध –

१) ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप शरच्चंद्र मुक्तिबोध (साहित्यविचार आणि समाजचिंतन)

२) दलित जाणिवेचे स्वरूप - म.ना वानखडे (दलितांचे विद्रोही वाङ्मय) या लेखांच्या आधारे

munotes.in

## १.० उद्दिष्ट्ये

- तेन आणि मार्क्स यांच्या साहित्य-समाज संबंधाच्या भूमिकेचे मराठी साहित्याच्या इतिहासाच्या अनुषंगाने आकलन करून घेणे.
- मराठी साहित्य निर्मितीच्या प्रेरणा आणि समकालीन सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी समजून घेणे
- शरच्चंद्र मुक्तिबोध आणि म.ना वानखडे यांच्या लेखांच्या आधारे ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे आणि दलित जाणिवेचे स्वरूप उलगडून घेणे.

### अ) सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य – मागोवा

## १.१ प्रस्तावना

मराठी साहित्याच्या इतिहासाचे कालखंडदृष्ट्या प्राचीन -आधुनिक आणि नवयुग असे तीन टप्पे दाखवता येतील .

प्राचीन साहित्याचा कालखंड हा चौदावे शतक ते अठरावे शतक असा चार शतकांचा मानला जातो. यात संतांची अभंगवाणी, पंडित कवींचे आख्यानपर, महाकाव्यात्म स्वरूपाचे साहित्य. शाहिरी कविता आणि राजकीय, सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब असलेले बखर वाङ्मय अशा त्रिविध प्रवाहातील साहित्यनिर्मिती दिसते. मुद्रणकलेच्या उदयापूर्वीच्या मौखिक आणि हस्तलिखित अशा साहित्य प्रकाशनाचा हा कालखंड होता. त्यामुळे कीर्तन, लोककलेच्या, रंजनाच्या माध्यमातून साहित्याचे प्रकाशन आणि प्रसार होत असे. मराठी साहित्याच्या पहिल्या कालखंडात 'कविता' हा साहित्य प्रकार प्रभावी ठरला. संत साहित्याने अभंगरचनेच्या आधारे आपली एक स्वतंत्र, प्रदीर्घ परंपरा निर्माण केली. या संतकवितेचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला तर संत तुकारामांची कविता कळस झाली. संतकाव्याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिने मराठीत आत्मनिष्ठ काव्याची परंपरा निर्माण केली. वर्णनपर, स्तुतिपर अशी आध्यात्मिक कवितेला छेद देऊन उत्कट, उत्स्फूर्त असा भावनेचा आविष्कार निर्माण केला. धर्म, पंथ, लिंग असे भेद न मानता प्रत्येक व्यक्तीसाठी हा अभंगकाव्याचा मार्ग खुला झाल्यामुळे विठ्ठल प्रेमाचा, भक्तीचा सहज आविष्कार अभंगांतून झाला. सामान्यांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळवून देणे, लोकवाङ्मयाला प्रतिष्ठा मिळवून देणे हे संतकवितेचे कार्य लक्षणीय आहे.

पंडिती आख्यानकाव्याची परंपरा महानुभावीय साहित्यापासून ते एकनाथी काव्यापर्यंत दिसते. महानुभाव साहित्य पंथीय निष्ठेला महत्त्व देते. त्यामुळे श्रीकृष्णचरित्रविषयक काव्यात संस्कृत महाकाव्याच्या आदर्शाचे अनुकरण आणि उपदेशपरता, पांडित्यप्रदर्शन अधिक दिसते. किंबहुना पांडित्यप्रदर्शन आणि कलाविलास हे या पंडिती काव्याचे विशेष आहेत. ज्याच्याशी सर्वसामान्य जनता फारसे नाते साधू शकली नाही. अक्षरगण वृत्तात्मक श्लोकरचनेच्या बंधनात ही कविता अडकली. अध्यात्म, भक्ती, विनोद यांचा सुंदर मिलाफ आपल्याला एकनाथी आख्यानकाव्यात पहायला मिळतो. या आख्यानकाव्यातून प्रत्यक्ष लौकिक वास्तव, सामान्य माणसाचे अनुभव कधी व्यक्त होऊ शकले नाहीत. प्राचीन मराठी साहित्यात 'बखर' हा गद्यात्मक वाङ्मय प्रकार आढळतो. या साहित्यप्रकाराने इतिहास

munotes.in

आणि कल्पिताचे सुरेख मिश्रण साधले होते. १४४८ मध्ये लिहिलेल्या 'महिकावती'च्या बखरीने जो महाराष्ट्रधर्म रुजवला तो १६५० ते १८०० या स्वराज्याच्या काळात विकसित होत गेला. यामुळे बखरी, पोवाडे, रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथांची रुपांतरे निर्माण झाली. संत रामदासांनी राष्ट्रवादी जाणीव आपल्या साहित्यातून रूजवली.

शाहिरी कविता ही राजाश्रयावर टिकून राहिलेली होती. ढासळत्या राजकारणाचा प्रत्यक्षा प्रत्यक्ष असा परिणाम तिच्या स्वरूपावर झाला. शृंगार, वीर, रसांनी युक्त अशी ही रंजनप्रधान रचना होती; जिला वाङ्मयीन, सामाजिक प्रतिष्ठा मिळाली नाही. पुढे पेशवाईसोबत या काव्याचा प्रवाहही क्षीण झाला. या शाहिरी जानपद कवितेतून मराठी कवितेच्या विकासाच्या टप्यामध्ये महत्त्वाचा असा 'बहिर्मुख' वृत्तीचा विकास झाला आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ आधुनिक साहित्याचा कालखंड –

साहित्याच्या जडणघडणीवर 'काळ' फार परिणाम घडवित असतो.जसा काळ बदलत जातो त्याप्रमाणे भोवतालचे सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण बदलत जाते. याचा परिणाम समकालीन माणसांच्या जीवनजाणिवांवर होत असतो. असे भौतिक, सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतर साहित्याच्या निर्मिती, आस्वादावर प्रभाव टाकते. उदाहरणार्थ चौदाव्या शतकातील धार्मिक अस्थिरता, कर्मकांडांचे वाढते महत्त्व यासाठी धर्मजागरणाच्या हेतुतून प्राचीन संत कवितेची रचना झाली. ज्यामुळे साहित्य लोकाभिमुख झाले, अनेक लोकवाङ्मयातील रचनाबंधांना वाङ्मयीन प्रतिष्ठा प्राप्त झाली.

असेच एक स्थित्यंतर १९ व्या शतकात घडले. वसाहतवादी इंग्रजी राजवटीने आणलेल्या सार्वत्रिक शिक्षणामुळे महाराष्ट्रात एका प्रबोधनयुगाला सुरुवात झाली. नवशिक्षित तरुणांची स्पेन्सर, मेकॉले या पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारांशी ओळख झाली. स्वातंत्र्य-समता बंधुता या मूल्यत्रयींबाबत विश्वास निर्माण झाला, ज्यामुळे एक सामाजिक सांस्कृतिक जनजागरण निर्माण झाले. जुन्या रूढी-परंपरा, कालबाह्य वाङ्मयाचा पुर्नविचार सुरू झाला. स्त्री शिक्षण आणि सामाजिक रूढी परंपरांना नकार देत आचार -विचारातील नवता व्यक्त होऊ लागली. नवे साहित्य, नवे काव्य-साहित्यविषयक संकेत निर्माण होत गेले. या सगळ्या संस्कारांतून 'आधुनिक' साहित्याची रचना झाली.

इंग्रजी शिक्षणासोबतच मुंबई विद्यापीठाची स्थापना आणि मुद्रण कलेचा शोध ज्यामुळे नियतकालिकांची निर्मिती होणे या घटना आधुनिक वाङ्मयाच्या निर्मिती, वाढ-विकासाला पूरक ठरल्या. याच कालखंडात मराठी साहित्यातील निबंध, कथा, कविता आणि समीक्षाविचार या साहित्यप्रकारांची पायाभरणी झाली. १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' हे मराठीतले पहिले नियतकालिक प्रसिध्द केले. त्यानंतरच्या सत्यकथा (१९३३) ज्ञानोदय (१८४२), ज्ञानप्रकाश (१८४९), विविध ज्ञानविस्तार (१८६७), करमणूक (१८९०) मनोरंजन (१८९५), रत्नाकर (१९२५ ) अशा नियतकालिकांच्या विस्तारात मराठी साहित्याचा विकास आपल्याला दिसतो. सुरुवातीला कविता, कथा आणि निबंध या साहित्यप्रकारांमधून भाषांतरित साहित्याची निर्मिती झाली. मराठी कविता इंग्रजी साहित्याच्या परिशीलनातून वेगळ्या आशयाविष्काराला सामोरी जात होती. विष्णु- मोरेश्वर

महाजनी यांचा 'कुसुमांज्जली' हा भाषांतरित काव्यसंग्रह आणि महादेव-मोरेश्वर-कुंटे यांचा 'राजा शिवाजी' या काव्यातील प्रयोगशीलतेतून नवे बदल, नव्या जाणिवा दृढ झाल्या आणि केशवसुतांच्या कवितेतून त्या प्रभावीपणे व्यक्त होऊ लागल्या. वाङ्मयेतिहासात १८८५-१९२० या कालखंडाला 'केशवसुत कालखंड' म्हणतात. इतका केशवसुतांच्या कवितेचा या कालखंडावर प्रभाव पडला. त्यांचा 'केशवसुत संप्रदाय' निर्माण झाला. केशवसुतांच्या कवितेने मराठी काव्यात जी नवता आणली, त्यामागे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील वाङ्मयीन, सांस्कृतिक घडामोडी कारणीभूत होत्या. केशवसुतांच्या कवितांप्रमाणे हरी नारायण आपटे यांच्या कथा आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, महात्मा फुले यांनी आपल्या निबंधामधून आधुनिक जीवनमूल्ये रुजवली.

### १.२.२ आधुनिकता आणि मराठी साहित्य -

१८७४ ते १९२० हा कालखंड मराठी साहित्यात आधुनिक कालखंड म्हणून ओळखला जातो कारण आधुनिक विचारसरणीची मूल्ये या काळातील साहित्यातून आविष्कृत झाली. स्त्रीविषयक सुधारणा ,रूढी-परंपरांना नकार, सामाजिक न्यायाची आस, बंडखोरी आणि समाज परिवर्तनाची आस याबरोबरच राष्ट्रवादी, पुनरुज्जीवनवादी जीवनजाणिवांनी हा कालखंड भारलेला दिसतो. ज्याचे प्रतिबिंब मराठी निबंध, कविता आणि ऐतिहासिक कादंबरीमधून पडलेले दिसते. लोकमान्य टिळक आणि शि.म.परांजपे यांच्या निबंधात प्रखर राष्ट्रवाद दिसतो. कवी गोविंद आणि वि.दा.सावरकर यांच्या कवितांमधून आणि कृ.प्र.खाडीलकर यांच्या नाट्यरचनेतून राष्ट्रवादाची जाणीव प्रभावीपणे व्यक्त होते तर गो.ग.आगरकर यांच्या सुधारणावादी विचारपरंपरेचा संस्कार हरी नारायण आपटे, गो.ब.देवल यांच्यावर झालेला दिसतो. मुक्तामाला, मंजुघोषा अशा अद्भुतरम्य कादंबऱ्यांपासून ते ‘यमुना पर्यटन’ आणि ‘पण लक्षात कोण घेतो?’, असा वास्तववादी, सामाजिक कादंबरीचा प्रवास या काळात दिसतो.

१९२० ते १९६० पर्यंतचा काळ हा महात्मा गांधीच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचा आणि नेहरू युगाच्या उदयाचा होता. इंग्रजी वसाहतवादी राजसत्तेशी संघर्ष अधिक तीव्र झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्याला गती देणारा असा हा कालखंड म्हणता येईल. राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक न्याय, बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी कृतिशील झालेला समाज या कालखंडात दिसतो. कामगार चळवळ आणि शेतकऱ्यांची आंदोलने यांना सुरुवात झाली होती. लोकशाही, उदारमतवाद, स्त्रीपुरुष समानता, व्यक्तिस्वातंत्र्य या नव्या मूल्यांच्या संस्कारातून एक सुधारणावादी नवसमाज आकार घेत होता. या समाजमनाचे नेतृत्व राजकीय दृष्ट्या यामुळे विवाहसंस्था, स्त्री-पुरुष संबंध, कुटुंब पद्धत, मध्यमवर्गीय संस्कृती यांबाबत स्थित्यंतर दिसून येते. बदल, परिवर्तनाची ही लाट साहित्यविश्वातही ‘आधुनिकता’ रुजवत होती. विविध सामाजिक आणि वाङ्मयीन प्रश्नांवर विचारमंथन करणारी अशी नियतकालिके छापली जात होती ज्यांचा मराठी मन आणि साहित्याच्या जडणघडणीत प्रत्यक्ष सहभाग होता. यात रत्नाकर, यशवंत प्रतिभा यांचा उल्लेख करता येईल. या काळातील नवमतवाद हा मध्यमवर्गीय जीवन जाणिवा आणि स्त्रीपुरुष नातेसंबंधाच्या चित्रणातून व्यक्त होतो. विभावरी शिरुरकर, श्री.व्यं.केतकर, पु.य.देशपांडे, वा.म.जोशी यांच्या कादंबऱ्या उदाहरणादाखल सांगता येतील. गांधीवादी आणि साम्यवादी विचारसरणीचे दर्शन पु.य.देशपांडे, भा.वि.वरेकर आणि साने गुरुजी यांच्या साहित्यातून

घडते. ना.सि.फडके आणि वि.स.खांडेकर, पु.भा.भावे या कादंबरीकारांनी समाजवास्तव आदर्शवादी, रोमँटीक कला जाणिवेतून मांडले. खांडेकरांनी प्रबोधन, जीवन मूल्यांचा संस्कार करणाऱ्या कथा-कादंबऱ्या लिहिल्या. मर्ढेकरांच्या 'रात्रीचा दिवस', 'पाणी' आणि 'तांबडी माती' या कादंबऱ्या आधुनिकतेने निर्माण केलेल्या समस्यांवर भाष्य करतात. नव्या भांडवलशाही व्यवस्थेने माणसाचे क्षुल्लक होत जाणे, माणसाचे एकाकी होत जाणे हा आशय त्यांच्या कादंबरीतून जसा साकारला तसा तो कवितेतूनही व्यक्त होताना दिसतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विफलता आणि नैराश्याच्या भावामुळे कलावंत मन मानवी अस्तित्वाविषयीच्या चिंतनाला, परात्मतेच्या जाणिवेला सामोरे जाऊ लागले.

१९६० नंतर ग्रामीण-नागर अशा प्रादेशिक अवकाशात आणि दलित तसेच स्त्री विषयक जाणीवेत स्थित्यंतर घडून आले.१९६० नंतरचे साहित्य हे ग्रामीण, दलित आणि स्त्री यांच्या अस्मितेचे, आत्मभानाचे आणि एकूणच सांस्कृतिक, वाङ्मयीन बंडखोरीचे होते.१९५० नंतर लोकशाहीची प्रस्थापना झाली. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती चीनचे आक्रमण (१९६२), बांगलादेशचे युद्ध (१९७१), अणीबाणी (१९७५), अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी संघर्ष, नामांतराची चळवळ, युक्रांद, दलित पँथर, साम्यवादी क्रांती अशा युवा चळवळीं यांनी गजबजलेला, अतिशय उलथापालथीचा असा हा कालखंड होता. या काळातील बंडखोर, संतप्त पिढीने सामाजिक, राजकीय अधिसत्तेला जशी धडक दिली तशीच लघुअनियतकालिकांच्या चळवळीतून प्रस्थापितांच्या वाङ्मयीन परंपरेलाही धक्के दिले. यातून १९६० नंतर मराठी कवितेच्या क्षेत्रात वाङ्मयीन स्वरूपाचे स्थित्यंतर घडून आले, जिने आधुनिकवादी जाणिवांना गतिशील केले अस्तित्ववादी जीवनसंवेदना मृत्यूविषयीचे चिंतन, महानगरीतील माणसाची होणारी कुचंबणा, त्याचे नगण्यपण, युध्द -हिंसा यांमुळे निर्माण होणारी भयग्रस्तता, एकूणच सार्वत्रिक अर्थशून्यता, नातेसंबंध आणि जगण्यातील घुसमट व्यक्त करणारी अशी साठोत्तरी आधुनिकवादी कविता दिसते. काम्यू, काफ्का, सार्त्र यांनी या साठोत्तरी कविसंवेदनेला आकार दिला. मर्ढेकर युगातील सौंदर्यवादाला नकार देऊन जीवनाच्या असंबद्धतेला शब्दबद्ध करणारी, परमशक्तीला सर्वंकष नकार देणारी किंवा पाखंडीपणाचेच आध्यात्म मांडणाऱ्या या आधुनिकवादी कवितेची धुरा सदानंद रेगे, दिलिप पुरुषोत्तम चित्रे विलास सारंग यांनी वाहिली. भालचंद्र नेमाडे, किरण नगरकर, ए.वि.जोशी, कमल देसाई यांनी मराठी कथा-कादंबरीच्या क्षेत्रात प्रस्थापित संकेतव्यूहाची मोडतोड केली. प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके, नीरजा, मलिका अमरशेख, प्रज्ञा पवार, यांची पिढी घडत होती लिहित होती

१९८० नंतरच्या जागतिकीकरणाच्या भौतिक बदलांनी सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराला चालना दिली. उत्तर आधुनिक जीवनजाणीव आकार घेऊ लागली. देशीवाद, संज्ञा प्रवाही, अतिवास्तववादी असे साहित्यप्रवाह साहित्यातील आशय आणि अभिव्यक्तीला प्रयोगशीलतेने घडवीत होते.दुसरीकडे विकासाच्या पंचवार्षिक योजनांनी आणलेल्या बदलांचे विश्लेषण आणि परिणामांची झळ व्यक्त करणारे वास्तव व्यक्त होत होते. साहित्याचे स्वरूप केवळ कलावादी न राहता, बदलांसाठीचे मुखपत्र होऊ लागले. ग्रामीण कादंबरी जागतिकीकरणाने मोडलेला खेड्यांचा कणा, पर्यावरण ऱ्हास, शेतीची नासाडी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा प्रश्नांना साहित्यातून वाचा फोडू लागले. दलित, आदिवासी, स्त्री साहित्य सामाजिक न्याय आणि समता या हक्कांविषयी सजग झाली. भुजंग मेश्राम, अरुण काळे, प्रवीण दशरथ बांदेकर, प्रिया तेंडूलकर, कल्पना महाजन, महेश एलकुंचवार,

जयंत पवार असे लेखक आपल्या साहित्यातून समाज संबद्धता बाळगतात आणि लेखक म्हणून सामाजिक जबाबदारी, बांधिलकी किंवा सामिलकी याचा प्रत्यय देत राहतात.

उपरोल्लेखित विवेचन हे मराठी साहित्याच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा एक धावता आलेख मांडण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेने प्रकाशित केलेल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या खंडांचे वाचन करावे. तसेच विशिष्ट कालखंड आणि विशिष्ट साहित्यप्रकाराचा ऐतिहासिक विकासक्रम मांडणाऱ्या ग्रंथांचा विद्यार्थ्यांनी संदर्भासाठी अभ्यास करावा.

मराठीमध्ये 'साहित्य आणि समाज' यांच्यातील परस्पर संबंधाच्या अनुषंगाने अनेक मान्यवर समीक्षकांनी आपली भूमिका मांडली आहे.

- **ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप-शरदचंद्र मुक्तिबोध**

शरदचंद्र मुक्तिबोध यांनी मार्क्सवादी मूल्यदृष्टीच्या आधारे आपले विचार मांडले आहेत. ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप या लेखात त्यांनी साहित्यातील कलात्मकता आणि सामाजिकता या दोन परस्पर विरोधी संकल्पना आहेत का? या प्रश्नाचा चिकित्सक वेध घेतला आहे. या लेखातील मुद्द्यांची क्रमवार चर्चा करू.

- **ललित वाङ्मय आणि भाषा -**

त्यांनी साहित्याचे माध्यम असलेल्या भाषा या घटकाचा विचार करताना भाषा हे शब्दांचे दोन प्रकारात वर्गीकरण केले. अमूर्त कल्पना प्रकट करणारे शब्द, आणि संवेदना भावना स्फुरविण्याचे सामर्थ्य असणारे शब्द. म्हणजे काही शब्दांचा वापर केला तर आपणास एखादी कल्पना कळते, तर काही शब्दांच्या वापराद्वारे एखादी संवेदना-किंवा भावनात्मक अनुभवप्रतीत होतो. ही कल्पना वा अनुभव ज्याला ती भाषा कळते त्यालाच प्रतीत होतो; इतरांच्या दृष्टीने तो शब्द म्हणजे अर्थशून्य गोंगाटच ठरणार. विविध नादांना जो अर्थ प्राप्त होतो वा संवेदना - भावना निर्मितीचे जे सामर्थ्य त्यांच्यात येते तो त्या नादांचा अंगभूत गुणधर्म नसतो, तर एखादा विवक्षित समाजच त्यांना तो अर्थ देत असतो. भाषेचे कार्य निवेदन हेच असते व त्याची गरज समाजातच उत्पन्न होते. निवेदनाद्वारे जीवन-व्यवहार सुकर करणे हेच भाषेचे कार्य असते. समाज आणि निसर्गाच्या संबंधाचे स्वरूप जसे असतेत्याप्रमाणे समाजाची भौतिक परिस्थिती जशी असेल, तदनुसार काही वृत्ती-प्रवृत्तीमानवी मनात जोपासल्या जातात. ज्या प्रकारची अनुभवाची श्रेणी समाजाच्या वाट्याला येते त्या साऱ्यांची विशिष्ट ठेवण भाषेला प्राप्त होते. उदाहरणादाखल आदिम अवस्थेतील समाजाच्या शब्दसंग्रहाची बाब मुक्तिबोध मांडतात. आदिम अवस्थेतील माणसाच्या भाषेत संवेदना-भावना व्यक्त करणारे शब्द अधिक असतात एकाच संवेदनेच्या सूक्ष्मातिसूक्ष्म छटा व्यक्त करणारे वेगवेगळे शब्द या भाषांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. मात्र अमूर्त कल्पना व्यक्त करणारे शब्द त्या भाषांमध्ये अत्यल्प प्रमाणात दिसतात. भाषा ही सामाजिक संस्था असल्याने शब्दांच्या संवेदनाप्रेरक किंवा भावप्रेरक सामग्रीच्या आधारे भाषेद्वारे अनुभव साकार केले जातात. कवितेत, कादंबरीमध्ये वा नाटकात आरंभापासून अखेरपर्यंत संवेद्य 'अनुभवांची मालिकाच आपल्या डोळ्यासमोर उभी राहत असते. या मालिकेत विचार, अमूर्त कल्पना, प्रकट करणारे शब्द नसतात असे

नाही. ललितकृतीत त्यांचे कार्य वैचारिक भाषेपेक्षा अगदी भिन्न असते. मुक्तिबोध ललितकृतीतील भाषेचे कार्य सांगताना म्हणतात की, "याचाच अर्थ असा की ललितकृतीमध्ये विचार वा अमूर्त कल्पना प्रकट करणारे शब्द आलेले दिसत असले तरी त्यांचे कार्य वैचारिक भाषेपेक्षा अगदी भिन्न असते; व तत्त्वत: असे शब्दसुद्धा, असे विचार सुद्धा संवेदना-भावना प्रेरकच असतात. संवेदना-भावनांमधून ते अपरिहार्यपणे पुढे येतात व त्यांमध्येच त्यांचे पर्यवसान होते. तेव्हा ललितकृतीमध्ये शब्दांचे कार्य संवेदना भावनांचा अनुभव आणून देणे हे असते व ललितकृती ही अशा संवेदना भावनांची एक संघटनाच असते असे म्हणणे वस्तुस्थितीला धरूनच होईल यात शंका नाही." (पृ.७६) मुक्तिबोधांनी "प्रतीती" ही संकल्पना संघटनतत्त्व या अर्थाने उपयोजिली आहे. तिचे संघटनतत्त्व समजवून सांगताना मुक्तिबोधयांनी तीन मुद्दे विचारात घेतले आहेत .- प्रतीती मागील कलावंताचे मानसशास्त्र, प्रतीतीचे द्वंद्वात्मक स्वरूप आणि तिचे विवक्षित स्वरूप प्रतीतीचे स्वरूप १ 'प्रतीती' मागील कलावंताचे मानसशास्त्र मुक्तिबोध येथे संवेदना आणि भावना यांची संघटना म्हणजे ललितकृती अशी साहित्याची व्याख्या करतात. तसेच कथा, कादंबरी, नाटकात ही संवेदना-भावनांची संघटना कशी असते हे सांगताना त्यांनी 'प्रतीती' ही संकल्पना मांडली. 'संवेदना-भावनांची मालिका' ही सुटी राहता कामा नये. तशी ती सदोष ठरेल. ललितकृतीचे सौंदर्य हे तिच्यातील 'संवेदना-भावनांच्या एकजिनसी, एकात्म असण्यात आहे'. या संवेदना-भावनांचे एकजिनसी संघटन घडवणारे तत्त्वकोणते असावे याविषयीची सविस्तर चर्चा मुक्तिबोध या लेखात करतात. त्यांनी संवेदना आणि भावना यांचे परस्परांशी अपरिहार्यपणे निगडीत होणे ही एकजिनसी होण्यासाठीची अट लय आणि अर्थ या दोन तत्त्वांनी पूर्ण होऊ शकते का तपासून पाहिले. त्यांच्या मते संवाद-विरोध या लयतत्त्वानुसार ललितकृतीतील घटक एकत्र येत असले तरी ते सौंदर्य निर्माण करू शकत नाही. याउलट 'अर्थ' या तत्त्वाने संवेदना-भावनांचे सर्व घटक परस्परांशी एकजिनसीपणे निगडीत होतात. ललितकृतीमधील अर्थ हा विविध घटकांच्या एकजिनसी संघटनेतून निर्माण होतो असा अर्थ ललितकृतीमधून व्यक्त होणे हीच प्रतीती होय. कलावंताला प्रतीत होणारा अर्थ तो रसिकाला निवेदन करण्यासाठी धडपडत असतो, रसिकाला तो अर्थ प्रतीत व्हावा लागतो. भाषेच्या द्वारे संवेदना-भावनांची ही प्रतीती येते. भाषेचे स्वरूप सामाजिक असल्याने या प्रतीतीलाही सामाजिक स्वरूप प्राप्त होते.

कलावंत जी प्रतीती व्यक्त करतो ती 'प्रतीती' ही त्याच्या जागरूक मनाची प्रतीती असते, जी त्याच्या नकळत व्यक्त होत असते मुक्तिबोध कलानिर्मिती प्रक्रियेतील कलावंताच्या प्रतीतीचा मनोव्यापार उलगडत कलेच्या मानसशास्त्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी. हर्बट रीड यांनी मानसशास्त्र आणि कलास्वरूपशास्त्र यांच्या संबंधाविषयी केलेली मांडणी आधारभूत मानली. त्यांनी फ्रॉईड आणि युंग या मानसशास्त्रज्ञांच्या मतांचा आधार घेतला आहे.

"फ्रॉईडच्या मते कलाकृतीत प्रकट होतो तो सुप्त मनाचा स्वप्नसदृश्य प्रतिकात्मक मनोव्यापार. जागृत मनाने समाज व संस्कृतीमुळे नाकारलेल्या वदडपून टाकलेल्या सुप्तगुप्त इच्छा आकांक्षा कलाकृतीमध्ये प्रतीक रूपाने प्रकट होत असतात. न्यूरॉटिक व्यक्ती व कलावंत यांच्यामध्ये फ्रॉईडच्या मते, फारसा भेद नसतो. फरक एवढाच की यथार्थापासून पळून जाणे व स्वतःच्याच गूढ मनांत बंदिस्त होणे या क्रिया न्यूरॉटिक माणसाच्या बाबतीत अटळ असतात. कलावंत मात्र आपल्या कुंठित भावनांना कलारूप देऊ शकतो व त्यामुळे

त्याला मनोविकृतीपासून मोकळे होता येते.” (पृ.७९) फ्रॉईडच्या या मताचा परामर्श घेताना ‘स्वप्नसृष्टीतील स्वैर संगतीरहित दृश्यमाला व कलाकृतीमधील प्रतिमासृष्टी यांमध्ये फ्रॉईडने भेद केलेला दिसत नाही.’ असे निरीक्षण मांडून स्वप्नसृष्टीतील प्रतिमांमध्ये सुप्त मनाची जशी संगती असते ती तशीच ती ललितकृतीतील प्रतिमासृष्टीच्याही बुडाशी असते असे फ्रॉईडचे मत मुक्तिबोध स्वीकारतात. प्रत्यक्षात ललितकृतीतील विसंगत प्रतिमांचीही संगती लागू शकते अशी आपल्या आस्वादाच्या अनुभवाविषयी टिप्पणी ते करतात. तर युंग यांच्या मताचा संदर्भ घेऊन मुक्तिबोध म्हणतात, ‘मानवाने दडपून टाकलेल्या अशा निसर्गाच्या दुर्दम्य प्रेरणा म्हणजे Archetypes ‘आदिबंध’ होय. या प्रतीकात्म स्वरूपाच्या अतिप्राचीन आदिअनुभवांचे प्रबळ भावनात्मक आवेग प्रकट करण्याचे अत्यंत संवेदनशील माध्यम म्हणजे कलावंताचे मन होय.’ दोन्ही मानसशास्त्रज्ञांच्या मते ललितवाङ्मयातील प्रतिमासृष्टी ही जागृत मनाला अज्ञात अशा गूढ मनोभावना प्रकट करणारी असते. याचप्रमाणे संज्ञाप्रवाही अतिवास्तववादी कलाकृतीतून व्यक्त होणारी प्रतीती ही स्वप्नसदृश्य प्रतिमा सृष्टीसारखी आणि बाह्यत: संगतीरहित वाटली तरी ती अतिवास्तववादाच्या कलाविषयक आंदोलनामागे एक जागरूक जीवनदृष्टी दिसते. असे विवेचन करून मुक्तिबोध यांनी ‘प्रतीती’ या कलाकृतीच्या संघटक तत्त्वाविषयी निष्कर्षात्मक विधान केले आहे की, “ललितकृतीतील संघटक तत्त्व जे 'प्रतीती' ते कलावंताच्या सुजाण मनातून तर उद्भवलेले असतेच, परंतु कलाकृतीचे अवयवरूप घटक हे सुजाण पातळीवर येऊन संघटित होत असतात असे म्हणणे वस्तुस्थितीला धरूनच होईल यात शंका नाही. 'मुळात कलागुणच केवळ बौद्धिक प्रक्रियेतून निर्माण होतील' -असे मी म्हणू इच्छीत नाही हे कृपया येथे लक्ष्यात घ्यावे. कलाकृतीची संघटना न कळत होत नसते तर कलावंत आपली 'प्रतीती' प्रकट करण्यासाठी बव्हंशी जागृत मनाने ती संघटना करत असतो असे मला म्हणावयाचे आहे.” (पृ.८३)

**प्रतीतीचे स्वरूप २ ‘प्रतीती’चे द्वंद्वात्मक स्वरूप**

कलावंताची प्रतीती ही कलावंताला गवसलेल्या एखाद्या विवक्षित जीवनाच्या अंगाची संगती असते असे सांगून प्रतीतीमध्ये घटक अवयवरूप असलेले संवेदना-भावनात्मक अनुभव हे वैविध्य आणि वैचित्र्यपूर्ण कसे असतात यांची चर्चा त्यांनी ‘warandpeace’ या महाकादंबरीच्या संदर्भाने केली. ललितकृतीतील विभिन्न अनुभवांमध्ये प्रखर व सूक्ष्म ताणांमध्ये एक प्राणतत्त्व वाहत असते. ललितकृतीतील या अंतर्गत ताणाला जिवंतपणा देणारी आणि तोल सांभाळणारी अशी कलावंताची प्रतीती असते असे प्रतीतीचे लक्षण मुक्तीबोधांनी सांगितले. कलावंताला प्रतीती गवसते ती प्रत्यक्ष अनुभवासारखी आणि साक्षात्कारासारखी जी प्रकट करण्यासाठी लेखक किंवा कलावंत शब्दांच्या साधनाद्वारे कल्पित संवेद्य अनुभवांची संघटना निर्माण करतो. व तिच्याद्वारे साकार प्रतीतीचा रसिकाला प्रत्यय आणून देतो. कलावंताची ही प्रतीती द्वंद्वशील घटकावयवाच्याद्वारे साकार होत असते. संपूर्ण कलाकृती ही प्रतिभेच्या प्रभेने व्यापलेली, एकजिनसी स्वरुपाची असते. म्हणूनच रसिकाला अनुभवायला मिळते ती संपूर्ण कलाकृती म्हणजेच साकार, साक्षात्कारी प्रतीती होय.

**प्रतीतीचे स्वरूप ३ विवक्षितता**

विवक्षित ललितकृतीतील ‘प्रतीती’ ही विवक्षित, अनन्यसाधारण असते म्हणूनच ती मौलिक असते असे ‘प्रतीती’ चे वैशिष्ट्य मुक्तिबोध सांगतात. पण त्याचबरोबर एकाच कलावंताच्या अनेक किंवा सर्वच कलाकृतींचा एकत्र विचार केला तर त्यातून एका स्वतंत्र जीवनविषयक जाणिवेचा प्रत्यय येतो. ही 'जाणीव' कोणती ते त्याच्या विवक्षित कलाकृतीतील विवक्षित प्रतीतीवरूनच आपणास कळू शकते; कारण, 'प्रतीती' मध्येच ती गर्भित असते. मुक्तिबोध कलावंताची बौद्धिक जीवनदृष्टी, जाणीव, कलावंताचा दृष्टिकोण यांचे अर्थनिर्णयन करून कलाकृतिगत जाणिवेच्या विचाराबाबत खालील निष्कर्ष मांडतात.

(१) 'प्रतीती' ही कलावंताच्या जागृत (conscious) मनाला गवसलेली असते.
(२) वैविध्यातून एकात्मतेच्या, विसंगतीमधून संगतीच्या स्वरूपात ती त्याच्या प्रत्ययाला येते.
(३) ती अमूर्त कल्पनेप्रमाणे तर्कबुद्धीला गवसत नसून कलावंताच्याव्यक्तित्वाला एकदम 'प्रतीत' होते.
(४) कलाकृतीतील विविध द्वंद्वशील घटकावयवांना एकार्थाने तोलून देणारी, त्यांचा परस्परांमधील ताण अटळ व सजीव (organic) करणारी अशी असते.
(५) प्रतीतीमध्ये जाणीव गर्भित असते. सर्वसामान्य आणि विशिष्टाचे अद्वैत झालेले असल्याने ‘जाणीव’ हा प्रत्यक्ष प्रत्ययाचा विषय असतो.

### १.२.३ ‘जाणीव’- व्यक्ती आणि समाज

व्यक्ती आणि समाज परस्परसंबंधातील सामाजिक जाणीव स्पष्ट करताना मुक्तिबोध मार्क्स यांचा  विचारव्यूह आधारभूत मानून वर्गीय जाणीव ही कशी मूल्यात्मक असते आणि ती साहित्यातील प्रतीतीला कशी प्रभावित करते हे स्पष्ट करतात. त्यासाठी मुक्तिबोध समाज संरचना, या संरचनेच्या मुळाशी असणारी उत्पादन संबंधाची पायाभूतता, समाज आणि शाश्वत मूल्यांचा विचार यांची संघटना स्पष्ट करतात. कलावंताची जीवनजाणीव आणि साहित्य, समकालीन जीवनद्रव्य एक कलाविषयक जाणीव कशी घडवते याचे विवेचन करतात. त्यांच्या या विवेचनाचे मुद्देसूद आकलन करून घेऊ.

- मर्कट योनीतून विकसित होत समाज म्हणजे व्यक्तींचा समूह व व्यक्तींची गोळाबेरीज नव्हे. समाजाला स्वतंत्र असे व्यक्तिनिरपेक्ष अस्तित्व आहे व त्याची स्वतंत्र अशी अंतर्गत रचना ही (Structure) आहे. समाजाची ही अंतर्गत रचना, हे व्यक्ति- निरपेक्ष संबंध, विवक्षित आर्थिक संबंधांमधूनच निर्माण झालेले असतात. तर मानवी समाज त्याचे सामाजिक संबंध हे अधिक व्यापक, मूल्यात्मक कसे असतात या विषयी प्रतिपादन करताना मुक्तिबोध मानवी समाजाच्या संरचनेचे लक्षण देतात. “मानवी समाजाची रचना उत्पादनाच्या विशिष्ट अवस्थेनुसार अटळपणे निर्माण झालेल्या आर्थिक संबंधांची रचना असते. त्या संबंधांच्या अभावी मानवी समाजाचे अस्तित्वच अशक्य झाले असते. आर्थिक संबंधांच्या पायावरच समाज उभा असतो ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.” (पृ.८९ ) मानवी आदिसमाज हा वर्गविरहित कसा होता आणि त्या अवस्थेत व्यक्तिजाणीव आणि सामाजिक जाणीव असा भेद दिसत नाही. त्या अवस्थेत आर्थिक समानता असल्याने आदिम समाज वर्गीय दोषांपासून मुक्त होता यासाठी

त्यांनी डॉ.डी.डी.कोसंबी आणि एच.पी.शास्त्री यांच्या मताचा दाखला दिला आहे. त्यांच्या उद्धृत मताने आदिमानवाच्या अवस्थेपासून ते वर्गयुक्त सामाजिक अवस्था कशी निर्माण झाली याचे भान आपल्याला येते.

- माणसाला शेतकीचा शोध लागला. नवा उत्पादनसंबंध निर्माण झाला आणि समाज वर्गयुक्त झाला. वर्गयुक्त समाजामध्ये परस्परविरोधी हितसंबंध असल्यामुळे तो प्रकट वा अप्रकट वर्गविग्रहाचाही इतिहास आहे. असे मुक्तिबोध सांगतात. अर्थव्यवस्था धर्म, नीती या विचारविश्वावर कसा प्रभाव टाकते हे मुक्तिबोध स्पष्ट करताना म्हणतात, "आर्थिक संबंधांच्या पायावरच ही धार्मिक, सामाजिक, आर्थिक, नैतिक विचारांची व कल्पनांची इमारत उभारलेली असते. समाजाची अस्तित्वात असलेली घडी सुरक्षित राखणे हेच या विचारांचे मुख्य कार्य असते. अर्थातच विचारांच्या आर्थिक मूलाधारांची जाणीव सामाजिकाला स्वतःला असतेच असे नव्हे. बहुशः ती नसतेच. समाजाच्या या विचारव्यवस्था सामाजिक व्यक्तींचे मनोविश्व घडवीत असतात; धर्म-अधर्म, पाप-पुण्य, चांगले-वाईट, इत्यादीचा एक भावनात्मकव्यव्यवस्था त्यांच्या मनात निर्माण करीत असतात. आणि म्हणून अर्थसंबंध बदलले तरी या व्यवस्था मनात घर करून राहतात. तात्काळ बदलत नाहीत. समाजसंघर्ष जेव्हा अगदी निकराला पोचतो तेव्हा या विचार व्यवस्थांचे खरे स्वरूप सामान्यांनाही कळते." (पृ.९३) अर्थसंबंध बदलणेही बाब नव्या मानवसंबंधांना प्रवाहीत करते. नव्या-विचार कल्पनांचा विजय होऊन सामाजिक परिवर्तन घडून येते. असा मानवी इतिहासाचा विकासक्रम मुक्तिबोध स्पष्ट करतात. संतांच्या चळवळीचे पर्यवसान सामाजिक क्रांतीत होऊ शकले नाही संत चळवळ वर्गीय जाणिवा बदलू शकली नाही समाज स्थितीशील राहिला याचे कारण उत्पादनाचे नवे साधन तेव्हा अस्तित्वात येणे शक्य नव्हते असे उदाहरणाने आपले मत सिद्ध करतात.
- कलावंत किंवा कोणतीही व्यक्ती वाढते ती एका वर्गयुक्त आणि वर्गीय संघर्षाची शक्यता असलेल्या समाजातच. त्यामुळे भोवतालच्या जीवनातील संदर्भ व्यक्तीची मूल्य आणि वृत्तिव्यवस्था घडवत असतो. म्हणजेच व्यक्तिमनातील या वृत्तिव्यवस्थेबरोबरच तिच्याशी संलग्न अशी भावव्यवस्था व्यक्तीच्या मनात निर्माण झालेली असते. वस्तुतः ही वृतिव्यवस्था आणि भावव्यवस्था दोन गोष्टी नसतातच त्या एकजीवच असतात. मुक्तिबोध कलावंताची जाणीव स्पष्ट करताना भावना, विचार, सामाजिकता बाळगणाऱ्या व्यक्तीच्या प्रतिक्रियेवर लक्ष केंद्रित करतात, "व्यक्तीच्या अनुभवसृष्टीतून प्रकट होणाऱ्या वृत्तिव्यवस्थेचे वर्णन तार्किक भाषेत करावयाचे झाल्यास तिला त्या व्यक्तीचा दृष्टिकोण असे म्हणता येईल. हा दृष्टिकोण व्यक्तीच्या स्वभावात मुरला म्हणजे त्याला वृत्तिव्यवस्थेचे 'जाणीवेचे' स्वरूप येते. कलावंत हीही सामाजिक व्यक्तीच असल्यामुळे तिच्याही ठायी ही वृत्तिव्यवस्था वा 'जाणीव' असतेच. व अर्थातच ही 'जाणीव' वर्गीय म्हणून सामाजिक मूल्यभाव प्रकट करणारी असते. कलावंताच्या अनुभवसृष्टीत त्याच्या व्यक्तित्वाचे अनन्यसाधारण गुणधर्म जसे असतातच तसे दुसऱ्या बाजूला या अनुभव सुष्टीतील भावनांची वा भावसंदर्भाची व्यवस्थिती त्याच्या वृत्तिव्यवस्थेद्वारे जाणीवेद्वारे झालेली असते. म्हणजेच वर्गीय व सामाजिक मूल्याद्वारे जीवनाचे विवक्षित निर्वचनच (Interpretation) त्याच्या अनुभवसृष्टीत साकार झालेले असते." (पृ९७.) असे सांगून मुक्तिबोधांनी कलावंताचे लक्षण आणि त्याची निर्मितीप्रक्रिया सांगितली आहे.

1. कलावंताकडे एक खास संवेदनशीलता असते .
2. निर्मितीचे सामर्थ्य म्हणजे त्याच्याकडे उपजत असलेली ‘रूप’ विषयक जाणीव
3. मानवी जीवनानुभवाबद्दलचे कुतूहल त्या अनुभवामागील जीवन सत्याविषयी कलावंताला असलेली आस्था , त्याच्याकडे अनुभवांविषयीची संवेद्यता असणे आणि स्वनिष्ठ अनुभवाचे स्वनिरपेक्ष, वस्तु-प्रकाशित अनुभवात रुपांतर होणे यासर्व घटक आणि प्रक्रियेतून कलावंताची निर्मिती प्रक्रिया, प्रतीती साकार होतं असते ज्यासाठी ‘आस्था’ ही संज्ञा मुक्तिबोध वापरतात.

- कलावंताची जीवनविषयक ‘आस्था’ आणि त्याचा ‘स्व’ यांमधील ताण किंवा संघर्ष कलावंताची जाणीव घडवतो एका अर्थी कलावंताची जाणीव ही त्याच्या वर्गाची जाणीव असते आणि कलावंताने आपल्या स्ववर्गीय जाणिवेचे क्षेत्र ओलांडावे असा आग्रह बाळगला जातो. यावर मुक्तिबोध स्पष्टीकरण देतात की “रवीन्द्रनाथ, शरच्चंद्र, हरिभाऊ इ. कलावंतांच्या ललितकृतींमध्ये स्ववर्गाचेच चित्र रेखाटलेले दिसेल. प्रश्न कलावंताच्या विषयांचा नसून त्याच्या जाणीवांचा आहे. अनुभवाचे रूप आकळताना स्वतःच्या जाणीवासंबंधी 'स्व'ची 'जाणीव' ही. वृत्तिव्यवस्थाच असल्यामुळे चिकित्सक वृत्ती निर्माण होणे हे सृजनशील कलावंताच्या बाबतीत आवश्यक असते असे माझे म्हणणे आहे. या संघर्षातूनच खऱ्या अर्थाने कलावंताची 'जाणीव' व्यापक मूल्याधिष्ठित मानवी 'जाणीव' बनत असते असे मी म्हटलेले आहे.” (पृ.१०१) वर्गीय जाणिवेची उदाहरणे मुक्तिबोध देतात. यात १९२० च्या कालखंडात ललित वाङ्मयाच्या जाणिवेतेच घडून आलेला बदल दिसतो. ‘माधवराव पटवर्धन यांच्या ‘विरह तरंग’ आणि ‘सुधारक’ या काव्यसंग्रहात सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणसांची जाणीव आणि कलावंताची जाणीव एकच झालेली दिसते. तर ना.सी.फडके हे मध्यमवर्गीय सुखवस्तू जाणिवांचे जागरूक प्रतिनिधी ठरतात. त्यांच्या कादंबऱ्यांमधून मध्यमवर्गीयांच्या लोकरंजनासाठी लिहिलेल्या दिसतात. तर वि.स.खांडेकर कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसांच्या सात्विक, स्वप्नाळूपणाची सांगड ध्येयवादाशी घालून कलात्मक, आभासात्मक असे जीवनचित्रण करतात. माधवराव पटवर्धन आणि फडके-खांडेकर यांच्या विषयी लेखक म्हणून आदर व्यक्त करून मुक्तिबोध या तीन कलावंतांचे साहित्य स्व वर्गाशी संघर्ष करून उदयाला आलेल्या जाणिवेचे दर्शन घडवत नाही असे रोखठोकपणे सांगतात. याउलट हरी नारायण आपटे यांची जाणीव सुखवस्तू नाही. सदाशिवपेठी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कलावंताची जाणीव सदाशिवपेठी नव्हती असे मत हरी नारायण आपटे यांच्या साहित्याविषयी मुक्तिबोध मांडतात “पण लक्षात कोण घेतो' च्या रूपाने भिन्न आणि विविध अशा संवेद्य अनुभवरूप घटकावयवांमधून साकार झालेली हरिभाऊंची 'प्रतीती' ही कलावंताच्या 'आस्थे'मधून उदयाला आलेल्या व्यापकजाणीवेचेच प्रकट रूप होय.” (पृ.१०६ ) असे म्हणून मुक्तिबोध कलावंताची सामाजिक जाणीव आणि साहित्याची समाज संबद्धता साधार स्पष्ट करतात.

**लेखाचा सारांश :**

➢ शब्दाच्या संवेदना-भावना प्रेरक सामर्थ्याने अनुभव साकार होत असतो. शब्द अनुभव प्रत्ययास आणतात.

- ललितकृतीतील अर्थ आधी लेखकाला/ कलावंताला प्रतीत झालेला असतो. रसिकाला तो आस्वादसमयी प्रतीत होतो.
- संवेदना-भावना, अनुभव आणि जाणीव अशा घटक अवयवांनी जी अर्थपूर्णता साहित्यात निर्माण होते ती एकार्थ असते.एकार्थ, एकजिनसीपणा आणणारे संघटक तत्व म्हणजे प्रतीती .
- कलावंताची व्यक्त होणारी विवक्षित प्रतीती ही तर्कबुद्धीने मिळवलेली नसून ती साक्षात प्रत्ययरूप असते. कलावंताची जीवनाविषयीची आस्था म्हणजे त्याची कला 'जाणीव'
- आस्था ही अनुभवाचा प्रत्यय देणारी, वैविध्यातून, विषमतेतून, विसंगतीतून एकात्मतेचा, समानता आणि सुसंवादाचा शोध घेऊ पाहणारी जिज्ञासारूप प्रवृत्ती असते.
- आस्थेच्या व्यापारात कलावंत स्व गत वृत्तीविषयी तटस्थ, वस्तुनिष्ठ होतो. त्याचवेळी बाह्य जगाशी कलावंत संघर्ष, ताणाचा अनुभव घेत असतो. अशा दुहेरी ताणातून कलावंताची 'आस्था' संगतीचा वा सत्याचा शोध घेत जाते. आस्था 'जेवढी प्रबळ तेवढा हा दुहेरी संघर्ष अस्सल, तेवढीच कलावंताची 'जाणीव.' ही नवी वृत्तिव्यवस्था सखोल व समृद्ध बनत असते.
- कलावंताची 'जाणीव' घडत जाण्याची प्रक्रिया सतत चालू असते, या प्रक्रियेतच कलावंताला विवक्षित जीवनार्थरूप, संगतिरूप अशा 'प्रतीती' अनुभवावयास मिळत असतात आणि याच 'प्रतीती' अस्सल अनुभवांच्या घटकावयवांच्या द्वारे शब्दात साकार होतात तेव्हां त्यांना आपण ललितकृती म्हणतो. 'प्रतीतीं 'मध्ये गर्भित असलेली 'जाणीव' हीच खरीखुरी ललितकृतीतील सामाजिक जाणीव होय.'

ललित वाङ्मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप - शरदचंद्र मुक्तिबोध, जीवन आणि साहित्य ,अभिनव प्रकाशन ,मुंबई ,प्र.आ.१९७२

### १.२.६ साहित्य, समाज आणि क्रांती - डॉ.म.ना.वानखडे

भुसावळ येथे महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेच्या नवव्या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ.म.ना.वानखडे यांनी दलित साहित्यविषयक आपली भूमिका मांडली. त्यांचे हे अध्यक्षीय भाषण 'दलितांचे विद्रोही वाङ्मय' या वामन निंबाळकर आणि यशवंत मनोहर यांनी संपादित केलेल्या ग्रंथात समविष्ट आहे. या भाषणात आजवर मराठी साहित्यात दलितांची उपेक्षा कशी झाली हे सांगून साहित्याची समाज संबद्धता स्पष्ट करत श्री.म.ना.वानखडे बौद्ध साहित्यिकांचे उदबोधन करतात.

#### भारतीय साहित्यातील दलित चित्रण

आजवर भारतीय साहित्यात दलितांची उपेक्षाच झाली या समाजाचे जीवन आणि अंतरंग ओळखू शकणारा साहित्यिक निर्माण झाला नाही ही बाब डॉ.म.ना.वानखडे यांना अस्वस्थ करते. प्राचीन वेद ग्रंथांनी दलितांना ज्ञानग्रहणापासून वंचित ठेवले. मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी तर अमानुष, पाशवी कायदे करून दलितांना गुलामगिरीच्या गर्तेत लोटले. भारतीय साहित्यात जी अक्षर वाङ्मये मानली जातात ती एकांगी वर्गवादी अशा दृष्टिकोणातून कशी

लिहिली गेली आहेत असा आक्षेप घेत ‘भगवतगीता ते नवसाहित्याचे’ मूल्यमापन त्यांनी केले आहे. या विश्लेषणाचे प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे –

- रामायण आणि महाभारत या महाकाव्यात दलित जीवनाचा अभाव दिसतो. ‘चातुवर्ण्य मया सृष्टम्’ अशा उपनिषदातील समाजविघातक तत्त्वांचा उपदेश करणारे साहित्य वंदनीय कसे ठरावे? असा प्रश्न म.ना.वानखडे उपस्थित करतात.
- हे साहित्य आपले न वाटण्यामागे आणखी एक कारण म्हणजे कनिष्ठ वर्गाच्या पात्राच्या मुखात विटाळ होतो म्हणून प्राकृत भाषा घातलेली दिसते.
- मराठीतील संत वाङ्मय हे केवळ पारमार्थिक स्वरूपाचे आहे. संत ज्ञानेश्वरांनी वेदांत धर्माचीच पताका उचलून धरली आहे. महानुभाव अवैदिक असले तरी त्यांनी सामाजिक जीवन ढवळून काढले नाही. संत रामदासांनी तर उघड ब्राह्मण धर्माचा पुरस्कार केला. ‘अंत्यज शब्दाज्ञाता बरवा| परी नेऊन काय करावा|’ अशाप्रकारे अंत्यजांची अवहेलनाच ते करतात. या सर्व महाराष्ट्र धर्माच्या प्रणेत्यांवर टीकास्त्र उगारणारे डॉ.म.ना.वानखडे यांचे विधान साहित्याची समाज संबद्धता आणि वाचकावर होणारा परीणाम व्यक्त करणारे आहे, “त्यांच्या (संतांच्या) भूतदयावादी दृष्टीमुळे समानतेवर आधारलेला नवा समाजदेह निर्माण होऊ शकला नाही. उलट तो कर्मकांडाच्या आहारी गेला. चातुर्वर्ण्याची समाजमनावरची पकड दृढ झाली.
- शाहिरी साहित्य ‘तमाशा’हे दलितांच्या अभिव्यक्तीचे साधन होते पण आज प्रसिद्ध झालेल्या शाहिरी वाङ्मयात दलितांना स्थान नाही. अशी नोंद ते करतात.
- आधुनिक मराठी साहित्य हे मध्यमवर्गीय, पांढरपेशीपण अशा ब्राह्मण समाजाचे चित्रण आहे. त्यांना काही प्रमाणात स्त्रियांचे दु:ख जाणवले पण दलितांच्या दु:खाला ते वाचा फोडू शकले नाही.
- १९३०-४० च्या दशकातील ग्रामीण साहित्याने गावकुसाबाहेरच्या समाजाला अव्हेरले
- साम्यवाद किंवा गांधीवाद यांनी प्रेरित झालेल्या मानवतावादी साहित्यिकांची दलितोद्धाराविषयी भूमिका ही भूतदयावादी आहे. सर्वहारा किंवा हरिजन असे संबोधण्यातून ही भूतदयावादी दृष्टी व्यक्त होते, जी व्यक्तीच्या स्वाभिमानाला, प्रतिष्ठेला दुय्यमताच देते.
- दुसऱ्या महायुद्धोत्तर मराठी साहित्यात जो नवसाहित्याचा प्रवाह आला त्यात जीवन दर्शनापेक्षा अभिव्यक्तीच्या, तंत्रवादाच्या वैचित्र्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे. अशी साहित्य इतिहासाचा वेध डॉ.वानखडे घेतात.

एकूण १९६० पर्यंतच्या मराठी साहित्यात दलित वेदनेचा आविष्कार दिसत नाही. संत साहित्यातील आध्यात्मिक चळवळ असो वा साम्यवादी, गांधीवादी विचारप्रणालीचे साहित्य असो मराठी साहित्यातील लेखकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा वर्गवादी आहे. त्यांच्या साहित्यातून दलित जीवनानुभवाकडे समानतावादी दृष्टीतून पाहण्याची प्रवृत्ती दिसत नाही. या पार्श्वभूमीवर म.ना.वानखडे यांना अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात यांचे साहित्य मूल्यात्मक वाटते. कारण ते भूतदयावादी दृष्टिकोणातून नव्हे तर स्वाभिमानाच्या स्वात्म दृष्टिकोणातून साहित्यचित्रण करीत होते. “आपल्या (दलित) समाज जीवनाचे चित्रण घडवणाऱ्या साहित्याचा भवितव्याला फार मोठा आशेचा किरण वाटतो.”

अशा शब्दात १९६० च्या दरम्यान दलित जीवनाला साहित्यातून वाचा फोडणाऱ्या अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात यांच्या साहित्याविषयीचा अभिप्राय वानखडे व्यक्त करतात.

### दलित साहित्य आणि नव समाजनिर्मितीची प्रेरणा

साहित्य आणि समाजाचा अन्योन्यसंबंध स्पष्ट करताना म.ना.वानखडे म्हणतात की, "समाजमनावर संस्कार करण्याचे फार मोठे सामर्थ्य साहित्यात असते. समाज जीवनाला सावरण्याचे, प्रेरणा देण्याचे, एवढेच नव्हे तर समाजक्रांती करण्याचे सामर्थ्य साहित्यात असते. साहित्य नवसमाज निर्मितीची क्रांती घडवू शकते." (पृ.९) दलित साहित्याच्या क्रांतिचक्राला गती देण्याचे श्रेय म.ना.वानखडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना देतात. दलित साहित्याच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान त्यांनी स्पष्ट केले आहे.-

- अस्पृश्यता हा मानवी संस्कृतीला जडलेला महारोग आहे, मानवतेवरील कलंक आणि बुद्धिहीनतेचे लक्षण मानले. यामुळे शतकानुशतके दलितपणाची मानसिक गुलामगिरी करणाऱ्या मनाला माणूसपणाची जाणीव आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली.
- अपमान, अमानुषतेच्या खोल दरीत अडकून पडलेल्या दलित माणसामध्ये स्वाभिमान आणि अस्मितेची भावना जागृत केली.
- दलितत्वाची वेदना पचवण्यासाठीच नव्हे तर एकूण मानव जातीला उपकारक ठरेल अशी मानवतावादी बौद्ध मानव दृष्टी डॉ.बाबासाहेबांनी दलित बांधवांना दिली.

डॉ.बाबासाहेब हे दलित साहित्याचे प्रेरणा स्त्रोत मानून समकालीन बौद्धजनांनी साहित्यनिर्मिती करावी. भगवान बुद्ध म्हणजे अंतिम पर्याय मानून बाबासाहेबांच्या क्रांतिप्रवण विचारांच्या प्रकाशात बौद्धजनानीं आपल्या साहित्याची निर्मिती करावी अशी अपेक्षा वानखडे करतात. आपल्या अपेक्षेच्या पुष्ट्यर्थ जागतिक इतिहासातील दोन उदाहरणे दिली. साहित्य हे नवसमाज निर्मितीला कसे प्रेरक ठरते हे फ्रेंच राज्यक्रांती आणि रशियन क्रांतीच्या आधारे त्यांनी स्पष्ट केले आहे. या दोन उदाहरणाप्रमाणे बौद्ध साहित्यिकांनी आपले नवसमाजनिर्मितीचे ध्येय साकार केले पाहिजे.

### बौद्ध साहित्याच्या जीवनधारणेचे संकेत

डॉ.म.ना.वानखडे यांनी नवसमाजाच्या धारणेत साहित्याचा मोठा वाटा असतो हे स्पष्ट केले आहे. त्यासाठी 'बायबल' या ग्रंथाचा आधार घेतला आहे. बायबल हा नुसता धार्मिक ग्रंथ नव्हे या ग्रंथाने ख्रिश्चन समाजाच्या धारणेला प्रेरणा दिली. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'बुद्ध आणि त्याचा धम्म 'या महान ग्रंथाला बौद्ध साहित्य परंपरेचा मूलस्त्रोत मानावा. 'चांगल्या लेखकाला परंपरेचा वारसा लागतो.' या टी.एस.इलियट यांच्या 'ट्रॅडिशन ॲण्ड इंडिव्हिज्युअल टॅलेन्ट' या लेखातील विधाना प्रमाणे बौद्ध जीवनदृष्टीच्या परंपरेचा वारसा आपण बौद्ध साहित्यिकांनी घेतला पाहिजे. असे आवाहन डॉ.म.ना.वानखडे करतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ह.वी.देसाई यांनी घेतलेल्या मुलाखतीतून वानखडे यांना बौद्ध साहित्यांची भूमिका रेखांकित करतात. बाबासाहेबांनी कधी

मनोरंजनासाठी वाचन केले नाही तर शिकण्यासाठी केले. म्हणून बौद्ध साहित्याचे नवे संकेत -

- बौद्ध साहित्याचे प्रयोजन शिक्षण, प्रबोधन असेल. मनोरंजन नाही.
- बाबासाहेबांच्या कलाविषयक आवडीनिवडीचे अभिसरण करणे ही आपली कलाविषयक भूमिका असावी.
- आजच्या मराठी साहित्यातील लेखकांचा कल हा लैंगिकतेकडे दिसतो त्याचप्रमाणे वैफल्यवादही बोकाळलेला दिसतो. याला कारण साहित्याची जीवनमूल्यांशी फारकत झाली आहे. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता अशा मानवतावादी मूल्यांचे पोषण करणारे बौद्ध शैत्य असावे.
- जीवनधारणा घडवण्यासाठी मायथॉलॉजी उपयुक्त ठरते. हिंदू मायथॉलॉजी बौद्ध साहित्याच्या नवसंकेतांना आधारभूत ठरत नाही. म्हणून जातक कथा आणि आजचे साहित्य यांची सांगड घालून नव्या धारणा आणि विश्वासाचे नाते वाचकमनात निर्माण करता येईल.
- बौद्ध साहित्य कोणत्या साहित्य परंपरेशी नाते जोडू शकते याचे उत्तर म.ना.वानखडे 'निग्रो' साहित्यात शोधतात. अमेरिकन साहित्यात निग्रो समाजाचे स्थान हास्यास्पद होते. पण १९३० च्या दशकात रिचर्ड राईट या निग्रो लेखकाने 'द नेटिव्ह सन' या कादंबरीतून निग्रो माणसांना कसे दडपून ठेवले जाते या वास्तवाला वाचा फोडली. जेम्स बोल्ड्विन यांनीही ज्याप्रकारे निग्रोंच्या प्रश्नाला वाचा फोडली तसे बौद्ध साहित्य विद्रोही, समाजमन व्यक्त करणारे साहित्य असावे.

बौद्ध जीवननिष्ठा किंवा जीवनदृष्टीचे दिग्दर्शन करताना म.ना.वानखडे 'दु:ख' हे बौद्ध दृष्टीचे मूळ आहे. या दु:खाचे मूळ पाप-पूण्य, ईश्वर-आत्मा अशा अपरिपक्व कल्पनांमध्ये नाही. 'तृष्णा',भावविवशता या विकारांवर मात करण्यासाठी बुद्धिप्रामाण्यवाद आणि विज्ञाननिष्ठेवर आधारित जीवनाचे वास्तवदर्शन साहित्यातून आविष्कृत झाले पाहिजे. असा आग्रह बाळगतात. जीवन हे अनित्य आहे. परिवर्तनशीलता हा जीवनधर्म आहे यावर बौद्ध तत्वाची श्रद्धा आहे. तसेच प्रज्ञा, तर्कनिष्ठतेसोबतच अनुभव आणि करूणा यांना मानवी जाणिवेचे मूलस्त्रोत आहे हे वानखडे यांनी अधोरेखित केले आहे. बौद्ध जीवनदृष्टी ही हिंदू धर्माच्या अभावातून किंवा विरोधातून निर्माण झाली नाही. तर ती मानवाच्या कल्याणसाठी विधायक आणि भावरूप अशी जीवनदृष्टी आहे. अखंड विश्वाच्या कल्याणाची धारणा असणारे जीवनदर्शन बौद्ध साहित्यिकांनी सामर्थ्यपूर्णतेने, प्रत्ययकारी आणि परिणामकारक पद्धतीने करावे असा मूलमंत्र म.ना.वानखडे देतात.

### बौद्ध साहित्याचे स्वरूप

बौद्ध साहित्य म्हणजे बौद्धवादाचे मंडन नव्हे की प्रचार नव्हे.साहित्याची परिणती कल्पकतेतच असते. कोणत्याही कल्पकतेला बौद्ध दृष्टी विरोध दर्शवत नाही. "बौद्ध दृष्टी म्हणजे अनुभव घेणारी एक मनाची पातळी आहे. आणि अनुभूतीच्या गुणधर्मानुसार तिचा आविष्कार होतो. त्याला अनुरूप असे कलात्मक रूप प्राप्त होते. बौद्ध साहित्यिक हा ग्रामीण जीवनातून आलेला असतो. ग्रामीण जीवनाकडे भूतदयेने पाहणे, ग्रामीण भाषेला अशुद्ध मानणे याला वानखडे विरोध दर्शवतात. त्यांच्या मते लेखकांनी ग्रामीण जीवनातले चैतन्य

टिपले पाहिजे. कालचा ग्रामीण बौद्ध लेखक आज नागरी वातावरणात वावरत असतो. ग्रामीण जीवनाशी संबंध तुटून नागरी जीवनातील वर्गीय जीवनसंस्कृतीचा प्रभाव पडणे हे सुशिक्षित बौद्ध समाजात घडू शकते. सुशिक्षित बौद्ध समाजाने ग्रामीण जनतेची प्रगती घडवून आणण्यासाठी नेतृत्व करायला हवे. बौद्ध समाजाच्या जीवनातील घडामोडींचे पडसाद साहित्यात पडायला हवेत. बाबासाहेबांच्या समर्पणाशी हे बौद्ध समाजातील माणसांनी, लेखकांनी बांधिलकी बाळगावी. बौद्ध साहित्य अभिरुची घडवणे आणि बौद्ध समाज क्रांतीचे बौद्ध समाजात अभिसरण होईल यासाठी बौद्ध साहित्य परिषदेने कोणते उपाय किंवा प्रयत्न करावेत यांची दिशा वानखडे सुचवितात.

(१) बौद्ध साहित्याची परंपरा अखंडपणे सुरु ठेवली पाहिजे. त्यासाठी साहित्याचा विचार, परामर्श झाला पाहिजे.
(२) बौद्ध निष्ठेचे साहित्यशास्त्र निर्माण करावे.
(३) सर्जनशील साहित्याप्रमाणे इतर साहित्याचे संघटन करीत रहावे.
(४) समग्र भीमभारताची किंवा भीमायनाची निर्मिती झाली पाहिजे.
(५) बौद्ध साहित्य परिषदेतर्फे अभ्यासवर्ग आयोजित व्हावे. त्यासाठी क्रमिक पुस्तकांची निर्मिती झाली पाहिजे. बौद्ध साहित्यनिर्मिती आणि तिचा प्रचार झाला पाहिजे.
(६) आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करताना, बौद्ध साहित्यिकांनी बंडखोर, क्रांतिचे प्रवर्तक व्हायला हवे असे. म.ना.वानखडे ठासून सांगतात. समकालीन जीवनात बौद्ध साहित्याचे स्थान आणि ध्येय स्पष्ट करताना ते म्हणतात, “आपली नवसमाज निर्मितीची क्रांती केवळ आपल्यापुरतीच नाही तर संबंध देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि अभिवृद्धीसाठी आहे. नवभारताच्या निर्मितीसाठी आहे. यासाठी आपल्या कर्तव्यात आपण तसूभरही मागे राहता कामा नये. लोकशाहीला पोषक असा एकसंध समाज निर्माण करण्यासाठी बौद्ध धर्माचा सर्व भारतीयांनी स्वीकार करायला हवा तरच स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे आपले ध्येय साकार होईल. त्यासाठी नव्या जाणीवेने, नवा मानव, नवा समाज, नवा भारत निर्माण करण्यासाठी सर्व भारतीयांनी सिद्ध व्हायला हवे.” (पृ.१६ )

साहित्य, समाज आणि क्रांती-डॉ.म.ना.वानखडे, दलितांचे विद्रोही वाङ्मय, संपा.वामन निंबाळकर आणि डॉ.यशवंत मनोहर, प्रबोधन प्रकाशन, नागपूर .

**आपली प्रगती तपासा :**

दलित साहित्य आणि नवसमाज निर्मितीची प्रेरणा स्पष्ट करा.

## १.३ समारोप

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये साहित्य आणि मानव यांचा फार जवळचा संबंध आहे. साहित्य हे मानवाने निर्माण केले आहे. आणि मानव हा साहित्याच्या संस्कारातून घडत गेला आहे . साहित्याच्या विविध चळवळीतून मानवाला जीवनातील घडामोडी समजल्या आहेत . साहित्यामुळेच मानव हा पूर्ण पणे विकसित झाल्याचे आपणास दिसून येत असते.

१८७४ ते १९२० हा मराठी साहित्याचा कालखंड हा आधुनिक कालखंड म्हणून ओळखला जातो याच कालखंडात स्वतंत्र चळवळीला सुरुवात झाली सर्व समाज एकत्र आला केवळ आणि केवळ साहित्याच्या माध्यमातून जागृती फार मोठया प्रमाणात झाली आहे. म्हणून साहित्य आणि समाज यांचा रक्त आणि मांस यांच्या सारखा संबंध आहे मानवाला साहित्यातून वजा केल्यास साहित्याला काहीही अर्थ राहणार नाही म्हणून साहित्य आणि मानवी जीवनाचा अतिशय जवळचा संबंध आहे असे आपणास वरील विवेचनावरून सांगता येईल .

## १.४ स्वाध्याय

१) मराठी साहित्याच्या प्रेरणा सांगून, समकालीन सांस्कृतीक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) ललित वाङ;मय म्हणजे काय? वाङ:मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप उलघडून दाखवा.

३) दलित साहित्याच्या प्रेरणा कोणत्या सविस्तर सांगा .

४) १८७४ ते १९२० या काळखंडास मराठी साहित्यात आधुनिक कालखंड म्हणून ओळखले जाते, विवेचन करा.

५) साहित्य समाज व व्यक्ती यांचा परस्पर संबंध सोदाहरण चर्चा करा.

## १.५ अभ्यासपूरक ग्रंथसूची

- जोगरा.श्री., प्रदक्षिणा-खंडएक आणि दोन कॉन्टिनेन्टल प्रकाशन १९७२
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ ,४,५,६,मराठी साहित्य परिषद ,पुणे
- मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप, गो.मा.पवार १९५०

❖❖❖❖

munotes.in

# २अ

# दलित साहित्य

**घटक रचना :**

२अ.१ प्रास्ताविक

२अ.२ दलित साहित्य :पार्श्वभूमी

२अ.३ दलित चळवळ

२अ.४ समाजव्यवस्था आणि चळवळ

२अ.५ दलित साहित्याचा आरंभबिंदू –जलसा

२अ.६ दलित साहित्यप्रकार

२अ.६.१ कथनात्मक साहित्य (कथा,कादंबरी)

२अ.६.२ काव्यात्म साहित्य

२अ.६.३ नाट्यत्म साहित्य (दलित रंगभूमी)

२अ.६.४ आत्मकथनपर साहित्य

२अ.६.५ वैचारिक साहित्य-समीक्षा

२अ.७ दलित साहित्याची वैशिष्ट्ये

२अ.८ समारोप

२अ.९ संदर्भ

२अ.१० स्वाध्याय

२अ.११ अधिक वाचन

## २अ.१ प्रास्ताविक

मराठी साहित्यात १९६० नंतर दलित साहित्य आकारास येत गेले आहे. त्यापूर्वी संतमेळ्यातील संत चोखामेळा हा दलित साहित्याचा पहिला उद्गारस्वर आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण आपल्यावर अन्याय होतो आहे, याची जाणीव त्यांनी अभंगरचनांतून व्यक्त केली आहे. इंग्रज राजवटीत महात्मा फुले यांच्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांपर्यंत अनेकांनी आपले अनुभवविश्व व्यक्त केलेले आहे. गौतम बुद्ध, संत चोखामेळा, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान व्यक्ती दलित

साहित्याच्या प्रेरक ठरल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली नियतकालिके (जनता, मूकनायक, प्रबुद्ध भारत) वैचारिकता, चिंतनात्मकता निर्माण करणारी होती; तशीच ती साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देणारी ही होती.

मराठी सहित्यात मोलाची भर घालणारा दलित साहित्य प्रवाह आहे. हे साहित्य एकूणच प्रबोधनाची, समाजपरिवर्तनाची भूमिका घेणारे आहे. या दलित साहित्याविषयी अनेक मतमतांतरे आहेत. 'दलित' या शब्दापासून 'दलित साहित्य' या विषयी अनेकांनी अनुकूल-प्रतिकूल अशी चर्चा केलेली आहे. 'दलित साहित्य' या संज्ञेऐवजी 'फुले-आंबेडकरी साहित्य', 'परिवर्तनवादी साहित्य', 'विद्रोही साहित्य', 'आंबेडकरवादी साहित्य' अशी अनेक पर्यायी शब्दयोजना करावी अशा सूचना अनेकांनी केलेल्या आहेत.

## २अ.२ दलित साहित्य : पार्श्वभूमी

दलित साहित्य निर्मितीमागे अनेक घटक कारणीभूत ठरले. दलित साहित्याचा अभ्यास करताना अनेक संदर्भाचाही विचारविमर्श करावा लागतो. चातुर्वर्ण्य व्यवस्था, हिंदू धर्म व्यवस्था, बुद्ध तत्त्वज्ञान, सामाजिक- आर्थिक व्यवस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांची भूमिका- तत्वज्ञान आदी संदर्भयूक्ततेने दलितसाहित्य आकारास येत गेले.

महात्मा फुले यांनी 'शिक्षण' या घटकाचे महत्व पटवून देत पुण्यात शाळा सुरू केली. दलितांना बाहेर काढण्यासाठी शिक्षण हाच योग्य मार्ग आहे. हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. 'ब्राम्हणांचे कसब' (१९६९), 'गुलामगिरी' (१९७३), 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) या वैचारिक लेखनाबरोबरच त्यांनी 'तृतीय रत्न' (१८५५) हे नाटक लिहिले. पुढे अनेकांनी दलितांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. शाहू महाराज यांनी दलितांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. तसेच विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलित समूहातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्याकरिता वसतिगृहे उभारली. त्यामुळे अनेक दलित विद्यार्थी शिकू शकले. त्यांनी पुढे आपले अनुभवकथन करीत साहित्य निर्मिती करून वास्तव मांडले.

## २अ.३ दलित चळवळ

महाराष्ट्र हा विविध चळवळींचा उर्जास्त्रोत आहे. एकोणिसाव्या शतकात सामाजिक प्रबोधनाच्या हेतूने अनेक चळवळी उदयास आल्या. लोकहितवादी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा प्रबोधनात्मक चळवळींचा एक चढता आलेख आहे. या चळवळींमध्ये अनेकांचे सहकार्य होते. त्यापैकीच महात्मा फुले आणि त्यांचे सर्व सहकारी हा एक विचार प्रवाह नोंदविता येईल. या विचारप्रवाहाला धरून राजर्षी शाहू महाराज यांची कृतिशील चळवळ उभी राहिलेली दिसते. आंबेडकरपूर्व आणि आंबेडकरकालीन जी एक चळवळ उभी राहिली ती स्वतंत्रपणे विचारात घ्यावयास हवी. या चळवळीने दलित,वंचित समूहाच्या मुक्तीसाठी लढा देत सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा,हे उद्दिष्ट समोर ठेवून समाजोद्धार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षण, केशवपन,विधवाविवाह यांसारख्या प्रश्नांना चळवळीच्या केंद्रस्थानी ठेवले. तसेच शेतकरी आणि अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातींचे सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक प्रश्न प्रभावीपणे त्यांनी समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. निबंध,

कविता, आणि नाटक या साहित्य प्रकारांतून लेखन करीत आपले विचार समाजसन्मुख ठेवले. त्याच बरोबर त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. हिंदू धर्मातील पारंपरिक विचारांना शह देत पुरोहितशाहीला विरोध दर्शविला. त्यातूनच त्यांनी तत्कालीन समाजव्यवस्थेचा दंभस्फोट केला. महात्मा फुले यांनी सामाजिक समता, न्याय आणि मानवता या त्रिसूत्रींचा पुरस्कार केला. आणि समाजाला जाणीवपूर्वक समाजव्यवस्थेकडे पाहण्याचा, एक नवा दृष्टिकोन दिला. त्यातूनच बहुजन समाज विचारमंथनाच्या प्रक्रियेत येऊ शकला. हे महात्मा फुले यांच्या कार्यामुळे, चळवळीमुळे होऊ शकले.

चार्तुवर्ण्यव्यवस्थेतील अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गातील अनेकांनी आपले प्रश्न मांडण्याचा प्रयत्न पुढील काळात केला. त्यामध्ये गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागु बनसोडे, आदी प्रभुतींनी आपले प्रश्न तत्कालीन ब्रिटिश सरकार आणि जनता यांच्यासमोर कृतिशील चळवळीतून मांडले. पुढे अनेकांनी ही चळवळ आपापल्यापरीने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. छत्रपती शाहू महाराज यांनी शूद्रातिशूद्रांच्या विकासासाठी आपल्या संस्थानात मोठे कार्य हाती घेतले. उदाहरणार्थ, नोकरीत अग्रक्रम मिळावा म्हणून राखीव जागांची कल्पना मांडून ती राबवली. त्यांची ही कृतिशील अंमलबजावणी सामाजिक चळवळीला प्रोत्साहन देणारी ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्च १९२७ मध्ये महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह केला. नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०) या आंदोलन कृतीतून एक नवा आयाम चळवळींना प्राप्त झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ही कृती सामाजिक आणि धार्मिक क्रांतींचा आरंभ करणारी ठरली. त्यानंतर अस्पृश्यांच्या मूलभूत हक्कांसाठी अनेक लढे उभारले गेले.

## २अ.४ समाजव्यवस्था आणि चळवळ

पारंपारिक समाजव्यवस्थेमध्ये 'जात' हा घटक प्रभावीपणे अस्तित्वात होता. सार्वजनिक हित आणि सहकार्य हे जातिंपुरतेच मर्यादित केले होते. जातिनिहाय व्यवसाय धोरण या व्यवस्थेने स्वीकारले होते. त्यामुळे व्यवसाय स्वातंत्र्य नव्हते. ते जर स्वीकारले असते तर जातीव्यवस्थांचे स्वरूप बदलले असते. म्हणूनच जात आणि व्यवसाय हे समीकरण दीर्घकाळ चालूच राहिले. तसेच स्त्री स्वातंत्र्यालाही नाकारले गेले होते. जात, व्यवसाय आणि विवाह व्यवस्था या त्रिसूत्रीद्वारे समाज बांधणी केली गेली. आणि अनेक अस्पृश्य वर्गातील लोकांना, स्त्रियांना दास्यता स्वीकारावी लागली. समाजव्यवस्थेचा हा कावेबाजपणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आला. आणि त्यांनी भारतीय घटनेत याला शह दिला. अस्पृश्य समाजाबरोबर स्त्रियांनाही मूलभूत हक्क मिळवून देण्याची कायदेशीर व्यवस्था केली.

हिंदू धर्माने वर्षानुवर्षे अस्पृश्यांचे अनेकांगी शोषण केले. श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या श्रेणीबद्ध व्यवस्थेत त्यांना अडकवून त्यांचे माणूसपण नाकारले स्व-विकासाच्या कोणत्याच संधी अस्पृश्यांना प्राप्त होऊ शकल्या नाहीत. हे वास्तव आहे. त्यामुळेच तो दीर्घकाळ शिक्षणापासून, सुखापासून वंचित राहिला. त्याच्या वाट्याला उदासिनता, दारिद्र्य आणि अज्ञान आले. या सर्वांतून बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परिवर्तनवादी चळवळ महत्त्वाची ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य मुक्तीचा सर्वंकष लढा उभारला. आणि 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. या

मूलमंत्राने प्रेरित होत दलित समूहातील अनेकांनी शिक्षणाचा स्वीकार करीत; अन्याय-अत्याचार-शोषण या विरोधात संघर्ष केला. स्वातंत्र्योत्तर काळातही दलितांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय अत्याचार होत होता. त्याविरोधात अनेकांनी आवाज उठविला. त्यापैकी राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज.वि.पवार,अर्जुन डांगळे, सयाजी वाघमारे आदींनी 'दलित पँथर'ची (१९७२) स्थापना केली. दलित पँथर ही एक राजकीय-सांस्कृतिक चळवळ होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही दलितांना न्याय मिळू शकलेला नाही, हे वास्तव अनेक कवी, साहित्यिक यांनी व्यक्त केले. नामदेव ढसाळ यांची 'स्वातंत्र्य हे कोणा गाढविचं नाव आहे?' ही कविता; राजा ढाले यांचा 'काळा स्वातंत्र्यदिन' हा लेख यासंदर्भात पाहता येईल.

## २अ.५ दलित साहित्याचा आरंभबिंदू – जलसा

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या एक सर्जनशील समुह म्हणजे लोककलावंत होत. आंबेडकरांच्या विचारांना या समूहाने सर्वदूर नेण्यासाठी जलसा यांचा वापर केला. कवनांची रचना केली. म्हणूनच दलित साहित्याचा आरंभबिंदू म्हणून अस्पृश्य समाजातील शाहिरांनी केलेल्या कवनांना देता येईल. पारंपारिक विचारव्यूहात अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याचा विचारमार्ग जो आंबेडकरांनी स्वीकारला होता; तो शाहिरांनी अनेक समूहांपर्यंत पोहोचविला. शाहिरांनी आपल्या कवनांमधून सामाजिक कार्य हाती घेतले. या कवनांनी अस्पृश्य समाजातील लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यास मदत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत हितकारणी सभा'(१९२४), 'समाज समता संघ'(१९२७), 'स्वतंत्र मजदूर पक्ष'(१९३६), अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशन(१९४२) इत्यादींची स्थापना केली. यांमागे त्यांची असलेली भूमिका शाहिरांनी कवनांमधून लोकांपर्यंत पोहोचविली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तिमत्त्व, आदी त्यांचे कार्य यांचा गौरव करण्यासाठी स्तुतिपर कवने ही रचली. आंबेडकरी विचारांचा अवलंब करून कवने रचणारा शाहिरांचा एक मोठा वर्ग याकाळात उदयास आला. किसन फागू बंदसोडे, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम कांबळे, शाहीर धेगडे, केरुबुवा गायकवाड, शाहीर भीमराव कर्डक, अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक आदींनी आंबेडकरी विचारप्रवाहाला, चळवळीला बळकट केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना, परिवर्तनाच्या भूमिकेला अनेक ‘जलसाकारां’नी शब्दबद्ध केले. पोवाडा, गीतरचना, तमाशा, जलसा (पारंपारिक लोककला) यांमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान शाहिर अर्जुन घेगडे, दीनबंधू,केरूबुवा गायकवाड, अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक इत्यादींनी जनमानसापर्यंत पोहोचविले.

## २अ.६ दलित साहित्य

शिक्षित दलित वर्गाने समाजवास्तव प्रखरतेने कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन, आदी साहित्यप्रकारांतून मांडले. त्यातूनच दलित साहित्याचा विकास होत गेला.दलित साहित्याचे पुढीलप्रकारे काही प्रकार कल्पिता येतात.

१) कथनात्मक साहित्य

२)काव्यात्म साहित्य

३) नाट्यत्म साहित्य

४)चरित्र-आत्मकथनपर साहित्य

५)वैचारिक साहित्य

**२अ.६.१ कथनात्मक साहित्य :**

भारतीय चार्तुवर्ण्य व्यवस्थेने'शूद्र' या वर्णातील लोकांनी तीन वर्णांची (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य)सेवा करावी हेच त्यांचे 'कर्म' म्हणून अधोरेखित केले. आणि त्याचे समाजातील स्थान हे कनिष्ठच ठेवले. गुलामगिरीच्या जोखडात त्यांना बंदिस्त करून ठेवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने दलित समाजाला या जोखडातून बाहेर काढले. आणि शिक्षण घेत आपले अनुभवविश्व कथा-कादंबरीच्या कथनातूनत्यांनी व्यक्त केले. कथनात्मक साहित्यातून सामाजिक वास्तवाचे दर्शन घडवत समाजाचे उद्बोधन करणे हा हेतू साधला गेला.

**२अ.६.१.१ दलित कथा -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत असणारे आणि त्यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या अनेकांनी प्रारंभापासून कथा लेखन केले आहे. १९३३ ते १९५८ या काळात 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांतून दलित कथा लेखनाला प्रारंभ झालेला आहे. बंधूमाधव हे सातत्याने कथालेखन करीत होते. तेच दलित कथेचे जनक आहेत, असे म्हणता येईल. त्याची कथा ही वर्णन, घटना, निवेदन करणारी असून आवाहन करणारी देखील आहे. त्यांची पहिली कथा 'जावे त्यांच्या वंशा' (१९३५) ही आहे. 'बंदा गुलाम', 'नवी वाट,बैत्याचा बैल यांसारख्या कथांमधून त्यांनी दलित माणसाचे चित्रण केले आहे.दलित कथाकारांमध्ये अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल हे तीन महत्वाचे शिलेदार म्हणावे, असे आहेत.

अण्णाभाऊ साठे यांनी साधारणत: १९४९ पासून कथालेखनास आरंभ केलेला दिसतो. आशय, विषयाच्या अनुषंगाने त्यांची कथा इतरांपेक्षा वेगळी आहे. त्यांच्यावर मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांचा प्रभाव होता. त्यांनी ग्रामीण जीवन, दलितांची जीवन पद्धती, मुंबईतील दलित वस्त्या आदींचे मार्मिक दर्शन आपल्या कथांमधून घडविले आहे. त्यांचे 'खुळंवाडी' (१९५७), 'बरबाद्या कंजारी' (१९६०), 'भानामती' (१९६२), 'कृष्णाकाठच्या कथा' (१९६४),'गजाआड' (१९६५), 'भुताचा मळा' (१९७५), 'चिरानगरची भुतं' (१९७८) इत्यादी कथासंग्रह आहेत. दलितांच्या वाट्याला आलेले दुःख, जगण्यासाठी त्यांना करावी लागणारी धडपड, पोटाची भूक भागविण्यासाठी त्यांना करावा लागणारा संघर्ष त्यांच्या 'स्मशानातील सोनं', 'भोमक्या', 'मरीआईचा गाडा', 'कोंबडी चोर', 'सुलतान' इत्यादी कथांमधून आलेला आहे.

शंकरराव खरात यांचा 'बारा बलुतेदार' (१९५९) हा पहिला कथासंग्रह आहे. त्यानंतर 'तडिपार' (१९६१),'सांगवा' (१९६२),'टिटवीचा फेरा'(१९६३), 'आडगावचं पाणी' (१९७०), 'माझा काय दोष?' (१९९६), 'स्वातंत्र्य कुणाच्या दारी' (१९९९) इत्यादी कथासंग्रह लक्षवेधक आहेत. शंकरराव खरात यांची कथा ही जुन्या- नव्या विचारांचे दर्शन

घडविणारी जशी आहे; तशी ती जुन्या- नव्या विचारांचा संघर्ष उभा करणारी ही आहे. तसेच त्यांची कथा भटक्या-विमुक्त, गुन्हेगार ठरविल्या गेलेल्या जातीतील लोकांचे जीवन अधोरेखित केले आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर बदलणाऱ्या गावांचे चित्रण करून बदलती गाव संस्कृती उभी केली आहे. उदाहरणार्थ,आडगावचं पाणी', 'गावशिव' हे कथासंग्रह यासंदर्भात पाहता येतील. गावागावांमध्ये महारकी करणारा समूह वतनी कामात कसा गुंतवून ठेवला होता त्याचे चित्रण 'भार', 'कमाई', 'रामा महार', 'सांगावा', 'दौंडी' इत्यादी कथांमधून करतात. दलित समाजाच्या अपमानाचे, हालाखीचे, लाचारीचे, संघर्षाचे दर्शन त्यांच्या कथनांनमधून शंकरराव खरात यांनी केलेले आहे.

दलित विद्रोही कथाकार म्हणून बाबूराव बागूल यांना मानले जाते. अन्याय, अत्याचार,विषमता या विषयाची चीड त्यांच्या कथांमधून प्रत्ययास येते. तसेच आत्मभानाचा स्वर त्यांच्या कथेतून स्पष्टपणे प्रकट झालेला आहे. त्यांचे 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३),'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) हे कथासंग्रह आहेत. त्यांच्या कथेचे वेगळेपण म्हणजे दलितांचे दुःखे अधोरेखित करणे आणि आव्हान देणे, हे आहे. प्रा. बाळकृष्ण कवठेकर त्यांच्या कथेविषयी म्हणतात, "बागुल यांची कथा ही दलित आत्मभानाने मराठी साहित्य सृष्टीतील दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी होय"[१]

बाबुराव बागूल यांच्या कथांमधून शोषित माणसाचे बहुमुखी दुःख रेखाटले गेले आहे. त्यांच्या 'भूक', 'गुंड','आई', 'सक्तमजुरी','जेव्हा मी जात चोरली होती' या कथा अनेक केंद्रानुवर्ती आहेत. त्यांच्या विशेष म्हणजे मानवी मन, त्यातील ताणतणाव, मत्सर, तिरस्कार, वासना, सुष्ट- दुष्ट प्रवृत्ती यांचे चित्रण करणे हा आहे. समाजव्यवस्थेतील शोषण व्यवस्थेचे दर्शन घडवून मुक्तीचा लढा स्वीकारला गेला पाहिजे, हे वैचारिकत्त्व वाचकाच्या मनात निर्माण करणारे आहे.

दलित कथा ही अस्मितादर्श,अस्तित्व,दलित क्रांती, जातक, मागोवा, सुगावा, प्रबोधन लोकायत, धम्मलिपी, जयभीम, सिंहगर्जनाआदी अंकांमधून, नियतकालिकांमधून प्रकाशित झालेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरण, जागतिकीकरण काळात समाज बदलत गेला. त्यामध्ये दलित जीवन ही बदलत गेले.शहर, महानगरांमधील झोपडपट्टीमधील दलितांचे जीवन तेथील वासना, विकार,दारिद्रय यांचे चित्रण दलित कथेने केले आहे. केशव मेश्राम, वामन होवाळ, योगिराज वाघमारे, अर्जुन डांगळे, अविनाश डोळस, दया पवार, माधव कोंडविलकर, आदी कथाकारांनी दलित जीवनाचा वेध दलित कथेतून घेतला आहे. वामन होवाळ यांच्या 'येळकोट' (१९८२), 'वारसदार' (१९८६)इत्यादी कथासंग्रहातून ग्रामीण, शहरी जीवनातील दलित वास्तव अधोरेखित केले आहे. तसेच योगिराज वाघमारे यांच्या 'उद्रेक'(१९७८),'बेगड'(१९८०),'गुडदाणी'(१९८३) हे कथासंग्रह दलित माणूस, समाज बांधिलकी, आत्मशोध अत्यंत प्रभावीपणे रेखाटतात. अर्जुन डांगळे यांनी दलित समाजाच्या रोजच्या प्रश्नांचा शोध कथेतून घेतला आहे. 'बांधावरची माणसं' (१९८१) या कथासंग्रहातून गाव, गावकी, अन्याय, अत्याचार, सवर्णाकडूंन दलितांची होणारी पिळवणूक आदीचे चित्रण करतात.दलित कथा ही माणसाला सन्मान मिळावा यासाठी प्रयत्नशील आहे. ती वास्तवाशी संघर्ष करीत वर्तमान मांडत राहिली. दलितांना सतत संघर्षमय वातावरणात जगावे लागले. जे जगले तेच त्यांनी कथांमधून मांडले, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये.

उर्मिला पवार यांचे 'सहावे बोट' (१९८८), 'चौथी भिंत' (१९९०) या कथासंग्रहातील कथांमधून दलित स्त्रीचे व्यक्तिचित्रण जसे आले आहे, तसेच दलित स्त्रीला आत्मभान प्राप्त व्हावे, तिला माणूस म्हणून जगता यावे या विषयाचे चित्रण येते. भीमसेन देठे यांच्या 'गिऱ्हाणा' (१९८८) या कथासंग्रहात शिक्षित समाज, त्याची मानसिकता, त्यांच्यात होणारे स्थित्यंतर उपरोधिक शैलीत मांडले आहे. अविनाश डोळस यां छाया 'महासंगर' (१९८३) हा कथासंग्रह दलित पँथर चळवळीच्या प्रभावाचा ठसा उमटवणारा आहे. गौतमीपुत्र कांबळे यांचा 'परिव्राजक' (२००५) हा कथासंग्रह आंबेडकरी तत्वज्ञानाचे दर्शन घडविणारा आहे.

एकूणच दलित कथा दलित कुटुंबातील माणसाचे जगणे, त्यांच्या संघर्षमय जीवन प्रवास, त्यांची सुखदुःखे यांचा वास्तव वेध घेते. दलित कथेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उत्कट आविष्कार जाणवतो. दलित कथा पारंपारिक मराठी कथेचा बाज मोडीत काढताना दिसते. स्थलकालनिहाय बोलींचे उपयोजन करून कथेच्या भाषावैभवात लक्षणीय भर घालणारी आहे.

### २अ.६.१.२ दलित कादंबरी -

कथा, कविता, आत्मकथन या साहित्य प्रकारांबरोबरच दलित कादंबरीनेही दलित समाजाचे जीवनानुभव कथन केलेले आहेत. सवर्ण आणि दलित यांच्यातील संघर्ष हिं.गो. बनसोडे यांच्या 'मुक्तिसंग्राम' या कादंबरीत आहे. भारतीय समाजव्यवस्था ही प्राचीन काळापासून चातुर्वर्ण्याधिष्टीत आहे. पेशवाई कालखंडापर्यंत दलित वर्गाचे सर्व प्रकारचे शोषण होत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या दलित वर्गाने या शोषणाला नकार दिला आणि आपल्या दुःखाचे वास्तव असे वर्णन पुढे मांडले आणि आपल्या वर्गाला अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यास बळही दिले. शोषणाचे प्राचीनत्व दलित लेखकांनी कादंबरीतून चित्रित केले. उदाहरणार्थ,'पोखरण','सूड' या कादंबऱ्या यासंदर्भात पाहता येतील.

दलित कादंबरीकार म्हणून अण्णाभाऊ साठे शंकरराव खरात, केशव मेश्राम, नामदेव कांबळे, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर, उत्तम बंडू तुपे, लक्ष्मण गायकवाड,बी. रंगराव, भीमसेन देठे आदीं यांचे कादंबरीलेखन पाहावे लागेल.अण्णाभाऊ साठे दलित माणसाच्या जीवनाचे त्याच्या कथा वेदनांचे चित्र आपल्या कादंबरी लेखनात करतात. उदा. 'फकीरा', 'वैर', 'अलगूज','कुरूप','रानबोका' इत्यादी. अण्णाभाऊ साठे हे एक लोकप्रिय कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी ग्रामीण अनुभवविश्व आणि दलित जीवन यांची सांगड आपल्या कादंबरी लेखनात घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

शंकरराव खरात यांनी 'माणुसकीची हाक', 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'गावचा टिनपोल गुरुजी', 'पारधी', 'बऱ्याची दिंडी' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ते साधारणत: शहरी स्थलावकाशातील बकाल वस्त्यांमध्ये राहणारा दलित समूह आणि त्याचे जगणे आपल्या लेखनातून दर्शवितात. 'झोपडपट्टी', 'हातभट्टी','फुटपाथ नं.१' या कादंबऱ्या झोपडपट्टीतील भीषण वास्तवता वाचकासमोर ठेवतात. 'माणुसकीची हाक' या कादंबरीत दलित विरुद्ध सवर्ण असा संघर्ष कल्पिला गेला आहे. हा संघर्ष वास्तव समाज जीवनाला साकारणारा आहे.

'पोखरण','हकिकत', 'जटायू' या कादंबऱ्या लिहिणारे केशव मेश्राम एक महत्त्वपूर्ण कादंबरीकारआहेत. त्यांची 'पोखरण' ही कादंबरी प्राचीन कालापासूनच्या शोषणव्यवस्थेचे दर्शन घडविते. सामाजिक,आर्थिक, धार्मिक स्तरावरील विषमतेचे चित्रण ते जसे करतात तसेच ते माणूस म्हणून आपला जगण्याचा हक्क आहे, याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करतात. बाबूराव बागूल यांनी दलित कादंबरी लेखनाला एक नवी दृष्टी, नवी दिशा दिली, त्यांची 'सूड'ही लघुकादंबरी 'काल'च्या जीवनापासूनचे दुःख ते 'आज'च्या अवकाशातील आपले जगणे आणि त्यातून सुखाचा मार्ग शोधण्याचा प्रवास कसा सुरू झाला आहे. या विषयीचे चिंतन साकारले आहे. तसेच नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळी', सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र', नामदेव कांबळे यांची 'राघववेळ', योगेंद्र मेश्राम यांची 'माझ गाव कुठाय?', विजय शिरसाट यांची 'कुस्ती' या कादंबऱ्या काल, आज आणि उद्याचे अवकाशातील दलितांचे जीवन कसे आहे आणि कसे असावे याविषयीचे दर्शन घडवितात. माधव कोंडविलकर यांच्या 'अनाथ','अजून उजाडायचं आहे','छेद' या कादंबरीमधून दलितांचे वास्तवजीवन चित्रित केले आहे. माई तांबे यांची 'नियती' ही कादंबरी कोकणातील दलित जीवनाचा वेध घेते. भीमसेन देठ यांची 'चक्री' ही कादंबरी १९९४ च्या जळगाव वासनाकांडातील स्त्रियांचे हलाखीचे, त्याच्या उद्ध्वस्त होण्याचे दर्शन घडविते.

एकूणच दलित कादंबरी ही रंजनवादाच्यापलीकडे जाऊन वास्तवपूर्ण असे जीवन साकारण्याचा प्रयत्न करणारी आहे. परंपरानिहाय वाट्याला आलेल्या जीवनाचा वेध घेत वर्तमानातील दुःखाकडून भविष्यातील सुखाचा शोध घेऊ पाहणारी आहे. तसेच दलित कादंबरी काहीशी 'स्व कथनात' गुंतलेली जाणवते.

### २अ.६.२ काव्यात्म साहित्य :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होत आणि जाणीवपूर्वक सामाजिक स्थितीगती, धर्म- समाजव्यवस्था याबरोबरच परिवर्तनाची भूमिका घेऊन दलित कविता पुढे आली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तरकालीन अनेक कवींनी आपल्या कवितेतून सामाजिक जीवन, अन्याय, अत्याचार, अधोरेखित करीत विद्रोह, संघर्ष मांडला. तसेच समतेचा आशावादही व्यक्त केला. १९६०ते १९८० या काळातील केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, वामन निंबाळकर, ज.वि.पवार, यशवंत मनोहर, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, आदी कवींनी समाजवास्तव मांडलेआहे. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतील जीवनाचे दर्शन त्यांनी कवितेमधून घडविले आहे. दारिद्र्य, उपासमार, निराशा, अगतिकता, भूकेला समाज, याचे स्फोटक चित्रण केले आहे. त्यातून एका बाजूला अत्यंत गरिबीत, दारिद्र्य अवस्थेत जगणारा समाज आणि दुसऱ्या बाजूला अत्यंत सधन, सुखी असलेला समाज अधोरेखित केला आहे. सामाजिक-धार्मिक-आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या समाज दलित कवितेतून साकारला आहे. हे वास्तव चित्रण दलित कवींनी केलेले आहे.

दलित कवितेने 'शोषणाविरुद्धची बंडखोरी' स्वीकारणे आणि जातिव्यवस्थेला, पारंपरिक मूल्यांना नकार देणे स्वीकारलेले दिसते. दलित कवितेने नवतेचा, विज्ञानचा पुरस्कार केला.



munotes.in

उदाहरणार्थ,

'मी झुगारून दिली आहे कर्मविपाकाची नियती

अंगावरील सर्व लक्तरे फेकून

मी झालो गर्भाशयातून बाहेर पडणाऱ्या लहानुल्या

मुलासारखा नवा' (नवा जन्म, नामदेव ढसाळ)

किंवा

'सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला

आता अंधार यत्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे'

(आता- नामदेव ढसाळ)

दलित साहित्य हे वेदना, विद्रोह यांचे चित्रण करते. आपल्या समाजाची परंपरागत स्थिती कवींनी कवितेतून मांडली आहे. वामन निंबाळकर' गावकुसाबाहेरील कविता' या काव्यसंग्रहात दलितांच्या वाट्याला जे हलाखीचे, दारिद्र्याचे, दुःखाचे जीवन आले ते त्यांनी कवितेतून व्यक्त केले आहे.

उदाहरणार्थ,

'अंधार पचवुनी अवघा

दुःखाचे ओझे पाठी

त्या गावकुसाबाहेरी

ते जगती दुसऱ्यांसाठी'(माय, वामन निंबाळकर)

सभोवतालचा समाज, वास्तव आणि दलितांचे दुःख अनेक कवितांमधून उद्धृत झालेले आहे. दुःखाला वाचा फोडणे, समाजव्यवस्थेला नकार देत बंड पुकारणे, विद्रोहाचे रुप स्वीकारणे ही भूमिका दलित कवींनी घेतलेली दिसते.

उदाहरणार्थ,

'ज्यांनी इथल्या सूर्याला,दगडांनाही

ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले

संचित निश्चित केले

त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो.

ते सर्व देवदैवत माझे वैरी आहेत

ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली, तिची मधुर ओवी केली.

ते शब्द प्रामाण्यवादी सगुणनिर्गुण वैरी आहेत माझे

ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही.'

(वैरी,यशवंत मनोहर)

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले आहे. दलित स्त्रीचे जगणे ही त्याच स्वरूपाचे राहिलेले आहे. स्त्रीवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे विस्तृत चित्रण हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मलिकाअमर शेख, उर्मिला पवार, संध्या रंगारी, प्रज्ञा दया पवार, उषा अंभोरे, कविता मोरवणकर, आशालता कांबळे आदी कवयित्रीने केलेले आहे. दलित स्त्रीचे व्यक्तिमत्व,स्त्री संबंधीच्या समजुतींना त्यांनी चिंतनपूर्वक मांडली आहे. स्त्रीच्या शोषणाच्या विविध तऱ्हा समर्थपणे हिरा बनसोडे, प्रज्ञा दया पवार, मलिका अमर शेख, कुमुद पावडे आदींनी व्यक्त केल्या आहेत. जात समाज,संस्कृती यांचा दलित कवयित्री धिक्कार करताना दिसतात.

उदाहरणार्थ,

'या देशाच्या महान संस्कृती.

तुला कोपरापासून नमस्कार....!

जगातील अतिप्राचीन नि उच्च संस्कृती म्हणून

तुला अभिवादन करायला नाही विसरलो

पण आज पाठ्यपुस्तकातल्या

खोट्या वर्णनांची चीड येते

नि तुला आई म्हणताना आम्हाला लाज वाटते.

तू आई  असलीस तरी

आमच्याशी केलेस सावत्रपणाचे विषम राजकारण...

हे संस्कृती आमचं माणूसपण तू पिंजून पिंजून काढलेस

ज्वालामुखीचा नांगर आमच्या घरादारावर फिरवलास.

आम्ही राख राख झालो,बेचिराख झालो.' (संस्कृती- हिरा बनसोडे)

१९८० नंतरच्या दलित कवितेत सामाजिक भान, अंतर्मुखता, मानवी मूल्यांचा उद्घोष, आशयघन प्रतिमा आणि अर्थाचे सूचन करणारी आहे. अरुण काळे यांचे 'रॉकगार्डन' (१९९३), 'सायरनचे शहर'(१९९७), 'नंतर आलेले लोक' (२००६), 'ग्लोबलचं गावकुस' (२००८) हे चार कविता संग्रह आहेत. आधुनिकीकरण, जागतिकीकरणाचा वेध घेत सामान्य, गरीब दलितांचे जीवन अधोरेखित करतात. लोकनाथ यशवंत यांचे 'आता होऊन जाऊ द्या' (१९८९), 'शेवटी काय झाले'(१९९६), 'पुन्हा चाल करू या' (२००९) या काव्यलेखनातून काल आणि आजच्या परिप्रेक्ष्यातील  दलितांचे जीवन, त्यांचे शोषण यांचा परामर्श घेणारे आहे. दलित कवितेने नव्याचा स्वीकार करीत नवनवीन प्रयोग केलेले दिसतात. कवितेची आशयाभिव्यक्ती, तिचे शीर्षक या अनुषंगाने केलेले प्रयोग लक्ष वेधून घेणारे आहेत. उदाहरणार्थ, उत्तम अंभोरे यांचा 'पत्ता बदलत जाणारा गणीम' (२०००) हा काव्यसंग्रह पाहता येईल. तसेच उत्तम कांबळे यांचा 'जागतिकीकरणात माझी कविता (२००६) हा काव्यसंग्रह नव्या काळासोबत येणारी नवी आव्हाने समोर ठेवणारा आहे.

munotes.in

एकूणच १९८० नंतरची कविता ही दलित कवितेला समृद्ध करणारी आहे. 'काल' आणि 'आज'चे निरीक्षण करीत समकालीन जीवनसंस्कृतीचे अनेक पदर उलगडण्याचा प्रयत्न करणारी आहे. तसेच बुद्धतत्त्वज्ञानाचा कलात्मक आविष्कार घडवित वैश्विक जाणिवांना व्यक्त करणारी आहे, असे म्हणता येईल.दलित कविता ही पारंपरिक मराठी कवितेपेक्षा आशय आणि अभिव्यक्तीदृष्ट्या भिन्न आहे. मराठी कवितेचे दालन तिने व्यापक केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या कवितेचे प्रेरणास्थान अनेक कवींनी मानलेले आहे. ते त्यांच्या कवितांमधून व्यक्त झाले आहे. पारंपरिक मराठी कवितेतील चाकोरीबद्ध अनुभवविश्व नाकारत प्रभावीपणे आपल्या समूहाचे प्रत्ययकारी जीवनदर्शन घडविले हे तिचे वेगळेपण आहे.

### २अ.६.३ नाट्यात्म साहित्य :

दलित रंगभूमी ही प्रामुख्याने लोकरंगभूमीतून उदयास आलेली आहे. प्रारंभीचे जलसे हे दलित रंगभूमीचे उगमस्थान म्हणता येईल. दलित नाटक आणि रंगभूमी याविषयी अनेकांनी मत-मतांतरे मांडली आहेत. दत्ता भगत आपल्या व्याख्येत म्हणतात, "आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टीकोनाच्या आधारे स्वतःला स्वतःभोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याचा उत्कट इच्छाशक्तींचा अविष्कार म्हणजे दलित नाटक होय"[२]प्रा. भगवान ठाकूर रंगभूमीविषयी म्हणतात, "दलितांनी,दलितांसाठी,दलितांचे, दलितत्व दूर व्हावे म्हणून केलेला नाट्यधर्मी अविष्कार म्हणजे दलित रंगभूमी"[३]

आपणास पुढीलप्रमाणे दलित नाटकाची व्याख्या करता येईल.

'जागतिक पातळीवर प्रस्थापिताकडून, उच्चभ्रू समजल्या गेलेल्या व्यक्तीकडून समाजाकडून, वर्णाच्या, जातीच्या, धर्माच्या नावाने शोषल्या गेलेल्या वेदनांचा दाहक आविष्कार लोकधर्मी नाट्यविष्कारातून व्यक्त होते, त्याला दलित नाटक असे म्हणता येईल.'

दलित नाट्यसृष्टीचे ऊर्जास्त्रोत हे प्रामुख्याने महात्मा फुले यांचे 'तृतीयरत्न' (१८५५), सत्यशोधक जलसे (१९१० ते १९३०), आंबेडकरी जलसे (१९३१ ते १९५६ ), प्राचार्य म. भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' (१९५५) हे होत. याच ऊर्जास्रोतातून अनेक नाटके उदयास आली. यामधूनच १९७९साली दलित रंगभूमीआणि १९८० मध्ये औरंगाबाद येथे दलित थिएटरची स्थापना झालेली दिसते.१९८३ मध्ये औरंगाबाद येथे अखिल भारतीय दलित नाट्य परिषदेची स्थापना झाली. १९८४ मध्ये पहिले दलित नाट्य संमेलन भि. शि. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. १९८० ते १९९० या दशकात दलित नाट्यसृष्टी जोमाने बहरू लागलेली दिसते. इ. स २००० च्या सुमारास दलित नाट्यपरिषदेच्या नामांतराचा विचार पुढे आला आणि २००३ मध्ये दलित नाट्य परिषदेचे अखिल भारतीय बोधी नाट्यपरिषद व बोधी रंगभूमी असे नामांतर मुंबई येथे करण्यात आले.दलित रंगभूमी ही जनजागृती आणि आत्मभान जागे करून पाहणारी आहे. दलितेतर रंगभूमीचे लोकरंजन हे वैशिष्ट्य आहे तर दलित रंगभूमी लोकशिक्षण देऊ पाहते.हा फरक लक्षात घेतला तर दलित रंगभूमी आशयाला प्राधान्य देऊन आपलावेगळेपणा सिद्ध करते.

१९८० नंतरच्या काळात दलित नाटकांनी पारंपरिकतेपेक्षा वेगळी वाट स्वीकारण्याचा प्रयत्न केलेला आहे.जसे 'जय जय रघुवीर समर्थ' (१९८६), 'पांढरा बुधवार' (१९९५), 'गांधीआंबेडकर' (प्रेमानंद गज्वी); 'कोण म्हणत टक्का दिला' (संजय पवार); 'दोन अंकी नाटक' (रामनाथ चव्हाण); 'वाटा-पळवाटा' (१९९१), 'खेळीया' (१९८२) (दत्ता भगत) यासारख्या नाटकांमधून पात्रांच्या मानसिकतेचे भडक चित्रण नाकारून त्यांच्या मानसिकतेतील अंतर्विरोध, तर्कविसंगतता, आपमतलबीवृत्ती, विषमताधिष्ठित मन या नाटकांमधून व्यक्त केलेले दिसते. त्याचा सकारात्मक एक परिणाम म्हणजे सवर्ण प्रेक्षकांना स्वत:च्या मानसिकतेचे पुनरावलोकन करण्यास, चिंतन करण्यास प्रवृत्त करते. ही नाटके ज्याप्रकारे सवर्णाची मानसिकता अधोरेखित करतात. तसेच काही दलित नाटकांमधून आधुनिकीकरणामुळे, जागतिकीकरणामुळे दलित मानसिकतेत होणारा बदल त्यांचे आंतरिक द्वंद्व ही अधोरेखित करतात. उदा. 'वाटा-पळवाटा' या नाटकात सवर्णा सारखे तत्त्वशून्य जगणे आणि स्वतःच्या मूळ पिंडाचा विसर पडणे. तसेच 'प्रकाशपुत्र' (१९९२), 'जाता नाही जात' (२००७), या नाटकांमधून स्वतःची जात लपविणारे दलित इत्यादींचे चित्रण नाटकातून होताना दिसते. यासारख्या नाटकांमधून नाटककार आत्मविश्लेषण, आत्मपरीक्षण आणि मानवेतर आधारित व्यापक विचार यावर लक्ष केंद्रित करू पाहताना दिसतात.

दलित नाटककार सामाजिक प्रबोधनातून सामाजिक परिवर्तन घडून आणू पाहतात. आणि या परिवर्तनातूनच जागृती आणि जागृतीतून आनंद मुक्तीचा लढा उदयास येऊन मानवतावादी दृष्टिकोनाची निर्मिती करण्याचा प्रयत्न करतात. दलितांना 'माणूस' म्हणून पाहून माणसाने माणसासारखे वागावे या मानवी मूल्यांची जोपासना करावी हा प्रबोधनाच्या परिवर्तनाचा संदेश दलित नाटक देताना दिसते. जगातील शोषितांचे दुःख उजागर करण्याची प्रवृत्ती दलित नाटकात आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. दलित नाटकाने जीवनवादी भूमिका स्वीकारलेली आहे. लोकरंजन, कलावाद याला दुय्यम स्थान देऊन प्रबोधनाला अग्रस्थान दिले आहे. परिवर्तनवादी नवी जाणीव दलित नाटकात पाहावयास मिळते. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत अशी जाणीव दलित नाटकात आहे. हा या दलित नाटकाचा विशेष आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील समता स्वातंत्र्य, न्याय, मानवता याचे समर्थन करून दलितांमध्ये आत्मभान जागृत करून आत्मशोध घेण्यास प्रवृत्त दलित नाटक करताना दिसते. पारंपरिक नाट्यसृष्टीला छेद देत परिवर्तनशील आणि प्रबोधनवादी ठरून दलित जीवनातील अनेक समस्यांची, प्रश्नांची उकल करीत कलात्मक मांडणी करते.

जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांच्या नावाखाली शिक्षण, नोकरी ,राजकारण इत्यादी क्षेत्रांमध्ये दलितांची चालवलेली कोडी नाट्यारूपाने अनेक विषयांमधून व्यक्त होताना दिसते. दलित नाटकाने सर्व समाजातील शोषितांना समजावून घेतले आहे. अस्पृश्य, वेठाबिगारी, भूमिहीन, मोलमजूर, कष्टकरी, स्त्रिया इत्यादींना आपल्या नाटकाचे विषय केले. उदा. 'किरवंत' (१९९१) (मर्तिकाचे काम करणार ब्राह्मण), 'देवनवरी'(१९८१) (देवदासी स्त्रिया), 'तनमाजोरी' (१९८५) (वेठबिगार) इत्यादी. दलित नाटकामध्ये पाण्याचा, शिक्षणाचा, शोषणाचा, अस्तित्वाचा, नामांतराचा इत्यादी प्रश्नांची मांडणी प्रभावीपणे केलेली दिसते. तसेच खुर्चीसाठी वेठीस धरणाऱ्या, दलितत्वचा बाजार मांडणाऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने त्यांच्या आदर्श विचारांचा बट्टयाबोळ

करणाऱ्या, दलितांच्या अस्तित्वाला स्वातंत्र्याला धक्का देणाऱ्या, मतलबीवृत्तीच्या विविध अंगांचा दलित नाटक वेध घेत उभे राहताना दिसते. उदाहरणार्थ, 'घोषणा' (संजय जीवणे), 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंदोर' (धर्मेश सोनटक्के), 'बामनवाडा' (रामनाथ चव्हाण), वाटा-पळवाटा' (दत्ता भगत), 'शहर' (अमर रामटेके), 'घोटभर पाणी' (प्रेमानंद गज्वी) इत्यादी.

संघर्ष हा नाटकाचा एक अविभाज्य घटक असतो. दलित नाटकातही तो ओतप्रोत आहे. दलित नाटकातील संघर्ष हा माणसापेक्षा शोषणव्यवस्था आणि प्रवृत्ती याविषयीचा आहे. स्व आणि स्वेतर समाजातील शोषकांशी  चाललेला संघर्ष दलित नाटकामध्ये व्यक्त होताना दिसतो. सर्वसामान्यचे दलितांचे शोषण करणाऱ्या ब्राहमण्यप्रवृत्तीच्या व्यक्ती अधिक आहेत हे दलित नाटकामधून व्यक्त झाले आहे. उदा. 'काळोखाच्या गर्भात', 'झुंबर', 'वाटा-पळवाटा', 'खेळीया', 'किरवंत', 'आम्ही देशाचे मारेकरी' इत्यादी. ब्राहमणी कसब खोडून काढणे कसे आवश्यक आहे, हे पात्राच्या माध्यमातून जनमानसात रुजविण्याचा प्रयन्त नाटककार करतात. सावकार, मालक, सरंजामी पाटील याच्यासारखे सत्तारूढ आणि आर्थिक सुबत्ता असलेले लोक वर्षानुवर्ष दलितांना गुलामी करण्यास भाग पडतात आणि तेच त्याचे शोषक आणि शोषणकर्ता असतात या सर्व व्यवस्थेमध्ये माणूस 'माणूसपण' हरवत चाललेला दिसतो. त्यामुळे एकूणच, जगावं कसं? हा प्रश्न गरीबांसमोरउभा असलेला दिसतो. उदा. 'तनमाजोरी', 'कारान','अकींचन' इत्यादी नाटकातून याचा प्रत्यय येतो.

जागतिकिकरणाच्या वेढ्यात अडकत चाललेला माणूस हा स्वतः मधील 'माणूसपण' विसरत चालला आहे. त्यामुळे त्याला दुसऱ्याचे दुःख, दारिद्र्य, उदासनिता दिसत नाही. चंगळवादी संस्कृतीत तो स्वतःला गुरफटून घेतो आहे. चंगळवादी संस्कृतीततो निम्न थराला जाण्याची तयारी दर्शवितो आहे. त्याचे बळी गरीबच ठरत आहेत. उदा. 'आम्ही देशाचे मारेकरी' मधील पुढील संवाद या संदर्भात लक्षात घेता येईल.

"....... तुम्ही मनुष्य म्हणवून घ्यायला देखील नालायक आहात.  तुम्ही मानव नाही, मानवाची कातडी पांघरलेले पशु आहात पशु!" (आम्ही देशाचे मारेकरी, टेक्सास गायकवाड पृ.५२.५३)

दलित नाटकाने समाजातील अनेक समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच या समस्यांवर उपाय शोधण्याचे कार्य करीत समाजप्रबोधन करण्याचे कार्य ही केले आहे. हे दलित नाट्यसृष्टीचे सौंदर्येत्तर कार्य आहे.

दलित नाटकाने दलितांमधील गटबाजी, स्वार्थी प्रवृत्ती, फसवे नेतृत्व, भ्रष्टाचार, व्यसनाधिनता, कर्जबाजरीपणा, बुद्ध-फुले-आंबेडकरी विचाराचा स्वार्थासाठी केला जाणारा उपयोग, न्यायाचा, आरक्षणाचा प्रश्न, अध्यापन क्षेत्रातील भ्रष्टवृत्ती यासारखे अनेक विषय दलित नाटकाने आपल्या कवेत घेतले आहे. स्वार्थाने जगणाऱ्या, आपला म्हणून असतानाही आपला विश्वासघात करणाऱ्या माणसाला नाटककार फटकारताना दिसतो. सद्यकालीन जीवनातील अपमातलबीपणाने वागणाऱ्या माणसाचे चित्रण दलित नाटककार करतात. उदाहरणार्थ, 'खेळीया' नाटकातील पुढील संवाद पाहता येईल.

"दादासाहेब, आम्हाला धोका आहे, तो तुमच्या सारख्यापासून, ओठावर आमचे करण्याचे शब्द आणि कृतीने कत्तलखोर" (खेळीया, दत्ता भगत, पृ ६४,६५)

आजच्या जागतिकिकरणाऱ्या मूल्यहीन समाजात दलित नाटक मानवी मूल्यांची पेरणी करते. माणूसपणा हरवलेल्या या संस्कृती माणूसपण जागं करण्याचा प्रयन्त करते. उदा 'बामणवाडा'नाटकातील पुढील संवाद पाहता येईल.

"आपण एकमेकांना माणूस म्हणून स्वीकारू आणि आपणच आपला नवा समाज निर्माण करू.जिथे जाती,पोटजाती,पोटजातीच्या भींती नसलेले वाडे असतील आणि त्यात राहतील फक्त माणूस नावाच्या स्त्रिया आणि पुरुष नावाची माणसं" (बामनवाडा, रामनाथ चव्हाण, पृ. ८३)

आजच्या आधुनिक तंत्रयुगात जो-तो आपल्या भौतिक सुखाला प्राधान्य देतो आहे. कोणत्याही भावभावना जपायला कोणालाही वेळ नाही अशी स्थिती निर्माण होत आहे.याचे चित्रण दलित नाटकाने केलेले आहे. उदा. 'जाता नाही जात' नाटकातील कांबळे म्हणतात, "भौतिक प्रश्नांपेक्षा कोणी भावनिक प्रश्न मोठे करू नयेत." (जाता नाही जात, सिद्धार्थ तांबे, पृ. ३२)

आधुनिकिकरण, जागतिकीकरण यांमुळे मानव अधिकाधिक चंगळवादी, मूल्यहीन, भावनाशून्य, असंवेहनशील होत आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात भावनेला स्थान नाही. भौतिक सोयी-सुविधांनीयुक्त आपले जीवन जगण्याकडे मानवाची वृत्ती असल्याचे दिसते. हे दलित नाटकाने प्रत्ययास आणून देण्याचा प्रयन्त केला आहे. आणि त्याचबरोबरच मानवी मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहनही ते करताना दिसते.हे त्याचे महत्वपूर्ण कार्य म्हणता येईल.

### २अ.६.३आत्मकथनपर साहित्य :

आत्मकथन हे मुख्यत्वे भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्याशी नाते सांगणारे आहे; तसेच ते भविष्यकाळाला अधोरेखित करणारे आहे. आत्मकथनांमधून सभोवताल आणि स्वबरोबर समाजजीवन मांडले गेले. दलित आणि दलितेतर समाज, व्यक्तिगत आणि समूहजीवन प्रभावीपणे दलित लेखकांनी साकारले आहे. कारण दलित व्यक्तीच्या वाट्याला कशाप्रकारचे जीवन आले, त्याला दलितेतर  समाजाने कशाप्रकारची वागणूक दिली याचा प्रयत्न समाजाला करून देणे हा उद्देश दलित आत्मकथनांमागे राहिलेला दिसतो. डॉ. विलास खोले दलित आत्मकथनाविषयीची व्याख्या करताना म्हणतात, "आंबेडकरी विचारांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रभावामुळे आत्मभान जागे होऊन ज्या पूर्वा स्पृश्याना स्वतःला व स्वत: भोवतालच्या वास्तवाला जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली आणि त्या प्रेरणेच्या दिशेने स्व-विकासाची कथा सांगता पूर्वायुष्यातील दुःस्थितीची त्यांनी केलेली शब्दांकने, म्हणजे दलित आत्मकथने, असे म्हणता येईल."

दलित आत्मकथनांमध्ये दलितवर्गालाकरावी लागणारी मेहनत, त्यांची उपासमार, त्यांच्यावर झालेले अन्याय-अत्याचार,असहाय्यता,गुलामगिरी इत्यादींचे वर्णन आलेले आहे. दया पवार यांचे 'बलुतं' (१९७८)  हे मराठीतील पहिले दलित आत्मकथन आहे. या आत्मकथनाने एकूणच मराठी साहित्यजगतात मानाचे स्थान प्राप्त केले. त्यानंतर अनेक आत्मकथने लिहिली गेली. शंकरराव खरात यांचे 'तराळ-अंतराळ', बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं', शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जन्माच्या चित्तरकथा',प्र.ई.सोनकांबळे यांचे



munotes.in

‘आठवणींचे पक्षी’,माधव कोंडविलकर यांचे ‘मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे’, लक्ष्मण माने यांचे ‘उपरा’, शरणकुमार लिंबाळे यांचे ‘अक्करमाशी’, लक्ष्मण गायकवाड यांचे ‘उचल्या’, किशोर काळे यांचे ‘कोल्हाट्याचे पोरं’, सिंधुताई सकपाळ यांचे ‘मी वनवासी’, उर्मिला पवार यांचे ‘आयदान’, मंगला केवळे यांचे ‘जगायचंय प्रत्येक सेकंद’ आदी दलित आत्मकथने लिहिली गेली आहेत.

आत्मकथने ही स्व आणि स्वेतर समाजाचे जीवन अधोरेखित करून प्रबोधनकार्य करतानादिसतात.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे दलित समाजाने जो नवा जीवनार्थ अनुभवला त्याचे चित्रण ती करतात.आणि नवी समाजव्यवस्था प्रस्थापित व्हावी यांचे सूचन करताना दिसतात. जे घडले, सोसले ते जसेच्या तसे कथन करावे ही आत्मकथनांची भूमिका राहिलेली दिसते. आत्मकथनकार जीवनाशयाचे कथन करीत समाजाच्या जीवनधारणांना अभिव्यक्त करतात.

### २अ.६.४ वैचारिक साहित्य – समीक्षा :

मराठी वैचारिक साहित्याला एक दीर्घ परंपरा आहे. या परंपरेत दलित साहित्यातील वैचारिक साहित्याने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून वैचारिकता, तत्वज्ञान, जीवनोपयुक्त असे विचार व्यक्त झालेले आहेत. महात्मा फुले यांचे 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड, 'ब्राह्मणांचे कसब' हे लेखन दलित चळवळीला वैचारिक दिशा देणारे ठरले, तसेच ते दलितांची स्थितीगती अधोरेखित करणारे ही आहे. 'हू वेअर द शुद्राज', 'दी अनटचेबल्स' हे डॉ.आंबेडकरांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आणि ‘मूकनायक’, ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ ही नियतकालिके वैचारिक दृष्टीने लेखन करणारे साहित्य म्हणून महत्त्वाचे आहे. तसेच विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'भारतीय अस्पृश्यता', रा. ठ. इंगळे यांचा 'महाराजांचा सांस्कृतिक इतिहास', डॉ. सदा कऱ्हाडे यांचा बुद्धवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, सुनील सोनवणे यांचा आंबेडकरी साहित्य आणि तत्वज्ञान, यशवंत मनोहर यांची आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य', 'आंबेडकरी आस्वादक समीक्षा'; रा. ग.जाधव यांचा 'निळी पहाट', निळी क्षितीजे हे ग्रंथ, म.ना. वानखेडे यांचा 'दलित विद्रोही वाड़मय', अर्जुन डांगळे यांचा 'दलित साहित्य एक अभ्यास', शंकरराव खरात यांचा 'दलित वाङ्मयीन प्रेरणा व प्रवृत्ती, आदी ग्रंथसंपदा वैचारिक दृष्टिकोनातून निर्माण झालेली दिसते. त्यातून सिद्धांतने, वैचारिक भूमिका, साहित्य संकल्पना, विचारतत्वे सुस्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दलित साहित्य समीक्षा अनेक नियतकालिकांमधून करण्यात आलेले आहे. प्रतिष्ठान, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, युगवणी, अस्मितादर्श, सुगावा यांसारख्या नियतकालिकांनी दलित साहित्य समीक्षेला प्रकाशित केलेली आहे.ही साहित्यसमीक्षा दलित चळवळीला, साहित्याला पूरक ठरली आहे. तसेच अनेक समीक्षकांनी अनेक समीक्षाग्रंथ लिहून दलित साहित्यसमीक्षेत मोलाची भर घातलेली आहे. डॉ. गंगाधर पानतावने यांचा ‘दलितांचे प्रबोधन', 'मूल्यवेध', 'दलित वैचारिक वाङ्मय'; बाबूराव बागूल यांचे 'दलित साहित्य: आजचे क्रांतीविज्ञान'; केशव मेश्राम यांचे ‘शब्दांगण’, 'समन्वय', शब्दव्रत;डॉ. यशवंत मनोहर यांचे 'स्वाद आणि चिकित्सा, समाज आणि साहित्यसमीक्षा, 'दलित साहित्यचिंतन; दत्ता भगत यांचे 'दलित साहित्य: दिशा आणि दिशांतर,निळी वाटचाल; वामन निंबाळकर यांचे

साठोत्तरी मराठी कवितेत आंबेडकरदर्शन, दलित साहित्य: एक वाड्मयीन चळवळ इत्यादी समीक्षकांनी लिहिलेली समीक्षा ही दलित चळवळ आणि दलित साहित्य यांचा सांधा बांधण्याचा प्रयत्न करणारी आहे. एकूणच, दलित साहित्य विचारआणि दलित समीक्षा ही दलित साहित्यात महत्त्वपूर्ण मोलाची भर घालणारी आहे.

## २अ.७ दलित साहित्याची वैशिष्ट्ये

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हाआणि संघर्ष करा' या त्रिसूत्री बरोबरच प्रज्ञा, करुणा, शील या तत्वत्रयीचा ठसा दलित साहित्यात उमटलेला दिसतो.

२) वेदना, विद्रोह, नकार,विज्ञाननिष्ठा, मानवता यांचा पुरस्कारदलित साहित्याने केलेला आहे.

३) दलित साहित्य हे वास्तववादी आहे. ते पारंपरिक मूल्यव्यवस्थेला नकार देते.

४) दलित साहित्य महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिवर्तनवादी विचारांवर विश्वास ठेवणारे आहे. आणि समाजपरिवर्तन व्हावे हा आशावाद बाळगत समतेचा पुरस्कार करणारे आहे.

५) दलित साहित्य आत्मशोध घेत आत्मभान देऊ पाहते. आणि आत्मसन्मानाने जगण्याची दृष्टी देते.

## २अ.८ समारोप

दलित साहित्यामधून नव्या जाणिवा अधोरेखित झालेल्या आहेत. शंकरराव खरात म्हणतात, "हिंदू धर्मातील चातुर्वण्याने, परंपरागत रूढीने, दलित माणसाला दास्यात, अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत डांबले, बंदिस्त केले होते. गुलामगिरीतील या जिण्यामुळे दलितांना अपमानाचे, अवहेलनेचे जिणे जगावे लागत होते. म्हणून दलितांत या दास्याच्या, अस्पृश्यतेच्या जीवनाबद्दल चीड, संताप, निर्माण झाली. ही गुलामगिरी निर्माण करणारी शतकानुशतकांची वर्णाश्रमधर्मव्यवस्था,जातिव्यवस्था आणि प्रस्थापित परंपरा यांचा दलित साहित्याने निषेध केला. त्याला नकार दर्शविला आणि त्याच प्रेरणांतून दलित साहित्याने माणसाच्या मुक्तीसाठी विद्रोही बंडाचा आवाज उठवला : दलितांच्या जाणिवातून निर्माण झालेल्या दलितांच्या साहित्यिक कलाकृती सत्यार्थाने वास्तववादी व जीवनवादी आहेत." या साहित्याची समाज परिवर्तन ही भूमिका राहिलेली आहे. त्यामुळेच दलित साहित्य जागतिक साहित्य विश्वातही आपले स्थान निर्माण करीत आहे.असे असले तरी मराठी पांढरपेशी समीक्षकांनी मात्र त्यांच्या साहित्याला फारसे स्थान दिलेले दिसत नाही.मुख्यत्वे दलित साहित्य हे वास्तवाचे दर्शन घडवून विचारमंथन घडवून आणणारे साहित्य आहे. त्यामुळे समीक्षकांनी या साहित्याचा सामाजिक, वाङमयीन आणि सौंदर्यशास्त्रीय अंगाने चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक आहे.

munotes.in

## २अ.९ संदर्भ

१. कवठेकर बाळकृष्ण,दलित साहित्य: एक आकलन, अजब प्रकाशन, कोल्हापूर,१९८१, पृ.५४

२. भगत दत्ता, दलित साहित्य दिशा आणि दिशांतर, पृ.९१

३. स्मरणिका, सातवे अ. भा. दलित नाट्यसंमेलन, धुळे, पृ.३२

४. खरात शंकरराव, दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधु प्रका. पुणे, १९७८, पृ.१२३

## २अ.१० स्वाध्याय

१. दलित चळवळीचे स्वरूप लिहा.

२. दलित कथनात्म साहित्य सांगा

३. दलित काव्यात्म साहित्याचा परिचय करून द्या.

४. दलित साहित्याची वैशिष्टे सांगा.

५. मराठी दलित साहित्य सोदाहरण स्पष्ट करा.

## २अ.११ अधिक वाचन

- निळी पहाट – रा. ग. जाधव
- आंबेडकरवादी मराठी साहित्य –यशवंत मनोहर
- दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान – बाबुराव बागूल

❖❖❖❖

munotes.in

# २ब

## 'भाई तुम्ही कुठे आहात!'

**घटक रचना :**

२ब.० उद्दिष्टये

२ब.१ प्रस्तावना

२ब.२ विषय विवेचन

२ब.३ सारांश

२ब.४ प्रश्न

२ब.५ संदर्भ

## २ब.० उद्दिष्टये

१) मराठी साहित्यातील दलित नाटक ही परंपरा समजेल

२) दलित नाटक हे इतर नाटका पैक्षा कसे वेगळे आहे यांची जाणीव होईल .

३) या नाटकातून कल्पनेला वास्तवाची कशी उत्तम सांगड घातली आहे याची विद्यार्थाला जाणीव होईल .

४) दलित नाटकातून समाजातील दुष्ट प्रवृतीचे वास्तविक दर्शन होईल.

५) दलित नाटकातून अशिक्षित लोकांत आत्मभान जागृत होईल.

## २ब.१ प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी, जनवादी साहित्य असे अनेक प्रवाह निर्माण झाले. पण या सर्वांमध्ये दलित साहित्य हा एक सशक्त असा प्रवाह मानला जातो. मराठी साहित्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे कार्य दलित साहित्याने केलेले आहे.

दलित साहित्यात कथा, कविता, आत्मकथने इ. साहित्यप्रकार सर्वात जास्त हाताळले गेलेले आहेत. असे असले तरी दलित नाटकांचीदेखील एक समृद्ध अशी परंपरा दलित साहित्यात असलेली दिसून येते. दलितांचे दु:ख, वेदना, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व कार्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेले आत्मभान, त्यांचा स्वतःचे अस्तित्त्व सिद्ध करण्यासाठी चाललेला संघर्ष, कालानुरूप बदलत गेलेले दलित वास्तव इ. अनेक विषय दलित नाटकाने हाताळलेले आहेत.

munotes.in

प्रारंभीच्या काळात म. भि. चिटणीस (युगयात्रा), नामदेव व्हटकर (डाग, वाट चुकली), मा. आ. कारंडे (संगीत जयबौद्ध), भि. शि. शिंदे (काळोखाच्या गर्भात) प्रकाश त्रिभुवन (थांबा रामराज्य येतंय) यांची नाटके रंगभूमीवर आली. त्यांनतर रामनाथ चव्हाण'आधारस्तंभ' (१९८१), रुस्तुम अचलखांब -'कैफियत' (१९८१), एकनाथ चव्हाण-'साक्षीपूरम' (१९८२), प्रेमानंद गज्वी-'तनमाजोरी' (१९८३), वांझ माती (१९८२), टेक्सास गायकवाड-'आम्ही देशाचे मारेकरी' (१९८२), 'जळवा' (१९८४), शिल्पा मुब्रीसकर-'झाडाझडती' (१९८४), प्रेमानंद गौरकर-'मशाल' (१९८६), टेक्सास गायकवाड-'मन्वंतर' (१९८६), दत्ता भगत-'खेळिया' (१९८६), 'वाटा-पळवाटा' (१९८७), तुषार भद्रे-'कारान' (१९८७), एस. जी. वाघ-'भूमिहीन' (१९८८), रामनाथ चव्हाण-'बामणवाडा' (१९९१), प्रेमानंद गज्वी-'किरवंत' (१९९१), 'गांधी-आंबेडकर' (१९९८), भालचंद्र फडके-'डॉ. आंबेडकर आणि गांधीजी' (१९८८) इ. नाटकांनी दलित रंगभूमीवर आशय व अभिव्यक्तीचे विविध प्रयोग करून मराठी रंगभूमीवरही महत्त्वाची भर टाकलेली आहे.

अशाच नाटकांपैकी अलीकडच्या कालखंडात लिहिले गेलेले व मराठी रंगभूमीवर आलेले ‘भाई तुम्ही कुठे आहात!’ हे महत्त्वाचे नाटक आहे. हे नाटक ऋषिकेश कांबळे यांनी लिहिलेले असून या नाटकाची पहिली आवृत्ती २० मार्च, २०१६ रोजी प्रकाशित झाली. तर दिग्दर्शक रमाकांत भालेराव यांनी ते रंगभूमीवर आणले. मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद या साहित्य संस्थेने हे नाटक महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत उतरविले. त्यात या नाटकाला मराठवाडा विभागात पहिला क्रमांक मिळालेला आहे.

दलितांवरील अन्यायाला त्याच भाषेत उत्तर देण्यासाठी उभी राहिलेली दलितपँथरची चळवळ, त्यानंतर तिची झालेली मोडतोड, त्यात दलित कार्यकर्त्यांची झालेली दुरावस्था या विषयावर हे नाटक आधारलेले आहे.

## २ब.२ विषय विवेचन

- **लेखक डॉ. ऋषिकेश कांबळे यांचा परिचय-**

ऋषिकेश कांबळे हे १९९० नंतरच्या काळातील एक महत्त्वाचे दलित लेखक, अभ्यासक व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार म्हणून प्रसिद्ध आहेत. उदगीर येथे भरलेल्या ४०व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविलेले आहे. त्यांची ‘भाई तुम्ही कुठे आहात!’(नाटक), ‘दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री’,‘परिवर्तन आणि प्रबोधन’(वैचारिक), ‘वादाचिये गावा’, ‘अस्तित्व आणि अस्मिता’ इ. ग्रंथ संपदा प्रकाशित आहे.

- **‘भाई तुम्ही कुठे आहात!’ या नाटकाच्या लेखनामागील प्रेरणा-**

‘भाई तुम्ही कुठे आहात!’ या नाटकाच्या लेखनामागे लेखक डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या आयुष्यातील एक वास्तव घटना कारणीभूत ठरलेली आहे. एकदा लेखक नांदेड येथे एका प्रतिष्ठित अशा व्याख्यानमालेमध्ये व्याख्यान द्यायला गेलेले असताना व्याख्यान आटोपून गर्दीतून जात होते. तेव्हा त्यांना एक जुना कार्यकर्ता भेटला. लेखकाचे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी खणखणीत आवाज ‘जय भीम सर’ असा आवाज दिला. त्याची दाढी वाढलेली होती.



munotes.in

डोक्यावरचे केस विस्कटलेले होते. मात्र त्याने खांद्यावर रुबाबदार अशी शाल लपेटलेली होती. लेखकाने त्याला ओळखले. पण नाव व व्यक्ती बरोबर आहे का याची खात्री करण्यासाठी 'तोच काय रे?' असा प्रश्न केला. यानंतर मात्र तो लेखकाशी संतापात बोलू लागला."बरं झालं, तुम्ही ओळख तरी ठेवली. आपले जे जे नेते आहेत ना ते तर ओळखही देत नाहीत", अशी खंत त्याने व्यक्त केली. त्यानंतर "आजच्या भाषणाचा तुम्ही मुद्दा नाही सोडला, पण त्या काळातली जी पेटवापेटवीची भाषा होती ना तो जोर या भाषणात नव्हता", असेही त्याने लेखकाला सांगितले व त्यांच्या जुन्या भाषणाची आठवण करून दिली.

यानंतर त्याने लेखकाला जो प्रश्न विचारला. तो त्यांना प्रचंड अस्वस्थ करणारा होता. तो म्हणाला की,"काय चुकलं आमचं. तुम्ही हाक दिली की आम्ही अर्ध्या रात्री बोंबलत निघायचो, आमच्या जिंदगीची माती का केली?" दुसऱ्या दिवशी त्याने लेखकाला फोन करून लेखकाच्या व्याख्यानाच्या बातम्या पेपरमध्ये आल्याचे व त्यात त्यांना विचारवंत म्हटल्याचे सांगितले.

हा प्रसंग लेखकाने त्यांचे सहकारी व जेष्ठ रंगकर्मी डॉ. दिलीप घारे यांना सांगितला. त्यांनी सर्व ऐकून घेतले व या विषयावर नाटक लिहायला सांगितले."ऋषी, तू नाटक छान लिहिशील. एक तर तू चळवळीतून आला आहेस. चळवळीतल्या सगळ्या दिग्गजांना तू जवळून पाहिलंस. चळवळीचं जसं तू वैभव पाहिलंस. तशी वाताहातसुद्धा? लिही बरं लवकर", असे प्रोत्साहन दिले. पण पुढील तीन-चार वर्षे त्यांना काही ते शक्य झाले नाही. घारे सर त्यांच्या मागे लागून राहिले. पुढे लेखक ऋषिकेश कांबळे यांनी एक दीर्घांक लिहून पूर्ण केला. त्याला 'उसळत्या रक्ताची थंड कहाणी' असे नाव दिले. कारण दलित चळवळीची वाताहत होऊन सर्व आक्रमक नेते, कार्यकर्ते अलीकडे शांत थंड झालेले होते. लेखकाने ही दीर्घांक एकदा डॉ. गंगाधर पानतावणे यांना वाचून दाखविला. त्यांनी कौतुक केले. परंतु दीर्घांकाऐवजी दोन अंकी नाटक करायला सांगितले.

पुढे या डॉ. घारे यांच्या सांगण्यावरून 'उसळत्या रक्ताची थंड कहाणी' हे नाव बदलून 'कोणे एकेकाळी चळवळीचे धुरीण राहिलेले, चळवळीला आणि समाजाला चैतन्य देणारे लोक गेले कुठे?', हा आशय लक्षात घेऊन 'भाई तुम्ही कुठे आहात!' असे नामकरण करण्यात आले.

पुढे हे नाटक महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत सादर करण्यात आले. त्या नाट्यस्पर्धेत हे नाटक मराठवाडा विभागात पहिले आले. पुढे नाशिकच्या कालिदास रंगमंदिरात तिकीट लावून त्याचा प्रयोग झाला. तर नाट्यगृह पूर्ण भरले.नाशिककरांनीखाली बसून तसेच भिंतीला पाठ लावून उभे राहून तीन तास हे नाटक पाहिले. त्याला प्रचंड प्रतिसाद दिला. अशा प्रकारे या नाटकाचे लेखन होऊन ते रंगभूमीवर अवतरले.

- **नाटकाचे कथानक-**

'भाई तुम्ही कुठे आहात!' हे दोन अंकी नाटक आहे. पहिल्या अंकात सात तर दुसऱ्या अंकात पाच असे एकूण बारा दृश्य या नाटकात आहेत. अशा वेगवेगळ्या दृश्यांमधून या नाटकातील कथानक साकारलेले आहे. हे नाटक दलित चळवळीची सुरुवात, त्यातील आक्रमकता, दलितांच्या समस्या, त्या सोडविण्यासाठी उभे राहिलेले नेते, कार्यकर्ते,

त्यासाठी त्यांनी घेतलेला आक्रमक पवित्रा, पण पुढे या नेत्यांचासंधिसाधूपणा व स्वार्थीपणा यामुळे चळवळीची होत गेलेली वाताहत यावर आधारलेले आहे.

पहिल्या अंकातील पहिल्या दृश्याची सुरुवात दलितांचे पूर्वाश्रमीचे आक्रमक नेते भाई हे समाजकल्याणमंत्री बनल्यानंतर एका सत्कार समारंभातील भाषणाने होते. त्यांच्या भाषणाच्या आधी जमलेले कार्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो अशा घोषणा देतात. भाई आपल्या भाषणात त्यांनी समाजकल्याणमंत्रीपद स्वीकारण्यामागची भूमिका मांडतात. त्यांच्या भाषणात ते सांगतात की, बाबासाहेबांचे दलितोद्धाराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी मंत्रीपद स्वीकारले. त्यासाठी हा कटू निर्णय घेतला. समाजात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे जायला पाहिजे. समविचारी लोकांसोबत सत्तेत जायला पाहिजे.उच्चवर्णीयांमध्येही काही चांगली माणसे असतात. त्यांना जपायला पाहिजे. दीनदुबळ्यांच्या कल्याणासाठीच मी हे पद स्वीकारलेले असून माझ्यासमोर नेहमी माझा हा दीनदुबळा समाज असतो, असे प्रतिपादन ते करतात आणि शेवटी संपूर्ण समाजक्रांतीसाठी मला म्हणजे तुमच्या भाईला बळ द्या असे आवाहन ते करतात.

याच सत्कार समारंभात भाईंचे भाषण सुरू असताना त्यांचे आधीचे कार्यकर्ते अरविंद देशपांडे, मिलिंद, मुस्तफा, सखाराम, मंजुळामाय हे देखील उपस्थित असतात. भाषण आटोपल्यावर कार्यकर्त्यांच्या गराड्यातून भाई जात असताना हे सर्वजण 'जय भीम' आवाज देऊन त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. पण भाई त्यांच्याकडे फक्त कटाक्ष टाकून त्यांच्याशी न बोलता तेथून निघून जातात. इथे या सर्वांना आपला भाई सत्तेमुळे बदलला, याचे प्रत्यंतर येते.

त्यानंतर दुसऱ्या दृश्यामध्ये दलित चळवळीचा आक्रमक व झुंजार कार्यकर्ता मिलिंद व भाईंची भेट तसेच त्यांच्यातील संवाद आलेले आहेत. या भेटीमध्ये त्यांचा जो संवाद घडून आलेला आहे त्यातून भाईंच्या बदललेल्या स्वरूपावर प्रकाश पडतो.भाई आता ५५वर्षांचे आहेत. ते वयाच्या २६-२७व्या वर्षी चळवळीमध्ये आले. त्यांचा आक्रमक, धाडसी स्वभाव, बाबासाहेबांचे विचार व कार्याचा अभ्यास, बाबासाहेबांवरील श्रद्धा यामुळे ते दलित चळवळीचे बिनीचे नेते म्हणून पुढे आले. त्यांनी दलित कार्यकर्त्यांमध्ये उत्साह, स्वाभिमान निर्माण केला. त्यांनी अनेक प्रश्नांवरून आंदोलने उभारली. आपल्या भाषणांमधून ते प्रस्थापित अन्याय्य व्यवस्थेवर तुटून पडायचे. त्यांच्या एका शब्दावर मिलिंद, प्रशांत, मुस्तफा, अरविंद देशपांडे, मंजुळा माय, सखाराम पाटील, बालकिशन येरमे, गंगाधर ढवळे, यशवंत वाघमारे, केशव बोर्डे, सुभाष, मुकुंद, धैर्यशील, संदेश व इतर सर्व जाती-धर्माचे कार्यकर्ते लढायला, कुणालाही मारायला, तुरुंगात जायला तयार व्हायचे. कार्यकर्त्यांची एक फळीच भाईंनी उभारलेली होती.

गाव पातळीवरील अस्पृश्यता, सार्वजनिक पाणवठ्यावर, विहिरीवर पाण्याचा हक्क नाकारणे, पोळ्यासारख्या सणाला दलितांनी वाद्य वाजवायला नकार दिला म्हणून त्यांच्यावर स्पृश्य समाजातील गावकऱ्यांनी बहिष्कार टाकणे, गायरान जमिनी दलितांनी कसण्यासाठी ताब्यात घेतल्यावर त्यांच्या उभ्या पिकात जनावरेघालणे, आंतरजातीय विवाह करणाऱ्या अस्पृश्य मुलाला मारहाण, अस्पृश्य जातीच्या मुलीवर सवर्ण मुलांकडून

लैंगिक अत्याचार, सरकारी अधिकाऱ्यांचा त्रास, हमालांचे शोषण, त्यांचे प्रश्न अशा अनेक गोष्टींचा/ प्रसंगांचा उल्लेख/ चित्रण या नाटकात आलेले आहे. या समस्यांविरुद्ध भाई व दिनकरराव यांच्या नेतृत्त्वाखाली त्यांचे कार्यकर्ते अविरत संघर्ष करताना दिसून येतात. या कार्यकर्त्यांनी या प्रश्नांवर लढताना कुणाला मारहाण केली, कुणाचा खून केला किंवा आणखी काही केले तरी भाई खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहतात, आपल्या कार्यकर्त्यांना लढण्याचे बळ व साधने पुरवितात.

भाई व दिनकरराव या दोघांनी बाबासाहेब आंबेडकरांनंतर ही चळवळ उभी केलेली असते. या सर्व कार्यकर्त्यांचे दोघांवर सारखेच प्रेम व निष्ठा असते. अनेक आंदोलने या दोघांनी मिळून उभारलेली असतात. पण काळाच्या ओघात या दोघांमध्ये 'वर्णलढा की वर्गलढा' या प्रश्नावरून संबंध दुरावयला सुरुवात होते. भाई वर्णलढ्याला तर दिनकरराव वर्ग लढ्याला प्राधान्य देतात. त्यात दिनकररावांचे असे मत असते की,"आपण रस्त्यावरची लढाई लढतोच आहोत.कुणीतरी रस्त्यावरची लढाई लढावी आणि कुणीतरी त्या लढाईचा जाळ विधानमंडळात काढावा" (पृ.४८). म्हणजे प्रत्यक्ष राजकारणात उतरून सत्तेचा एक भाग बनून आपण समाज परिवर्तनासाठी प्रयत्न करावा, असे त्यांना वाटते. परंतु भाई व मिलिंद त्यांच्या या विचाराला अतिशय प्रखर भाषेत विरोध दर्शवतात. सत्तेत जाण्याला ते समाजाचा विश्वासघात, बेईमानी समजतात. त्यांनाही आपल्या चळवळीशी व स्वाभिमानाशी केलेली तडजोड वाटते."हा भाई जिवंत असेपर्यंत बाबासाहेबांनी दिलेला स्वाभिमानाचा झेंडा कधीच खाली पडू देणार नाही. त्या झेंड्याचा दांडा कुणी काढून घेत असेल तर त्याला दंडुक्यानेच ठोकेल" (पृ. ४८), असे उत्तर ते देतात. त्यांच्या या परस्परविरोधी भूमिकेमुळे हळूहळू चळवळीमध्ये फूट पडते. त्यामुळे चळवळीचे नुकसान होते.

सत्तेत जाणे म्हणजे विश्वासघात व बेइमानी समजणारे भाई मात्र पुढे मुत्सद्दी राजकारणी असलेल्या भास्कररावांच्या गळाला लागून साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारायला तयार होतात व पुढे विधानमंडळात जाऊन राज्याचे समाजकल्याणमंत्री होतात. सत्तेत जायचे नाही, असे म्हणणारे भाई शेवटी स्वतः तत्त्वांशी तडजोड करतात. सत्तेत गेल्यावर ते कार्यकर्त्यांपासून लांब जातात. त्यांच्याशी संबंध कमी करून टाकतात. ज्या मिलिंदला सोबत घेऊन त्यांनी अनेक सभा, आंदोलनाचे नियोजन केलेले असते, त्याच मिलिंदला भेटल्यावर ते 'मिलिंद कारे?' असे विचारतात.

या सर्व गोष्टींमुळे चळवळीची खूप हानी होते. चळवळीला मार्ग दाखवायला, नेतृत्व करायला कोणी राहत नाही. दलितांच्या चळवळीमधून नावारूपाला आल्यावर सत्तेत जाऊन थंड झालेल्या नेत्यांमुळे दलितांच्या चळवळी मोडून पडल्या. समाजाचे प्रश्न, समस्या सोडवायला कोणीच राहिले नाही. लढण्यासाठी तयार असलेले पण दिशा, मार्ग दाखविणारे, प्रसंगी पाठीशी उभे राहणारे नेतृत्वच न राहिल्याने कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खचले, ही दलित समाजाची वस्तुस्थिती या नाटकातून लेखकाने मांडलेली आहे.

- **व्यक्तिरेखा-**

'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात ज्याप्रमाणे दलित चळवळीचे चित्रण आलेले आहे त्याचप्रमाणे राजकारणावर देखील प्रकाश टाकलेला दिसून येतो. त्यामुळे या राजकारणातील जवळपास सर्व व्यक्तिरेखा या चळवळीशी, राजकारणाशी संबंधित आहेत.

या नाटकात भाई, मिलिंद, दिनकरराव, भास्करराव ही महत्वाची पात्रे आहेत. तर अरविंद देशपांडे, मंजुळा माय, प्रशांत ह्या इतर महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत.

- **भाई-**

या नाटकाचे कथानक भाई या पात्राभोवती फिरते. या पात्राच्या माध्यमातूनच लेखकाने एकेकाळच्या झुंझार, आक्रमक, धाडसी, तत्त्वनिष्ठ नेतृत्त्वाचे अध:पतन होऊन ते कसे स्वार्थी, व्यक्तिकेंद्री, सत्तापिपासू बनते, याचे चित्रण केलेले आहे. भाई हे २७-२८ वर्षांचे असतानाच दलितांचे नेते म्हणून पुढे आलेले असतात. त्यांचा जन्म दलित कुटुंबात झालेला असल्याने त्यांनी अस्पृश्यतेचे चटके सहन केलेले असतात. दारिद्र्यात दिवस काढलेले असतात. याची जाणीव त्यांना सुरुवातीच्या काळात असते. ते सुरुवातीला अतिशय निर्भीड, आक्रमक, धाडसी, स्पष्टवक्ता, बाबासाहेबांच्या विचारांवर निष्ठा असलेला पुढारी म्हणून सर्वांना परिचित असतात. कार्यकर्त्यांची एक मोठी फौज त्यांनी निर्माण केलेली असते.

ग्रामीण किंवा शहरी भागातही दलितांवर विविध प्रकारचे अन्याय ७०-८० च्या दशकात होत होते. दलितांवर कुठेही, कोणत्याही स्वरूपाचा अन्याय झाला तरी ते त्याचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घेत असतात. दलित समाजातील लोकंही त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहत असतात. भाईंचा त्यांना खूप मोठा आधार असतो. गाव पातळीवरील अस्पृश्यता, सार्वजनिक पाणवठ्यावर, विहिरीवर पाणी पिऊ न देणे, पोळ्यासारख्या सणाला दलितांनी वाद्य वाजवायला नकार दिला म्हणून त्यांच्यावर स्पृश्यसमाजातील गावकऱ्यांनी बहिष्कार टाकणे, गायरान जमिनी दलितांनी कसण्यासाठी ताब्यात घेतल्यावर त्यांच्या उभ्या पिकात जनावरेघालणे, आंतरजातीय विवाह करणाऱ्या अस्पृश्य मुलाला मारहाण, अस्पृश्य जातीच्या मुलीवर सवर्ण मुलांकडून लैंगिक अत्याचार, सरकारी अधिकाऱ्यांचा त्रास, हमालांचे शोषण, त्यांचे प्रश्न अशा अनेक समस्यांविरुद्ध भाई आंदोलने उभारतात. आपल्या कार्यकर्त्यांना पाठवून संबधितांना अद्दल घडवितात, वठणीवर आणतात. असे करताना या कार्यकर्त्यांनी कुणाला मारहाण केली, कुणाचा खून केला किंवा आणखी काही केले तरी भाई खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहतात, आपल्या कार्यकर्त्यांना लढण्याचे बळ व साधने पुरवितात.

भाईंवर बाबासाहेबांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव असतो. आपल्या भाषणांमधून ते नेहमी त्यांचा उल्लेख करत असतात. बाबासाहेबांच्या नंतर त्यांची चळवळ भाई व दिनकरराव यांनीच पुढे नेलेली असते. भाई कित्येक वर्षे या चळवळीचे नेतृत्त्व करतात. या लढ्याचे नेतृत्व त्यांच्याकडे असल्यामुळे एक खूप मोठा समूह त्यांच्या पाठीशी असतो. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील लोकांचे त्यांना आपल्याकडे वळविण्याचे प्रयत्न सुरू असतात. सुरुवातीला 'सत्तेत सामील होणे म्हणजे समाजाशी, बाबासाहेबांच्या विचारांशी बेईमानी' असे म्हणणारे भाई मात्र नंतर भास्करराव यांच्या जाळ्यात अडकतात. अनेक वर्षे झगडून, लढूनदेखील परिस्थितीत फारसा बदल होत नाही. त्यांचे वय वाढत राहते. तसेच सत्तेत गेले तर समाजाचे अधिक भले करता येईल व आपल्यालाही या प्रसिद्धीचा वापर करून सत्ता मिळविता येईल, असा विचार करून ते सत्तेत सामील होतात.

त्यानंतर मात्र ते आपल्या समाजापासून, कार्यकर्त्यांपासून हळूहळू दूर जातात. पुढे तर ते त्यांना ओळखही दाखवत नाहीत. सत्तेत गेल्यावरदेखील ते दलितांच्या दु:खाबद्दल बोलतात. पण सुरुवातीला लढण्याची, पेटवापेटवीची भाषा करणारे भाई नंतर मध्यमवर्गीय, ब्राह्मणी भाषा बोलू लागतात. त्यांच्या अशा स्वार्थी व संधिसाधूपणामुळे दलित चळवळीची खूप मोठी हानी होते. कार्यकर्त्यांना दिशा दाखवायला, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहायला कुणी राहत नाही.

- **दिनकरराव-**

'भाई तुम्ही कुठे आहात' या नाटकात भाईइतके दिनकररावांचे चित्रण आलेले नाही. मात्र त्यांच्या संदर्भात जेवढे प्रसंग, संवाद आलेले आहेत, त्यातून हे लक्षात येते की,दिनकरराव हे देखील भाईप्रमाणेच दलितांच्या लढ्याचे नेतृत्त्व करणारे नेते आहेत. भाईप्रमाणेच दिनकरराव यांनीही बाबासाहेबांनंतर दलित चळवळ उभी करण्यात योगदान दिलेले आहे.त्यांनीही चळवळीला पुढे नेलेले आहे. आकार दिलेला आहे. दलित कार्यकर्ते जेवढे भाईंना मानतात, त्यांच्या शब्दांसाठी वाटेल ते करायला तयार असतात तेवढाच मानते दिनकररावांचाही ठेवतात. पण पुढच्या कालखंडात चळवळ पुढे कशी न्यायची या मुद्द्यावरून भाई व दिनकरराव यांच्यात हळूहळू मतभेद निर्माण व्हायला लागतात.

दिनकररावांना असे वाटते की,''नाही रे' वर्गाला एकत्र केलं तर चळवळ बलशाली करता येईल आणि मग त्यांच्यात जातीअंताची प्रेरणा ओतता येईल" (पृ.३६).भाईंनाही सामाजिक व आर्थिक समता निर्माण करण्यासाठी वर्ण व वर्गसंघर्ष एकत्र लढावा, असे वाटत असते. मात्र "पोटाची खळगी भरण्यासाठी एकत्र आलेले लोक जात समजल्यावर पांगायला लागतात" (पृ.३६), असा त्यांचा अनुभव, त्यांचे निरीक्षण असते. म्हणून आधी जातीअंतासाठी लढा द्यावा, अशी त्यांची भूमिका असते. तर दिनकररावांना वर्गलढा महत्त्वाचा वाटतो. कारण त्यामुळे शेतमजूर, कामगार अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व लोकसंख्येने अधिक असलेल्या वर्गाला एकत्र करून लढा अधिक तीव्र व मजबूत करणे शक्य होईल, असे त्यांना वाटते.

दिनकरराव हे गरम डोक्याचे व उष्ण रक्ताचे आहेत, हे मुकुंद, धैर्यशील यांच्याशी त्यांचा जो संवाद झालेला आहे त्यातून लक्षात येते. त्यांच्यामुळे चळवळ तुटते आहे, असा संशय जेव्हा मुकुंद, धैर्यशीलसारखे कार्यकर्ते घेतात किंवा तशी चर्चा सुरू आहे असे त्यांच्या कानावर येते तेव्हा त्यांना खूप संताप येतो. तो त्यांच्या भाषेतून व्यक्त होताना दिसतो.

पुढे दिनकरावांना असे वाटू लागते की, लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी विधानमंडळात जायला हवे. रस्त्यावरची लढाई तर त्यांनी कित्येक वर्षे लढलेली असते. त्यासोबत सत्तेत गेले तर त्याचा दीनदलितांना लाभ होईल, असे त्यांना वाटते.'रस्त्यावरची लढाई तसेच विधिमंडळात जाऊन लढाई' अशी दुहेरी लढाई लढावी, असे ते भाईंजवळ बोलून दाखवतात.भाईंना ती चळवळीशी, बाबासाहेबांच्या विचारांशी बेईमानी वाटते. तर दिनकररावांच्या मते,"सत्तेत बसूनही परिवर्तन घडवता येईल... आपल्याला सत्तेचा वारा का खरचटू नये, काय त्यांचीच मक्तेदारी आहे? आणि आपल्या निष्ठा मजबूत असतील तर आपल्या प्रश्नांसाठीच भांडू नातिथं" (पृ. ४८). अशी चळवळीच्या आतापर्यंतच्या वाटचालीपेक्षा वेगळी भूमिका दिनकरराव मांडतात. भाईंनाही 'मागेपुढे तुम्हीही विचार

करावा', असा सल्ला देतात. अर्थातच त्यावेळेस भाईंना त्यांचा विचार पटत नाही. पुढे दिनकराव सत्तेत गेले की नाही गेले याचा उल्लेख नाटकात आलेला नाही. परंतु काही कालावधीनंतर भाई मात्र राजकारणात जातात. चळवळ दुभंगते. कार्यकर्ते निराधार, दिशाहीन होतात.

दिनकररावांच्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून चळवळीसाठी अर्धे आयुष्यझिजलेल्या, रात्रंदिवस संघर्ष केलेल्या, परंतु शेवटच्या काळात वर्गलढा, शेतमजूर, कामगार यांच्या प्रश्नांच्या संदर्भात भांडता-भांडता सत्तेच्या वाटेने गेलेल्या दलित नेत्याचे चित्रण या नाटकात लेखकाने केलेले आहे.

- **भास्करराव-**

भास्करराव हे सत्ताधारी पक्षातील अतिशय मुत्सद्दी, संधिसाधू, कुटिल, गोड बोलून आपला उद्देश साध्य करणारे बेरकी राजकीय नेते आहेत. त्यांचे त्यांच्या परिसरामध्ये मोठे नाव व प्रस्थ आहे. साखर कारखाने व इतर सहकारी कारखाने त्यांच्या नियंत्रणाखाली असल्याने साखर कारखान्यांवर दलित जातीतील नरसिंग हेळंबकर या व्यक्तीला ते संचालक म्हणून नेमतात. आक्रमक दलित नेते असलेले भाई राजकारणात यावेत, त्यांना चळवळीपासून लांब न्यावेयासाठी जणू त्यांनी विडाच उचललेला असतो. त्यासाठी ते राज्यस्तरावरील वरच्या नेतृत्वाशी बोललेले असतात. भाईंना साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद देऊन ते त्यांचा आक्रमकपणा संपवून दलितांची चळवळच मोडून काढतात. म्हणजे त्यांचा राज्यस्तरावरील नेतृत्वापर्यंत दबदबा आहे, हेच अशा प्रसंगांमधून दिसून येते.

भास्कररावांचे वडील वारकरी संप्रदायाचे होते. आपल्यावर वारकरी संप्रदायाचे संस्कार आहेत, असे ते म्हणतात. स्वतःला 'गांधीजींच्या विचारांचे' असेही ते म्हणवून घेतात.वरवर ते उदात्त, पुरोगामी विचारांचे असल्याचे दाखवितात. पण वडिलांच्या सोबत दिंडीला जाणाऱ्या दलित समाजातील धोंडू येसकरचा उल्लेख ते 'धोंड्या' असा करतात. आपल्या जातीतील गावोगावच्या पुढाऱ्यांना काळानुसार बदलायला हवे, असे सांगतात व त्याच वेळेस "मलामात्र वागाव लागतं. ज्याला जसं वागायचं त्यानं तसं वागावं... मी कधी रोखलं तुम्हाला? कधी म्हणालो, हे करा आणि ते करू नका" (पृ. ६०-६१) असेही म्हणतात. असा दुटप्पी, धोरणी, दांभिक स्वभाव भास्करराव यांचा आहे. एकीकडे आपल्या लोकांनाही जपायचे व दुसरीकडे दलित नेत्यांनाही जवळ करायचे. दोघांच्या आक्रमणपणाची धार बोथट करायची व आपल्या लोकांना मात्र मोकळे सोडायचे, असे त्यांचे धोरण आहे.एके ठिकाणी भगवान पाटील त्यांच्याबद्दल असे म्हणतात की, "दादासाहेबांचं गणित आपल्या डोक्याबाहेरचं आहे. त्यायचा कुणाच्या डोक्यावर हात असतो आन् कुणाचा पाय त्यायच्या हातात अडकतो काहीच कळत नाही" (पृ. ५९). यावरून त्यांचा धूर्तपणा लक्षात येतो.

भास्करराव हे राजकारणाचा, बदललेल्यापरिस्थितीचा, सामाजिक वातावरणाचा अचूक अंदाज घेऊन डाव टाकतात. त्यांच्या व त्यांच्या वडिलांच्या हे लक्षात आलेले असते की, स्वातंत्र्यानंतर दबलेल्या व वंचित समूहांमध्ये आत्मभान निर्माण झालेले आहे. ते आपल्या हक्कांसाठी संघर्ष करू लागलेले आहेत. उच्चवर्णीयांचे, प्रस्थापितांचे वर्चस्व ते झुगारून देऊ लागले आहेत. भास्करराव व त्यांच्या वडिलांसारख्या गावोगावच्या प्रस्थापित

राजकारण्यांना खरेतर ही बाब रुचणारी नसते. पण लोकशाही व्यवस्थेत आपले स्थान अबाधित ठेवण्यासाठी व सत्ता आपल्या हातात ठेवण्यासाठी ते अनिश्चेने स्वतःला काळानुरूप बदलून घेतात. एके ठिकाणी ते आपल्या जातीच्या भाऊबंदकीच्या लोकांना सांगतात की, “भगवानराव, इतका ताठरपणाही काही कामाचा नाही. आमच्या वडिलांनी सांभाळलाच की नाही गावगाडा. शेवटी शेवटी बदललं वारं, मनाला मुरड घालून बदललेलं वारं त्यांनी घेतलं की नाही धोतराच्या घोळात. होती का त्यांची इच्छा? पण घालावी लागली मुरड आणि सांभाळलाच की नाही गावगाडा! करावंलागतं तसं” (पृ. ६०). थोडक्यात, हा बदल त्यांनी मनापासून नव्हे तर नाईलाजाने स्वीकारलेला आहे, पण हा बदल पचवून त्यांचे नेतृत्त्व उभे राहिलेले आहे, असे दिसून येते.

बदललेल्या वास्तवात भाईंसारख्या आक्रमक दलित नेत्यांचा विरोध, चळवळी मोडून काढणे, हे त्यांच्यासमोर मोठे आव्हान असते. हे आव्हान ते स्वीकारतात व भाईंशी न लढता, त्यांच्याशी गोड बोलून, परिवर्तनाचे खोटे/ आभासी चित्र त्यांच्या डोळ्यासमोर उभे करून, प्रसंगी त्यांच्यासमोर नमते घेतल्यासारखे दाखवून, वरवर त्यांना भरपूर मानसन्मान देऊन आपल्या मुत्सद्दीपणाने ते त्यांना चळवळीपासून दूर नेतात. एका कर्तृत्ववान दलित नेत्याला ते थंड करून टाकतात. त्यांना त्यांच्या कार्यकर्त्यांपासून तोडून, त्यांचा आक्रमकपणा संपवून, त्यांची भाषा, त्यांची वाटचाल, त्यांची ध्येय धोरणे इ.मध्ये आमुलाग्र बदल घडून आणतात. भास्कररावांच्या रूपाने सत्ताधारी पक्षातील प्रस्थापित, उच्चवर्गीय, उच्चवर्णीय, 'जैसे थे' प्रवृत्तीच्या मुत्सद्दी राजकारण्याचे चित्र लेखकाने या नाटकातून वाचकांसमोर उभे केलेले दिसून येते.

- **मिलिंद -**

भाई, दिनकरराव, भास्करराव यानंतर मिलिंद ही महत्त्वाची व्यक्तिरेखा या नाटकात आहे. मिलिंद हा नाटकभर वावताना आपल्याला दिसून येतो. तो आक्रमक व तळमळीचा असा दलित कार्यकर्ता आहे. भाईंचा उजवा हात असल्यासारखे त्याचे चळवळीत स्थान आहे. भाईंच्या अनेक मोर्चांचे, आंदोलनाचे नियोजन, त्यासाठी लोकांना जमवणे इत्यादी गोष्टींची जबाबदारी त्याने यशस्वीरित्या पार पाडलेली असते. भाईंच्या सांगण्यावरून वकिलांना, पोलिसांना, सरकारी अधिकाऱ्यांना भेटणे, त्यांच्यात चळवळीचा धाक निर्माण करणे, अन्याय करणाऱ्या गावोगावच्या सवर्णांना भेटून त्यांचा योग्य तो बंदोबस्त करणे, त्यांना वठणीवर आणणे, चळवळीतल्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, त्यांच्या लपण्याची, तेथील राहण्याची वगैरे व्यवस्था करणे, इत्यादी जबाबदाऱ्या अतिशय चोखपणे त्याने पार पाडलेल्या असतात. त्याने चळवळीमध्ये आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिलेले असते. लोकांच्या, दलितांच्या समस्या सोडवण्यासाठी, चळवळीसाठी त्याने लग्नही केलेले नसते.

भास्करराव, दिनकरराव यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी तो भाईसोबत जात असतो. तिथे चर्चेतही तो भाग घेत असतो. कुणी काही चुकीचे बोलला तर तिथेच त्याला खडसावण्याची, बोलण्याची हिंमत, धाडस त्याच्यात आहे. मिलिंदसारख्या झुंजार व समर्पणशील कार्यकर्त्यांच्या जोरावर भाई व दिनकरराव चळवळ पुढे रेटत असतात.तो अनेकदा भाईंना भास्करावांपासून सावध करत असतो. पण पुढे जेव्हा भाई व दिनकरराव हे राजकारणात

निघून जातात व चळवळीकडे पाठ फिरवतात. कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून जातात तेव्हा भाईंना जाब विचारण्याचे, त्यांना खडसावण्याचे धाडस तो दाखवतो. भाईंना तो भूतकाळाची, त्यांच्या आधीच्या भूमिकेची, त्यांच्यावर असलेल्या जबाबदारीची जाणीव करून देतो. त्यांची हतबलता, बदललेले रूप पाहून त्यांचा धिक्कार करतो. याचे चित्रण पहिल्या अंकातील दुसऱ्या दृश्यात तसेच बाराव्या दृश्यात आलेले आहे. त्याच्या बोलण्यातून त्याची तळमळ, तडफड, संताप, चीड, आक्रमकपणा, समजदारपणा ठायी ठायी व्यक्त होताना दिसतो.

नाटकाच्या शेवटी जेव्हा भाई व दिनकरराव हताश, हतबल झालेले आहेत. तेव्हा हाच मिलिंद चळवळ पुन्हा उभी करण्यासाठी प्रयत्न करतो. त्यांना त्यांचा अहंकार विसरून, ठेचून पुन्हा एकत्र येण्यासाठी सांगतो. पण ते जेव्हा शक्य दिसत नाही तेव्हा तो प्रशांतच्या (एक दलित कार्यकर्ता) मुलाला-राहुलला त्याच्यासाठी निवडतो. चळवळीची धुरा तो नवीन पिढीवर सोपवतो. या राहुलच्या हातात तो एक दंडुका देतो व त्याला "राहुल, हा घे दंडुका. जे जे बेईमान असतील त्यांना ठोका या दंडुक्यानं. मेल्या मुडद्यासारखं वागू नका. वाघावानी घ्या झेप. हा मिलिंद काही दमला नाही, थकला नाही. मी होईल पाया, चळवळीची बांधा इमारत नव्यानं." (पृ. ७८), अशा शब्दांमध्ये त्याला प्रेरणा देतो. अशा रीतीने चळवळीसाठी सर्वस्व वेचणाऱ्या दलित कार्यकर्त्याचे चित्रण या नाटकात मिलिंदच्या रूपाने आलेले आहे.

- **'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील इतर पात्रे/ व्यक्तिरेखा-**

या नाटकात वरील मुख्य व्यक्तिरेखांखेरीज मंजुळामाय, अरविंद अशा इतर व्यक्तिरेखा आहेत. मंजुळामाय ही अशिक्षित आहे. ती ग्रामीण भागात राहून दलितांच्या हक्कांसाठी लढते. भाई, मिलिंद यांनी उभारलेल्या मोर्चांमध्ये, आंदोलनांमध्ये सहभागी होते. ती स्त्री असूनही अतिशय आक्रमक आहे. ग्रामीण भागातील दलित समाज, मुली-स्त्रिया यांच्यावर होणारा अन्याय,त्यांचे होणारे लैंगिक शोषण याविरुद्ध ती हातात कोयता घेऊन गाव पातळीवरील सवर्ण, धनदांडगे, सत्ताधारी यांच्याविरुद्ध उभे राहते. तिथे तिने दलितांच्या संघटन उभे केले असल्यामुळे ते तिच्यामागे ठामपणे उभे राहतात.

तिच्या गावातील गंगी नावाच्या मुलीवर जमीनदार तुकाराम अण्णांचा मुलगा अंकुश बलात्कार करतो. तेव्हा ती गंगीला न्याय मिळवून देते.गावपातळीवरील लोकांचे पाठबळ व हातातील कोयता यांच्या जोरावर अंकुशला गंगीशी लग्न करायला भाग पाडते. कलेक्टर कार्यालयात चार साक्षीदारांसमोर त्यांचे लग्न लावून देते. तुकाराम अण्णा व त्यांचे भाऊबंद चिडतात. तिला बोलवून घेतात. तेव्हा ती सगळ्यांसमोर त्यांना विचारते की, "तुमी मायीच्या पोटातून येताना तुमच्या कुणा-कुणाच्या इंद्रियावर जात ल्हिवून आली ते दाखवा (पृ. ७४), असा प्रश्न विचारून ती सर्वांना खाली मान घालायला भाग पाडते. तिच्यात एवढा आत्मविश्वास, लढवय्येपणा बाबासाहेबांच्या विचारांमुळे आलेला असतो. चळवळीसाठी तीही अविवाहित राहते. आपले संपूर्ण आयुष्य चळवळीला वाहून घेते. शेवटी भाई, दिनकररावसारखे नेते सत्तेमागे निघून गेल्याचे तिला वाईट वाटते.

अरविंद हा ब्राह्मण समाजातील असूनही दलित, हमाल, कामगार, शेतमजूर यांच्या हक्कांसाठी दलितांसोबत राहून लढा देतो. भाईंचा त्याच्यावर खूप विश्वास असतो. एकदा केशव बोर्डे नावाचा दलित कार्यकर्ता भाईंना 'तुम्ही अरविंद देशपांडेवर इतका भरवसा टाकू

नये. कारण तो आपल्या बातम्या फोडत असेल', अशी शंका घेतो. तेव्हा भाई सर्वांसमोर त्याच्या थोबाडीत मारतात. एवढा विश्वास भाईंचा अरविंदवर असतो.

अरविंदचे वडील नरहरी देशपांडे हे शिक्षक होते. भाई हे त्याचेच विद्यार्थी. नरहरी मास्तर हे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अस्पृश्यता न मानणारे, दलित मुलांवर प्रेम करणारे होते. साने गुरुजींनी विठ्ठल मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून उपोषण सुरू केल्यावर नरहरी गुरुजींनी त्यांच्या गावातील पिराजी मंदिर अस्पृश्यांना खुले व्हावे म्हणून उपोषण केलेले असते. अरविंद देशपांडे हा अशा वडिलांच्या संस्कारात लहानाचा मोठा झालेला असतो. त्याला त्याच्या समाजातील लक्ष्मीपंत व इतर स्वजातीयांकडून नेहमी त्रास होत राहतो. त्याला 'दलितांच्या पोटचा आहेस का?' (पृ. ५२), असे बोलणे ऐकावे लागते. तरीही तो दलितांची बाजू घेतो. समतेसाठी संघर्ष करत राहतो. दलितांसोबत अनेक सवर्ण लोकांनीही शोषणविरहित, समतेवर आधारित समाज निर्माण व्हावा यासाठी संघर्ष केलेला आहे. नरहरी देशपांडे, अरविंद हे सवर्ण कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी म्हणून या नाटकात येतात.

- **'भाई तुम्ही कुठे आहात!'या नाटकातील दलित जाणिवा-**

दलित साहित्य हे बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन निर्माण झालेले आहे. बाबासाहेबांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवतावाद या मूल्यांवर आधारलेला समाज उभा करायचा होता. हजारो वर्षांपासून चालत आलेली गुलामगिरी, शोषण यावर आधारलेली समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था बाबासाहेबांनी नाकारली. या समाजातील प्रथा, परंपरा, अनिष्ट रूढी, विषमता याविरुद्ध विद्रोह पुकारला. त्यांना पर्याय दिला. दलित समाजाला आत्मभान दिले. त्यांच्यात स्वतःचा शोध (आत्मशोध) घेण्याची क्षमता, इच्छाशक्ती निर्माण केली. दलितांच्या वेदनांना, प्रश्नांना वाचा फोडली. हाच विचार घेऊन दलित साहित्य लिहिले जाऊ लागले. आंबेडकरी विचार, आत्मभान, आत्मशोध, वेदना, विद्रोह, नकार इत्यादी गोष्टी दलित साहित्यात मोठ्या ताकदीने व्यक्त होऊ लागल्या. किंबहुना या गोष्टींनी युक्त साहित्य म्हणजे दलित साहित्य.

दलित साहित्याची ही सर्व वैशिष्ट्ये 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात आलेली आहेत. या नाटकातूनही दलितांच्या प्रश्नांना, समस्यांना वाचा फोडलेली आहे. मिलिंद, भाई, दिनकरराव, मंजुळामाय हे सर्व तेच करतात. या नाटकातील भाई व इतर दलित पात्रे आंबेडकरी विचार घेऊन आपल्या आयुष्यात वाटचाल करतात. ते परंपरेवर, विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेवर जोरदार हल्ला चढवतात. त्या व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या व्यक्ती व प्रवृत्तींना वठणीवर आणण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याविरुद्ध विद्रोह पुकारतात. त्यांच्यातही आत्मभान, स्वाभिमान निर्माण झालेला आहे. समतेवर आधारलेला शोषणविरहित समाज उभा करण्यासाठी ते आपल्या आयुष्याची,सुखांची आहुती देतात. बाबासाहेबांचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अहोरात्र संघर्ष करत राहतात. समाजाचे संघटन करतात. मोर्चा, आंदोलने यांच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती निर्माण करतात. थोडक्यात, दलित साहित्याची सर्व वैशिष्ट्ये या नाटकातही आलेली आहेत, दलित जाणिवा या नाटकात व्यक्त झालेल्या आहेत, असे दिसून येते.

- **'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील सामाजिकता-**

'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात १९७० नंतरच्या सामाजिक परिस्थितीचे चित्रण आलेले आहे. भारतात जातिव्यवस्था ही खोलवर रुजलेली आहे. हजारो वर्षांपासून दलितांवर अत्याचार होत आलेले आहेत. मात्र विसाव्या शतकात बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व विचार यामुळे दलित समाजात जागृती निर्माण होऊ लागली व त्यांना आत्मभान प्राप्त झाले.भारतीय स्वातंत्र्य व राज्यघटनेत निर्देशित केल्याप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता यासारख्या मूल्यांवर आधारित समाजाची निर्मिती, बाबासाहेबांसह लाखो अनुयायांनी घेतलेली बौद्ध धर्माची दीक्षा यासारख्या ऐतिहासिक, क्रांतिकारक घटनांमुळे भारतीय समाजात परिवर्तन घडून येईल व दलितांची स्थिती सुधारेल, अशी अपेक्षा दलित, अस्पृश्य वर्गाकडून व्यक्त केली जाऊ लागली. मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणे समाजवास्तव बदलले नाही. दलितांवर अत्याचार होतच राहिले. गाव पातळीवरील अस्पृश्यता, सार्वजनिक पाणवठ्यावर, विहिरीवर पाणी पिऊ न देणे, पोळ्यासारख्या सणाला दलितांनी वाद्य वाजवायला नकार दिला म्हणून त्यांच्यावर स्पृश्य समाजातील गावकऱ्यांनी बहिष्कार टाकणे, गायरान जमिनी दलितांनी कसण्यासाठी ताब्यात घेतल्यावर त्यांच्या उभ्या पिकात जनावरे घालणे, आंतरजातीय विवाह करणाऱ्या अस्पृश्य मुलाला मारहाण, अस्पृश्य जातीच्या मुलीवर सवर्ण मुलांकडून लैंगिक अत्याचार अशा गोष्टी घडतच राहिल्या. या सर्व घटनांचे उल्लेख, चित्रण या नाटकात आलेले आहे.

दलित नेते, कार्यकर्ते यांनी या अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढा दिला. बाबासाहेबांनंतर काही काळ चळवळ जिवंत ठेवली. लोकांमध्ये स्वाभिमान, लढवय्येपणा निर्माण केला. पण चळवळ ऐन जोमात असताना त्यांना सत्तेची हाव निर्माण झाली व अलगदपणे ते समाजापासून दूर निघून गेले. त्यांच्या वैचारिक मतभेदांमुळे व राजकीय महत्वाकांक्षेमुळे चळवळीत फूट पडली. नेत्यांनी स्वतःचा स्वार्थ साधून घेतला. कार्यकर्ते मात्र दिशाहीन झाले. त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य चळवळीला वाहून घेतलेले होते. उतारवयात ते एकटे पडले. दलितांचे प्रश्न काही प्रमाणात सुटले. इतर प्रश्न तसेच राहिले. अशा सामाजिक वास्तवाचे चित्रण या नाटकात आलेले आहे.

- **'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाची भाषाशैली-**

दलित साहित्याची भाषा ही इतर साहित्य प्रवाहातील साहित्याच्या भाषेहून वेगळी असते. किंबहुना दलित साहित्याची भाषा हे दलित साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात दलित पँथर या चळवळीच्या काळातील दलितांवर होणारा अन्याय,शोषणावर आधारलेली व्यवस्था, त्याविरुद्ध तत्कालीन दलित लेखक, नेते, कार्यकर्ते यांनी दिलेला लढा, त्या वेळची त्यांची ती अन्यायाला विरोध करणारी, त्यामागील मानसिकतेवर तुटून पडणारी भाषणे, दलितांचे दुःख, अंतर्मनातील वेदना, पँथरची चळवळ ओसरल्यानंतर दलित नेत्यांची बदललेली भाषा, तिच्यात आलेला पांढरपेशेपणा, प्रामाणिक कार्यकर्त्यांचा संताप या सर्व बिंदूंवर जाऊन या नाटकाची भाषा अभ्यासावी लागेल.

पँथरची चळवळ जोरात असताना या नाटकातील भाईची भाषा ही आक्रमक, बंडखोर, चिथावणीखोर, दलितांमधील स्वाभिमान व आत्मसन्मानाला हाक देणारी, त्यांना

लढण्यासाठी उद्युक्त करणारी आहे. भाईंच्या या भाषेबद्दल मिलिंद त्यांनाच आठवण करून देताना म्हणतो की, "काय धार होती भाई त्या काळातल्या तुमच्या शब्दाला. कोलमडून गेलेल्या मनाला शक्ती द्यायचे तुमचे शब्द. लंगडंसुद्धा पळायचं तुमचे शब्द ऐकून. आग ओकायचे तुमचे शब्द. जो ऐकायचा त्याचं रक्त सळसळायचं. कानशीलं गरम व्हायची. छाती फुगून यायची आन् मनगट दगडासारखं व्हायचं. जमीनदार, धनदांडगे, जातीयवादी चळचळ कापायचे तुम्हाला ऐकून" (पृ.१६). अशी भाषा या नाटकातील पँथरच्या काळातील दलित नेतृत्वाची दिसून येते.

चळवळ थंड झाल्यानंतर दलित कार्यकर्त्यांची अवस्था वाईट होते. त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य चळवळीसाठी वाहून दिलेले असते. मिलिंद, मंजुळामाय यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी चळवळीसाठी विवाहसुद्धा केलेला नसतो. दलितांच्या चळवळीचा राजकारणात जाऊन मोठमोठी पदे मिळवण्यासाठी नेत्यांना उपयोग होतो. पण कार्यकर्त्यांना काहीच फायदा होत नाही. त्यांचे, दलितांचे प्रश्न, समस्या संपलेल्या नसतात. त्याचप्रमाणे सर्व आशा मावळलेल्या असतात. अशा अवस्थेत त्यांच्या भाषेतून चीड, संताप व्यक्त होताना दिसून येतो. 'मग चळवळीची माय का निजविली?' (पृ. १८), 'थू, असल्या छिनाल लढाईवर' (पृ. १७), 'मायचा भोसडा त्या इतिहासाच्या!' (पृ. १७), अशी शिव्यांनी युक्त भाषा मिलिंदच्या तोंडी आलेली आहे. 'पण त्या सिंदळीच्या मालीपाटलानं घातली माय'(पृ. २२), असे दशरथ अन्याय करणाऱ्या व्यक्तीबद्दल एके ठिकाणी म्हणतो.

दिनकरराव यांच्यावर जेव्हा कार्यकर्ते संशय घेतात. तेव्हा त्यांच्या तोंडीही 'मायघाल्या' (पृ. ४०), 'कोणत्या रांडेच्यानं सांगितलं तुम्हाला की माझ्यात आणि भाईत दुरावा आहे?' (पृ. ४१) असे शब्द येतात. थोडक्यात, चीड, संताप, राग ज्या शब्दांमधून व्यक्त होऊ शकतो, त्या शब्दांमधून स्वाभाविकपणे लेखकाने व्यक्त केला आहे.

अरुंधती, अरविंद हे उच्चवर्णीय ब्राह्मण कुटुंबातील आहेत. तर भास्करराव, भगवान पाटील हे सवर्ण आहेत. त्यांच्या तोंडी त्या-त्या प्रकारची प्रमाणभाषा आलेली आहे. प्रत्येक व्यक्तिरेखा त्यांच्या संवादाच्या भाषेतून आपल्यासमोर साकार होते. या नाटकात मुस्तफा ही मुस्लिम व्यक्तिरेखा आलेली आहे. तिच्या तोंडी हिंदी बोली आलेली आहे. ती देखील प्रमाण हिंदी नसून सामान्य अशिक्षित माणसांकडून बोलली जाणारी हिंदी आहे. उदाहरणार्थ, "आपना भाई बदल गया क्या रे? आपनेकू वळखबी देत नाय. मिलिंदभौ, तेरा जरा वजन पडेगा. तू जोर से दे भला आवाज" (पृ.१४). लक्ष्मण, दशरथ, मंजुळामाय हे ग्रामीण भागातील असल्याने त्यांच्या तोंडी बोली भाषेतील संवाद आलेले आहेत. अशा रीतीने पात्र, प्रसंग परिस्थिती यानुसार या नाटकाची भाषा बदलताना दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

**१. 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाचे कथानक सांगा .**

## २ब.३ समारोप

डॉ. बाबासाहेबांच्या आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेला तरुण जातीय व्यवस्था उलथून टाकण्याच्या जिद्दीने पेटून उठला आणि प्रत्येक दलित समाजातील तरुण जागृत

झाला. आणि आपल्या विचाराच्या जोरावर लिखाण करू लागला आणि मराठी साहित्यात एक मोठी चळवळ निर्माण झाली. समाजाच्या वेगवेगळ्या थरातील लोक आपली दु:ख दलित साहित्याच्या माध्यमातून मांडू लागली. दलितांनी आपल्या जीवनातील जातीयतेची दहाक अनुभव आपल्या साहित्याच्या माध्यमातून मांडली त्यामुळे समाजातील सर्व थरातील मंडळींनी एक दलित चळवळ उभी केली त्यामध्ये अनेक दलित तरुणांचे घरे उदवस्त झाली. अशाच एका तरुणाची कहाणी या नाटकातून ऋषिकेश कांबळे यांनी वास्तविकपणे रेखाटले आहे.

'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातून दलित पँथर ज्या दलित तरुणाने डोक्यावर घेतली आणि त्याच्या जीवनाच्या संघर्षाचे वर्णन या नाटकातून आले आहे .

## २ब.४ स्वाध्याय

- **दीर्घोत्तरी प्रश्न-**

१) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातून दलित जाणिवा कशा पद्धतीने व्यक्त झालेल्या आहेत, ते सविस्तर लिहा.
२) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातून दलितांच्या संघर्षाचे विविध पदर कसे उलगडून दाखविलेले आहेत, ते लिहा.
३) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाच्या आधारे दलित पँथरची चळवळ, तिचा उदय व अस्त याचे चित्रण कसे आलेले आहे, ते सोदाहरण लिहा.
४) दलितांच्या चळवळी मोडल्यानंतर दलित कार्यकर्त्यांची अवस्था कशी झाली, हे 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाच्या आधारे उलगडून दाखवा.
५) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात दलित नेत्यांच्या बदललेल्या भूमिकेचे चित्रण कसे आलेले आहे, ते सविस्तर लिहा.

- **टीपा-**

१) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाची भाषाशैली
२) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील संघर्ष
३) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील दलित कार्यकर्त्यांची अवस्था
४) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील दलित नेते
५) भास्करराव
६) भाई
७) दिनकरराव
८) मिलिंद
९) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील दलित जाणिवा
१०) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील ग्रामपातळीवर वास्तव

- **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गंगीचे लग्न लावून देण्यासाठी कोण संघर्ष करते?
२) गंगीचे लग्न कुणासोबत लावून दिले जाते?
३) 'भाई तुम्ही कुठे आहात!' हे नाटक कोणत्या वर्षी प्रकाशित झाले?

४) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाचे दिग्दर्शन कुणी केलेले आहे?
५) 'भाई तुम्ही कुठे आहात!' हे नाटक लिहिण्यासाठी लेखक ऋषीकेश कांबळे यांना कुणी प्रेरणा दिली?
६) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात चळवळीत पूर्णवेळ काम करता यावे म्हणून कोण अविवाहित राहिलेले आहेत?
७) भाई व दिनकरराव यांच्यात कोणत्या मुद्द्यावरून वैचारिक मतभेद होतात?
८) भाईंना सत्ताधारी पक्षाकडून कोणते पद दिले जाते?
९) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातील मालीपाटलाचा मृत्यू कुणामुळे होतो?
१०) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात पोळ्याला वाजवले नाही म्हणून कोणत्या गावातील अस्पृश्यांवर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकलेला आहे?
११) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकात कोणत्या गावातील लोकं अस्पृश्यांना सरकारी विहिरीवर पाणी प्यायला मनाई करतात?
१२) भास्करराव हे साखर कारखान्यावर संचालक म्हणून कुणाची नेमणूक करतात?
१३) भास्कररावांवर कोणत्या पंथाचा प्रभाव असतो?
१४) अरविंदच्या वडिलांचे नाव काय आहे?
१५) अरविंदविरुद्ध त्याच्या जातीतील कोण कारस्थाने करत असते?
१६) भाईंना अर्विन्दमुळे आपल्या बातम्या फुटत असतील, असे कोण सांगते?
१७) दिनकररावांनी घरामधील टेबलवर कुणाची प्रतिमा ठेवलेली आहे?
१८) अरविंद-अरुंधती यांच्या घरात कुणाकुणाच्या प्रतिमा आहेत?
१९) विजयावाहिनी अरुंधतीला मुलगा अथवा मुलगी झाल्यावर कुणाचे नाव ठेवायला सांगतात?
२०) सुभाष हा भाईंकडे कुणाविषयी तक्रार करतो?

## २ब.५ संदर्भ ग्रंथ


१) कांबळे, ऋषीकेश, भाई तुम्ही कुठे आहात!, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, मार्च, २०१६.
२) कोतापल्ले, नागनाथ व इतर, ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य, यशवंतरावचव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन सप्टेंबर २००१.
३) मेश्राम, योगेंद्र, दलित साहित्य: उद्गम आणि विकास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.


❖❖❖❖

munotes.in

# ३अ

## स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व मराठीतील परंपरा

**घटक रचना**

३अ .० उद्दिष्टे

३अ.१ प्रस्तावना

३अ.२ स्त्रीवादी साहित्याची संकल्पना

३अ.३ स्त्रीवादी साहित्य पूर्व परंपरा

३अ.४ समारोप

३अ.५ संदर्भ

३अ.६ स्वाध्याय

३अ.७ अधिक वाचन

### ३अ.० उद्दिष्टे

१) स्त्रीवादी साहित्याची संकल्पना समजेल .

२) भारतीय समाज व्यस्थेतील स्त्री जीवन समजेल

३) स्त्रीवादी साहित्याच्या पूर्व परंपरा समजेल

४) मराठी साहित्यात स्त्रियांच्या जीवनातील संघर्ष समजेल.

### ३अ.१ प्रस्तावना

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये प्राचीन काळापासून महिलांना समाजात दुय्यम स्थान असल्याचे पाहावयास मिळते. महिलांवरील अत्याचार हा दिवसेन दिवस वाढतच होता. भारतीय संस्कृतीने त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा जाणीव पूर्वक प्रयत्न केल्याचे आपणास दिसून येते . परंतु आधुनिक काळापासून फार महत्वाचे बद्दल घडून आले. त्यामध्ये स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम क्रांती सूर्य म. जोतीबा फुले यांनी केले आणि महिलांचा क्रांती सूर्य उगवला. म. फुले आणि सावित्रीबाई फुले या दोन दाम्पत्याने महिलांच्या दु:ख, वेदनेवर प्रकाश टाकण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाची बीजे पेरली आणि भारतीय महिलांना शिक्षणामुळे त्यांच्यात हिम्मत आली, आणि आपले माणूस म्हणून काय दु:ख आहेत ते जगासमोर महिला मांडू लागल्या प्राचीन काळातील महिला शिक्षण घेणे म्हणजे धर्म बुडी आहे. या भाकड कल्पनाचा धिक्कार करून भारतीय महिला शिकली

सज्ञानी बनली आणि मराठी साहित्य प्रवाहात स्त्रीवादी साहित्याची वेगळी ओळख समाजाला झाली . या प्रकरणात आपण महिलांच्या साहित्य संकल्पनेचा विचार करीत असताना त्यांच्या पूर्व पीठिकेचा विचार करावा लागणार आहे.

स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचा विचार करीत असताना प्रथम मराठी वाङ:मयीन प्रवाहाचा विचार करणे आवश्यक आहे. प्राचीन काळापासून मराठी साहित्य अस्तित्वात असल्याचे आपणास दिसून येते . परंतु खऱ्या अर्थाने मराठी साहित्याच्या विविध कक्षा विस्तारण्याचे कार्य हे पुरोगामी विचारातून झाले आहे. साधारणपणे इ. स. १९६० नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित वर्ग जागृत झाला. आणि आपल्या जीवनातील दु:ख, वेदना साऱ्या जगा समोर परखडपणे मांडू लागला आणि त्या पाठोपाठ ग्रामीण, स्त्रीवादी, साहित्याने ही जोर धरला त्यातूनच महिला जागृत झाल्या आपल्या जीवनातील अनेक समस्येचा उलगडा करण्याच्या उद्देशाने त्यांच्या हातात लेखणी आली आणि मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावल्या.एकोणीसावे शतक हे मुळातच सामाजिक परिवर्तनाचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात समाजातील सर्व घटकापर्यंत स्व अस्तित्वाची जाणीव झाली. आणि नव्या जाणिवेतून साहित्य निर्माण झाले. त्यामध्ये दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी , जनवादी, कामगार, आणि विज्ञानवादी निर्माण झाले यातून खऱ्या अर्थाने जाणिवेचे साहित्य निर्माण झाले. एकोणीसावे शतक हे परिवर्तन वादी असल्यामुळे तत्कालीन इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला आणि इथल्या सामाजिक क्रांतीला प्रेरक ठरल्याचे दिसून येते. साहित्य आणि समाज यांचा अतिशय जवळचा संबंध आहे त्यामुळे समाजाच्या प्रत्येक स्थरात परिवर्तनाचे वारे आले. आणि मराठी साहित्याने १९६० नंतरच्या काळात विविध जाणिवांचे साहित्य आकारास येऊ लागले. त्यामध्ये स्त्रीवादी जाणिवेचा साहित्य प्रवाह विस्तारलेला दिसतो.

- **स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य :**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्वातंत्र्याची रणधुमाळी सुरू असताना भारतीय समाजामध्ये विविध क्षेत्रात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. आणि त्याचा परिणाम दीन दुबळया समाजावर झाला आहे. त्यामध्ये स्त्री , दलित , कामगार , या लोकांना खरा जीवनाचा अर्थ कळाला, त्यांच्यात आपल्या स्वत्वाची जाणीव निर्माण झाली. याचा परिणाम म्हणून मराठी साहित्य प्रवाहात नवनवीन प्रवाह अस्तित्वात आले आणि त्यातूनच स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य निर्माण झाले. मानवी जातीचा इतिहास जेवढा प्राचीन आहे तेवढाच मानवी शोषणाचा आहे आणि त्यातील सर्वात ज्यास्त जर या शोषणाला बळी कोण असेल तर ते म्हणजे या देशातील सर्वात कर्तबगार आणि धाडशी महिला होय. प्राचीन काळापासून महिलांवर अन्याय अत्याचार होत होता माणूस असूनही पशू पेक्षा हीन जीवन तिच्या वाट्याला आले होते. आजच्या ही आधुनिक समाजात महिला आणि पुरुष यात भेद केला जातो . तिच्या सुरक्षिततेच कोणीही विचार करत नाहीत. परंतु या सर्व बंधनातून ती स्वत:ची सुटका करून घेतली आहे आणि प्रत्येक क्षेत्रात आपली खंभीर बाजू मांडली आहे. वेगवगळ्यां चलवळींच्या माध्यमातून तिच्यात आत्मभान निर्माण झाले आहे.

जागतिक पातळीवर स्त्रीमुक्तीच्या चळवळींचा विचार केला असता असे आपणास दिसून येते की, फ्रेंच राज्य क्रांतीने जगाला समता, बंधुता, न्याय , या मानवी हक्काच्या जाहिरनामाने

स्त्रीमुक्ती चळवळ जोर धरली आहे. त्यातूनच महिलांना या व्यवस्थेविरुद्ध लढण्याचे बळ मिळाले आहे. या सर्व भाकड व्यवस्थेच्या विरुद्ध स्त्री परखडपणे आपले विचार मांडू लागली.

भारतीय समाजात हा मुळातच पुरुष प्रधान व्यवस्थेचा समाज आहे त्यामुळे या समाज व्यवस्थेमध्ये महिलांवर सतत अन्याय होत होता परंतु आधुनिक काळात स्वातंत्र्य आणि समतेच्या लढयातून राष्ट्र ,समाज आणि व्यक्ती यांच्यात क्रांतीकारक बदल घडून आले. आणि भारतीय समाजात जी विषमता होती त्या व्यवस्थे विरुद्ध वेदना आणि विद्रोहाने आवाज उठविण्यात येऊ  लागले आणि याचाच परिणाम समाजामध्ये विविध वाङ:मयीन प्रवाह उदयास आले यातील एक प्रवाह म्हणजे ‘स्त्रीवादी साहित्य प्रवाह होय.मानवी जातीचा इतिहास जेवढा प्राचीन आहे तेवढाच गुलामगिरीचा इतिहास प्राचीन आहे. यांपैकी स्त्रियांचा ही इतिहास तेवढाच प्राचीन आणि शोषणाचा आहे. पुरुष प्रधान समाजात जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला तिच्या जीवनात मुलगी , बहीण, पत्नी , आई, सून, सासू, अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडत असताना त्याना अनेक प्रकारे शोषणाला सामोरे जावे लागल्यामुळे त्यांच्यात आत्मभान निर्माण झाले आणि मराठी साहित्यात नव साहित्य निर्माण झाले.

### १) स्त्रीवादी जाणिवेच्या कविता :

स्त्रीवादी साहित्य हे मुळातच दु:खी, कष्टी, शोषनाधिष्ठित असल्याचे आपणास दिसून येते. सासर , माहेर या पाशामध्ये ती प्राचीन काळापासून  आहे. यात ती सर्वांची सेवा करण्यातच तीचे आयुष्य जाते आहे. त्यातूनही तो सारवास , केशवपन, सतीप्रथा , बालविवाह, कुमारीमाता, बालजरठ विवाह पद्धती , सोवळे – ओवाळे, माहेरला पोरक होणे, जिवाभावाची नाती दुरावणं या सर्व कठीण परिस्थितीचा आज ही महिला सामना करताना दिसून येते. वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून आपल्या नशिबात आलेल्या घटना घडामोडीचा आलेख वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून स्त्रीवादी साहित्य आपली भूमिका मांडत असते. असे आपणास दिसून येते.

डॉ. सदाशिव सरकटे यांनी १९८० नंतरची स्त्रीवादी कविता’ या समीक्षा ग्रंथांमध्ये मध्ये असे म्हंटले आहे की , कविता हा स्त्रीचा विसावा आहे. कवितेच्या माध्यमातून आपल्या जीवनातील दु:ख, वेदना, शोषण, ही महिला परखडपणे मांडून आपले मन हलके करीत असते.

कवित्री ललिता गादर्गे  म्हणतात,

“वाण बादललंस आई"
भोगणं उरलंच पण
ते आलंच पदराला पदर लागून
आणि जाईलही ते तसंच
तारकात घर बांधू बघणाऱ्या
माझ्या लेकीच्याही वाट्याला”१३६

असा आदिम दु:खाचा पदर तिच्या आई पासून ते लेकीपर्यंत जातो. ही लेक जारी नव्या विचाराची नवस्वातंत्र्याची स्वप्ने पहात असली तरी तिला पुरुषी भोगाला , त्यांच्या अन्याय अत्याचाराचा सामना करावाच लागतो अशी स्पष्ट भूमिका स्त्रीवादी साहित्यात मांडली जाते.

तसेच अनुराधा पाटील ही आपल्या काव्य लिखानाच्या माध्यमातून ते म्हणतात की, जेव्हा स्त्री वयात येते तेव्हाच तिच्या आयुष्यात दु:खाचा प्रवेश होतो. तिचे स्वतंत्र संपते आणि आणि ती गुलाम बनत असते.

अशा विविध साहित्य प्रकारातून भारतीय स्त्री आपले दु:ख मांडताना दिसून येते.

**१) स्त्रीवादी कादंबरी :**

स्त्रीवादी साहित्याचा धावता आढावा घेत असताना मराठी साहित्यातील स्त्रीवादी पहिली कादंबरी म्हणून १८७३ मध्ये साळूबाई तांबवेकर यांची

'चंद्रप्रभा विरहवर्णन' या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. त्या नंतर वेगवेगळ्या स्त्री लेखीका यांनी समाजातील वेगवेळया विषयात हात घातले . विसाव्या शतकापासून तर स्त्री लिखाणाचा जोर वाढला आणि समाजातील वास्तव जीवन आणि महिलांच्यावर होत असलेला अन्याय यावर साहित्याच्या माध्यमातून महिला वर्ग समाजाला कोरडे ओढण्याचे कार्य सरू केले आहे. या शतकात स्त्री सुधारणा करण्याच्या उद्देशाने कादंबरी लिखानास सुरुवात केली. आहे. काशीबाई कानिटकर यांनी 'रंगराव' ही कादंबरी लिहिली. तर जानकीबाई देसाई यांनी समाजात चालत असलेली 'हुंडा' प्रथा मोडण्यासाठी हुंडा घेणे किती महाभयंकर आहे. त्याचा त्या महिलेला आपला जीवन संघर्ष कसा करावा लागतो यावर समाजाचे लक्ष वेधण्यासाठी १९१५ मध्ये 'गृहलक्ष्मी' ही कादंबरी लिहिली. तसेच ' विधवांचे प्रश्न मांडण्यासाठी 'यशोदाबाई भट यांनी "भूतांचे बंड" ही कादंबरी लिहिली. सन १९३० मध्ये कमलाबाई बंबेवाले 'बंधमुक्त' ही कादंबरी लिहून स्त्रियांच्या घटस्फोटाची आणि पोटगीची या कादंबरीतून चर्चा केली आहे. मात्र विभावरी शिरूरकर यांनी सशक्त कादंबरी लेखन केले आहे. "हिंदोळ्यावर" या कादंबरीत विभावरी शिरूरकर यांनी पौढ स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केली आहे.

अशा प्रकारे स्त्रियांनी इतर साहित्य प्रकारात ही आपले लिखाण केले आहे. त्यामध्ये स्त्रियांनी आत्मकथन , आत्मचरित्र ही अतिशय प्रभावी पणे लिहिले आहेत. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजेच १९१० मध्ये रमाबाई रानडे यांनी 'आमच्या आयुष्यातील कांही आठवणी" हे मराठीतले पहिले आत्मचरित्र लिहिले.

एकूणच मराठी साहित्याच्या बाबतीत एक विशेष बाबा जाणवते ते म्हणजे, स्त्रीवादी साहित्य हे फक्त मध्यम वर्गाच्या आणि उच्चवर्गाच्या महिलांच्या बाबतीत स्त्रीवादी साहित्य चर्चा करताना दिसून येते. हीच एक स्त्रीवादी साहित्याची मर्यादा म्हणावे लागेल.

- **स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा व परंपरा**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीवादाला जी सुरुवात झाली ती म्हणजे एकोणिसाव्या शतकात भारतात ज्या ज्या सुधारणावादी चळवळी सरू झाल्या त्याचा परिणाम म्हणजे महिला वर्ग ही जागृत झाला. कारण या काळात समाज सुधारण्यासाठी समाजात वेगवेगळ्या विभागात सुधारणा होत असत. कारण प्रथम राजाराम मोहनराय यांनी बंगाल मध्ये महाराष्ट्रात म. जोतिबा फुले यांच्या कार्यांचा प्रभाव स्त्रीवादी साहित्यावर दिसून येतो. इंग्रजी विद्येच्या प्रसारामुळे इथल्या समाजाला नव्या विचारांची ओळख झाली आणि त्याचा प्रभाव स्त्री लिखानावर झाल्याचे दिसून येते हीच एक प्रेरणा आहे असे आपणास म्हणता येईल. स्त्रीवादाला वाचा फोडण्याचे महान कार्य म. फुले यांनी केले आहे म्हणून स्त्रीवादी साहित्याचे खरे प्रेरणास्थान क्रांती सूर्य म. फुले आहेत. या प्रेरणेतूनच ताराबाई शिंदे यांनी स्त्रीवादी जाणिवेचा ग्रंथ म्हणजे "स्त्री –पुरुष तुलना' हा होय हा ग्रंथ लिहून ताराबाई शिंदे यांनी भारतीय स्त्रीवादाचा पाया घातला.म. फुले यांनी ताराबाई शिंदे व पंडित रमाबाई यांच्या विचाराला चालना देऊन त्यांना प्रोत्साहण देण्यासाठी स्त्रीवादी भूमिका स्पष्ट मांडली आणि भारतीय समाजाला लागलेला सतीप्रथेवर कडाडून टीका केली की, " आज वर कोणता पुरुष सती गेला का? असा खडा सवाल या समाजव्यवस्थेला जाब विचारले आणि आर्य भट्ट यांच्या ग्रंथावर टीका केली. म. फुले यांनी महिलांच्या उद्धार करण्यासाठी अहोरात्र मेहनत करून त्यांना न्याय मिळून देऊन समाजात सन्मानाणं जगण्याचे स्वातंत्र दिले आहे. या त्यांच्या विचाराचा वेध घेत असतांना स्त्रीवादी विचाराचा पाया मानावे लागेल.इ.स.१८८२ मध्ये पंडिता रमाबाई 'आर्य महिला समाज' ही पहिली महिला संघटना स्थापन करून महिलांच्या प्रश्नांची दखल घेतली आहे. आणि स्त्रीमुक्ती कार्याचे संगटनात्मक स्वरूप दिले आहे.

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत स्त्रीमुक्तीच्या संदर्भातील घटना व भारतीय तसेच महाराष्ट्रीय सामाजिक, सांस्कृतीक व राजकीय घटना प्रसंगाचा परिणाम म्हणून मराठी साहित्य आज विविध स्तरावर स्त्री लेखिकांनी वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१. स्त्रीवादी साहित्याची सविस्तर चर्चा करा.

## ३अ.४ समारोप

भारतीय समाज व्यवस्थेत प्राचीन काळापासून प्रत्येक क्षेत्रात मानांचे आणि सन्मानांचे स्थान महिलाना समाजात नव्हते . पुरुष प्रधान संस्कृतीने तीला एक गुलाम बनवले होते. स्त्री एक बोगाची वस्तु आहे. तीला काही कळत नाही ती फक्त परूषांची सेवा करण्यासाठी तीचा जन्म झाला आहे. अशी दुष्ट प्रथा प्राचीन काळापासून होती . परंतु आधुनिक काळात परिवर्तनाचे वारे वाहू लागले आणि या गुलाम समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गाला म.फुले यांच्या प्रेरणेने त्यांच्या दु:खाला वाचा फोडली . ती म्हणजे त्यांनी सुरू केलेल्या स्त्री शिक्षणाने त्यांच्यात आत्मभान निर्माण झाले. भारतीय समाजात इंग्रजी शिक्षणाने फार मोठे बदल झाले त्यात स्त्रियांनी सर्वात ज्यास्त प्रगती केली आहे. आधुनिक काळातील स्त्री ही  या समाज

व्यवस्थेचा धिक्कार करून सर्व बंदणे तोडून आपले समाजात अस्तित्व निर्माण केले. आणि परूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात प्रगतीची फरारी घेतल्याचे आपणास दिसून येते.

कला, साहित्य , प्रशासन , राजकारण या सर्व क्षेत्रात पुरुषा पेक्षा सरस भूमिका बजावतांना दिसून येतात. आज स्त्री भारतीय समाजात सन्मानाने जगतानां दिसून येते. परंतु तिच्यावर ज्या ज्या वेळी अन्याय झाला आहे ती मात्र संयमाने समाजापुढे आपल्या जीवनातील घटना आणि प्रसंगाचे चित्रण करत गेली आणि त्यातूनच नव साहित्य प्रकार अस्तित्वात आला तो म्हणजे स्त्रीवादी साहित्य प्रवाह होय. स्त्रियांचे साहित्य हे जाणीवेतून निर्माण झाले आहे. म्हणून आपल्या अभ्यासक्रमाला स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य ठेऊन समाजात बदल घडावा आणि स्त्री बदल समाजात दुष्ट भावना दूर व्हावी हा ही एक उद्देश दिसून येतो . स्त्री यांनी लिहिलेल्या साहित्यातून सर्व साहित्य प्रकार आला आहे , कथा, कविता, नाटक , कादंबरी इ. साहित्य प्रकारातून आपले दु:ख मांडले आहे. म्हणून या दुसऱ्या घटकात आपण निवडक दहा कथांचा अभ्यास करणार आहोत .

## ३अ.५ संदर्भ

१) तिचा अवकाश- संपा.डॉ.वंदना महाजन, डॉ.विनोद कुमरे, डॉ.सूर्यकांत आजगावकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.नोव्हे.२०२१

२) स्त्रीवादी साहित्य समीक्षा व संशोधन वाङ:मय ( निवडक ) गोदावरी प्रकाशन ,प्रोफेसर कॉलनी, सावडे, अहमदनगर. ४१४००३

## ३अ.६ स्वाध्याय

१) स्त्रीवादी साहित्याची परंपरा सांगा.

२) स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा व स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

३) स्त्रीवादी साहित्य हे जाणिवेचे साहित्य आहे आढावा घ्या.

४) स्त्रीवाद म्हणजे काय ते सांगून स्त्रीवादी कवितेचा आढावा घ्या.

## ३अ.७ अधिक वाचन

तिचा अवकाश- संपा. डॉ. वंदना महाजन, डॉ.विनोद कुमरे, डॉ.सूर्यकांत आजगावकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.नोव्हे.२०२१

❖❖❖❖



munotes.in

# ३ब

## स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य: (तिचा अवकाश)

**घटक रचना :**

३ब.० उद्दिष्टये

३ब.१ प्रस्तावना

३ब.२ स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व मराठी परंपरा

३ब.२.१ निवडलेल्या स्त्रीवादी कथांचा अभ्यास

३ब.२.२ पाऊस आला मोठा – गौरी देशपांडे

३ब.२.३ दुष्काळ – सानिया

३ब.२.४ खेळ मांडियला – प्रिया तेंडुलकर

३ब.२.५ सुटे गिऱ्हाण - उर्मिला पवार

३ब.२.६ आहे कुछ अब्र – मेघना पेठे

३ब.२.७ महिषासुरमर्दिनी – नीरजा

३ब.२.८ आईच्या नावानं – प्रज्ञा पवार

३ब.२.९ दरी – प्रतिमा जोशी

३ब.२.१० माझ्या जन्माची गोष्ट - मनस्विनी लत्ता रवींद्र

३ब.२.११ निर्वाणाची स्वगते – वंदना महाजन

३ब.३ सारांश

३ब.४ प्रश्न

३ब.५ संदर्भ

## ३ब.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

२) भारतीय समाजात स्त्रियांची होणारी मानसिक पिळवणूक लक्षात येईल .

३) विद्यार्थ्यांच्या मनातील स्त्रियांच्या विषयी आदर निर्माण होईल .

munotes.in

४) स्त्री – पुरुष समानता वाढीस लागेल.

५) विद्यार्थ्यांना महिलांच्या वर होत असलेल्या जुलमाची जाणीव निर्माण होईल .

## ३ब.१ प्रस्तावना

'तिचा अवकाश' या संपादित कथासंग्रहात दहा स्त्रीवादी कथांचा समावेश आहे. १९७५-८० च्या काळापासू आधुनिकता, आत्मशोध, मुक्तता आणि बंडखोरी या गुणवैशिष्ट्यांनी मराठी स्त्रीवादी कथेचा तोंडवळा तयार होऊ लागला. या कथांमधून स्त्री-पुरुष संबंधाची चर्चा विविध स्तरावर आणि अधिक सूक्ष्मपणे होऊ लागली. गौरी देशपांडे यांच्या कथेपासून या स्त्रीवादी कथांचा प्रवाह गृहीत धरून २००० च्या दशकात लिहिणाऱ्या मनस्विनी लता रवींद्र या स्त्री कथाकारांपर्यंतचा प्रवास या दहा कथांमधून साकार होतो. गौरी देशपांडे यांच्याप्रमाणे मेघना पेठे, प्रिया तेंडूलकर, सानिया, उर्मिला पवार, वंदना महाजन, प्रतिमा जोशी आणि मनस्विनी लता रवींद्र या सर्व स्त्री कथाकारांचा स्त्रीवादी चळवळ किंवा सिद्धांतन यांच्याशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आहे. या सर्व कथांचे विश्लेषणस्त्रीवादी परिदृष्टीतून करता येईल..

## ३ब.२ स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व मराठी परंपरा

### ३ब.२.१ निवडलेल्या स्त्रीवादी कथांचा अभ्यास :

लिंगभेदाच्या समाजरचित अवकाशात स्त्री म्हणून मिळणारी गौण वागणूक या कथांमधून पानोपान वाचता येते. कुटुंबव्यवस्था, विवाह व्यवस्था, आर्थिक संबंधाचे राजकारण याविषयीचे विश्लेषण या कथांमधून साकार झाले आहे. लैंगिक गरजेविषयी पापाची जाणीव, नैतिकता विषयक कल्पनांची गुंतागुंत यांच्या कचाट्यात स्त्रीची स्वजाणीव विखंडीत होते. स्त्री-पुरुष नातेसंबंधसामाजिक संकेताच्या चौकटीतून पाहिले जाते. त्यामुळे या नातेसंबंधात नैसर्गिक, मुक्त असा अवकाश मिळत नाही. या मानसिक संघर्षाला या कथांच्या आशयात अवकाश मिळाला आहे. या संग्रहातील कथा स्त्री-पुरुष अशा ध्रुवीय संबंधात 'मैत्र'स्वरुपाची आदर्शवादी, मानवतावादी अपेक्षा कधी व्यक्त होते.तर कधी आत्मशोधाच्या प्रवासात विकसित होत गेलेली स्त्री सक्षमीकरणाची जाणीव कथाबंधातून उलगडत जाते.

### ३ब.२.२ पाऊस आला मोठा – गौरी देशपांडे :

'पाऊस आला मोठा' या कथेत तरुण मुलगी सावित्री आणि तिच्यापेक्षा वयाने फक्त चार ते पाच वर्षांनी मोठी असलेली तिची सावत्र आई अमला यांच्या संघर्षाचे, अनुभवांचे आणि जगाकडे बघण्याच्या वेगवेगळ्या दृष्टीचे विश्लेषण आले आहे. या दोन्ही स्त्रिया वेगवेगळ्या आर्थिक स्तरांतून आलेल्या असल्यामुळे त्यांची जगण्याकडे बघण्याची दृष्टी वेगळी आहे. सावित्री एक उच्चमध्यमवर्गीय स्तरातील शहरात राहणारी मुलगी दिसते. जी आईविना वाढलेली, स्त्री म्हणून न घडवलेली मुलगी, जिचे वडील आपल्या व्यवसायात व्यग्र असणारे पारंपरिक पुरुष प्रतिमा धारण करणारे दिसतात. सावित्रीने कर्तव्यनिष्ठ पालकत्व निभावणाऱ्या आपल्या वडिलांच्या सहवासात प्रेम, नात्यातील ओलावा कधी अनुभवलेला नाही. पित्याच्या वर्चस्ववादाविरुद्ध बंड करणारी, आपले विश्व निर्माण करायला धडपडणारी,

त्यासाठी घर सोडणारी, लग्न व्यवस्थेला नाकारणाऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी एक बंडखोर मुलगी सावित्रीमध्ये दिसते. दुसरीकडे सामान्य कुटुंबातील एक निरक्षर मुलगी 'अमला' जी अनाथपण आणि कदाचित आपल्या असाध्य आजारपणामुळे तडजोड करून अप्पांसारख्या प्रौढ पुरुषाशी लग्न करते. नवरा गेल्यानंतर निमूट सावत्र मुलीकडे आश्रयाला येणारी अमला ही कायम परिस्थितिशरण आणि समंजस दिसते. अशा दोन टोकांवरच्या दोघींच्या भगिनीभावाची ही कथा म्हणता येईल.

खर तर उच्चभ्रू वर्गातील सावित्री कोणत्याच प्रकारच्या लादलेल्या बाईपणाच्या चौकटीत वाढली नाही. तरी नातेसंबंधाची गुंतवणूक न झालेली ही मुलगी लग्न, कुटुंब या सामाजिक संस्थांशी फारकत घेत जगते. आधुनिक कपडे, आधुनिक विचारसरणी यांची मक्तेदारी मिरवताना आपण स्वातंत्र्याच्या भ्रामक कल्पनांना कवटाळून बसलो आहोत याचे तिला भान नसते. करून अप्पा अमलाला आपल्या कुटुंबात आणतात. हे सत्य अम्मीच्या मृत्युसमयी सावित्रीला कळते. मानवी नातेसंबंधात भावनिक गुंतवणूक, दृढता आणणाऱ्या. 'कुटुंबाला' आपण गमावून बसलो यांची जाणीव सावित्रीला होते. ही जाणीव 'माणूस' म्हणून आपण एकमेकांशी नाते प्रस्थापित करण्यात अपुरे पडतो या वास्तवाला ठळक करते.

गौरी देशपांडे यांच्या कथेमधून स्त्री-पुरुष संबंधातील समाजाचे नीतिनियम, मध्यमवर्गीय कुटुंबजीवन आणि आधुनिक, बंडखोर म्हणवणाऱ्या स्त्रीचे दुसऱ्या स्त्रीला समजून घेण्याबाबतचे तोकडेपण अधोरेखित होते. लिंगभेदापलीकडे जाऊन ही कथा मानवतावादाला स्पर्श करते.

### ३ब.२.३ दुष्काळ - सानिया :

सानिया यांच्या कथांमधून स्त्रीचा स्वत: आणि भवतालाविषयीचा एक विश्लेषक दृष्टिकोन अभिव्यक्त होत असतो. मानवी नातेसंबंधांचा शोध घेण्याची प्रेरणा त्यांच्या सर्वच कथांच्या मुळाशी दिसते. '**दुष्काळ**' ही कथा 'तो आणि तिच्या' सांसारिक जीवनाचा अवकाश आपल्यासमोर मांडते. लग्न ठरताना मुलाचे घरदार बघून मुली लग्न करतात. कथेतल्या नायिकेने लग्नापूर्वीच आपले लहानसे दोन खोल्यांचे घर बघून आपल्या संसाराची स्वप्ने रचायला सुरुवात केली. लग्नानंतर स्वतंत्र घरात संसार थाटायला मिळणे मैत्रिणींना अप्रूप वाटणारी गोष्ट होती. त्याला आपले घर छोटे असण्याविषयी थोडी कमतरतेची जाणीव आहे. तर नायिकेला छोट्या घरातही संसार थाटण्याविषयी खूप नवल वाटत असते. आईला वाटते 'करू लेकीला मदत थोडीथोडी' तर त्याचा आवेश असतो की "तसं काही मी जरासुद्धा घेणार नाही तुझ्या आईवडिलांकडून. सगळं आपण, आपलं जमवू." अशी त्यांच्या संसार कथेला सुरुवात होते. दोघांच्याच या घराच्या अवकाशात जगताना दोघे दोन पालुपदे चालवत राहतात. त्याला सारखं वाटते अमुक, तमुक घेतलं पाहिजे. तो सारखं म्हणतो, "म्हणूनच मी म्हटलं मोठ्या जागेत जायला हवं." तर रोज जगताना त्याची बेफिकीरतेची सवय मोडू पाहणारी ती त्याला सतत सांगत राहते , "तु नळ घट्ट बंद करत जा पाणी गळतं, फुकट जातं." तो नव्या स्थावरजंगम मालमत्तेचा विचार करतो. पण घर म्हणजे एकाने पसरायचे आणि दुसऱ्याने म्हणजे तिनेच आवरायचे या पुरुषसिद्ध हक्कावर कायम राहतो. मैत्रिणी आणि आई या स्त्रिया म्हणजे सामाजिक संकेतांच्या चौकटीत आपल्या संसाराची घडी बसवणाऱ्या स्त्रिया ज्या तिला नवऱ्याच्या तऱ्हा खपवून घ्यायचा सल्ला

देतात. पुरुषाच्या बेफिकिरीमुळे वाहणाऱ्या नळामुळे पाणी वाया जाणे, दुष्काळाच्या बातम्या, नळाला बादली लावून पाणी भरणाऱ्या बाया काय आणि डोक्यावर पाण्याचे घडे वाहणाऱ्या बाया काय, पाणी जपण्याची सामाजिक जबाबदारी बाईचीच असते या संदर्भांचे वैश्विक भान तिला येते. त्यांचे भांडण स्त्री-पुरुष वृत्ती भिन्नताआणि विषमतेला स्पर्श करते. संसाराला सुरवात झाल्यावर "ती भांबावून गेली. हे घर, हा पुरुष, हा नळ आपण इथे काय करतो आहोत हेच समजेना." (पृ.८९ ) या विधानापासून ते "हे माझे घर आहे? जिथं असं थेंबाथेंबाने पाणी गळायचं थांबणारच नाही तिथ मला कसं राहता येईल? विशेषत: उन्हाळ्यात, दुष्काळाच्या बातम्या रोज पेपरला येत असताना ते कसं शक्य होईल? तिने वळून तिच्या नवऱ्याकडे पाहीलं. आता तो तितका अनोळखी वाटला नाही. ओळखीच्या माणसाबाबत काही करता येणं तिला आता शक्य वाटलं कदाचित अधिक हट्टीपणाने काही म्हणत राहणं किंवा त्याला सोडून देणं." (पृ.९५) या दोन विधानात संसारातील लढाई-झगडे रुटीन होऊन गेल्याची साक्ष पटते. संसाराच्या लढाईत सोबतच्या माणसाची ओळख झाली की वाद-प्रतिवाद करणे सवयीचे होत जाते. संघर्षाशिवाय घर नावाच्या अवकाशात स्त्री आपली जागा निर्माण करू शकत नाही. घर नावाच्या चौकटीत स्त्रीला सजग राहून आपल्या हिताचे रक्षण करावे लागते. असे खटके उडत राहणे सवयीचे करून घेणे नाहीतर ही वर्चस्वाची कोंडी तोडून आपण लग्नबंधनातून मुक्त होण्याचा पर्याय स्वीकारू शकतो असा विचार नायिका करते..हा पर्याय सुचल्यामुळे नायिकेला लग्नसंबंधाच्या परात्मतेपासून मुक्ततेची एका अर्थी दिशा मिळाली.

लग्नसंबंधामुळे एकत्र आलेल्या स्त्री-पुरुष यांच्यात एक नातं निर्माण होणं ही एक प्रक्रिया असते जी सानिया यांच्या दुष्काळ कथेत वाचता येते. दोघेही आपल्या आपल्या जगण्याच्या व्याख्या ठरवत सहजीवन जगू पाहतात. कथेतील नायिका ही आधुनिक स्त्री आहे जी आत्मसन्मान जपते. तडजोड करून कुढत जगणे ती मान्य करणार नाही. भोवतालच्या स्त्रियांच्या सल्ल्याचा चिकित्सक अभ्यास करत आपली दिशा ठरवणारी नायिका सानियाच्या कथेत दिसते.

### ३ब.२.४ खेळ मांडियला – प्रिया तेंडुलकर

सोशालीस्ट पार्टीची उमेदवार निवेदिता पवार ही. जयसिंगराव पवार या कॉंग्रेस आयच्या खासदार आणि पूर्वाश्रमीच्या नवऱ्याविरुद्ध विधानसभेच्या निवडणूक रिंगणात उतरते. विरोधी पक्षाची उमेदवार म्हणून सात-आठ गावे प्रचारासाठी फिरताना भूतकाळाची पाने उलगडत राहते. पहिल्यांदाच निवडणूक लढवत असली तरी तिच्या पक्षाने तिच्या प्रचारावर खूप खर्च आणि आशा बाळगल्या आहेत. देसाई हे तिच्या वडिलांचे मित्र आणि पार्टीचे कार्यकर्ते असल्याने त्यांची निवेदिताचे राजकीय गुरु म्हणून नेमणूक होते. तिला काय, कधी बोलावे यांची शिकवण देत राजकारणात पारंगत करीत असतात. असे कथानक घडत जाते. मूळची निवेदिता रानडे एक खूप हसरी अवखळ चारचौघांसारख्या घरात वाढलेली मुलगी. जयसिंगरावाशी पळून जाऊन लग्न करते. गेली बारा वर्ष मतदार संघातले वर्चस्व टिकवून धरणारा जयसिंगराव "पॉवर इज पवार, पॉलिटिक्स इज अ डर्टी गेम" असे म्हणायचा. त्याच्या विरुद्ध निवेदिताला उभे केल्याने पार्टीची प्रतिमाच एकदम उजळून जायला पुरेशी होती. तिच्या प्रचार यात्रेतच विरोधी पक्ष कॉंग्रेस आयच्या कार्यकर्त्याचा खून झाला असा गवगवा करून तिला शह देण्याचा जयसिंगचा डाव निवेदिता उधळून लावते. जयसिंग असो

की देसाई राजकारण हे बाई माणसाचं काम नव्हे, अशी पुरुषप्रधान वर्चस्वाची भूमिका मांडत असतात. ती भूमिकाच निवेदिता उधळून लावते. बाई,संसार आणि सदा वाघमारेच्या पत्नीचे सौभाग्य संपणे या मागे सत्तेच्या राजकारणाची काळी शक्ती असून तिला संपवले पाहिजे अशी खेळी निवेदिता रचते. भावनिक आवाहनावर सभा जिंकते. कळत-नकळत पुरुषी राजकीय अधिसत्तेला शह देते. कदाचित ही स्त्रीप्रणीत राजकीय सत्ता नव्या युगाची नांदी असेल. राजकारण हा बायकांचा खेळ नाही ही चौकट मोडून 'खेळ मांडीयेला..' अशी सकारात्मक नवी चौकट निवेदिता रचते.

प्रिया तेंडूलकर यांची ही कथा स्त्रीच्या स्वत्व शोधाच्या प्रवासाला शब्दबद्ध करते. राजकीय सत्ता माणसाला कशी नीतिभ्रष्ट करते. आपल्या पूर्वपिढीतले राजकारणी त्यांची कुटुंबे, त्यांचे वर्तन यातील सौजन्य हरवले आहे आणि केवळ सत्तापिपासूवृत्ती माणसाचे नैतिक अध:पतन घडवते आहे असा मूल्यविचार प्रिया तेंडूलकर कथावकाशात विस्तारतात. निवेदिताचे बंड या सत्तापिपासू पुरुषीवृत्ती विरुद्ध आहे

### ३ब.२.५ सुटे गिराण - ऊर्मिला पवार

सुमती सबनीस या हुशार, बँकेत नोकरी करणाऱ्या नाकी डोळी नीटस पण उंची चार फुट असलेल्या मुलीची ही कथा. स्त्री देहाकडून सौंदर्य, प्रमाणबद्ध रचनेची अपेक्षा बाळगली जाते. तिला पहायला आलेले स्थळ उंचीमुळे तिला नकार देऊन धाकट्या कुंदाला मागणे घालतात. हा सुमीला गुरांचा बाजार वाटतो. एखाद्या पुरुषात व्यंग असले, अपंगपण असले तर त्याला हिणवले जात असेलही, पण त्याला बाईइतके नाकारले जात नाही हे वास्तव आहे. बँकेत अधिकारी असलेला आणि जन्मत:च कोपरापासून हात नसलेला सुरेश मुरुगकर त्याच्या अपुरेपणाच्या जाणिवेशी संघर्ष करतो. सुमतीच्या इंटरव्ह्यूच्या वेळी "तुमची उंची किती?" अश्या अनाहूत प्रश्नापासून सुमतीची पाठराखण करणारा. हा सुरेश आपला प्लास्टिकचा हात टेबलावर आपटून ठामपणे म्हणतो की, "आपल्या स्वतंत्र देशात नोकरीच, नोकरीच्या निवडीचं स्वातंत्र्य सर्वांनाच आहे. फक्त वृद्ध, बालक, गुन्हेगार, असाध्य आजारग्रस्त रोगी वगैरे वगळून आणि मिस सुमती सबनीस त्यापैकी नाहीत आणि काऊंटरसाठी हव्या तशा खुर्च्या बनवणारे सुतारही संपावर गेलेले नाहीत. तेव्हा...." (पृ.१00) अशाप्रकारे नोकरी करण्यासाठी सुमती सक्षम असल्याचे मान्य करणारा सुरेश लग्नासाठी मात्र सुमतीला नाकारतो तेव्हा त्याचे स्पष्टीकरण अपूर्ण असला तरी 'पुरुषी' सत्ता दर्शवणारे असते. "मला आणखी अपूर्णता नकोय.प्लीज डोंट बी उपसेट. बट यु आर नॉट सेक्शुअली अॅट्रॅक्टिव...ओ येस ...अॅण्ड आय ॲमआल्सो नॉट !.."(पृ.१०५) हे म्हणणारा पुरुष लग्नासाठी परिपूर्ण स्त्रीची जोडीदार म्हणून निवड करेल जे या समाजात शक्य आहे. पण समानतेच्या मुद्यावर दोन अपूर्ण एकमेकांचे संपूर्ण होऊ शकतात याविषयी त्याला विचार करायचा नाही. कॉफी पिण्यासाठी बोलवून तिच्या शरीर आणि मनाला.स्पर्श करण्याचे स्वातंत्र्य घेणारा सुरेश तिला सेक्शुअली

अॅट्रॅक्टिव नसल्याचे कारण देऊन नाकारतो. हा नाकरल्याचा अनुभव सुमीला आघात करणारा ठरतो. दीड फुट म्हणून सतत हिणवले जाणे यामुळे जखमी होणाऱ्या मनाच्या जखमा भळभळून वाहायला लागतात.समाजात सतत उडवल्या जाणाऱ्या खिल्लीमुळे सुमी निराशा, एकटेपणाच्या काळोख्या पोकळीत अडकल्याचे अनुभवते. आपण ग्रहणाच्या वेळी

जन्माला आलो असतो तर आपण योनीतून बाहेर खेचले जाताना लांब, उंच झालो असतो का? अशी अद्भुतरम्य शक्यता कवटाळत आपल्या बर्थच्या पायाशी असणाऱ्या व्हेंटिलेटरच्या पोकळीकडे पहात राहते.सकाळपासून ग्रहणाच्या दुर्मिळ, शुभ-अशुभ परिणामाच्या योगावर चर्चा ऐकणारी सुमती आपल्या देहाचे मुटकुळ त्या व्हेंटिलेटरच्या पोकळीत ढकलते. कथाकार या अद्भुत शक्यतेचा कल्पक वापर करून घेत सुमीच्या ग्रहण लागलेल्या आयुष्याला नवा जन्म देते. एखाद्या उघड्या पडलेल्या उपड्या अर्भकाला मातेच्या योनीतून हळुहळू ओढून सावकाश बाहेर काढणारा एका चित्रकाराचा हात सुमतीच्या मदतीला येतो. तिच्या केसात अडकलेली जळमटे काढून तिच्यासह धुमकेतू बघण्याचा दुर्मिळ योगसाधतो. वय, जातपात, उंची, रंग यापलीकडे माणसाचं माणूसपण जाणणारी सोबत बहुदा सुमती सबनीसला मिळण्याचा हा योग असावा.

ऊर्मिला पवार यांचा स्त्रीवादी आणि दलित चळवळीशी प्रत्यक्ष संबंध असल्याने अभावग्रस्त, न्यून असलेल्या सुमतीची बाजू त्या समानतेच्या भूमिकेतून मांडतात. न्यूनता झटकून टाकण्यासाठी एका कल्पक शक्यतेचा विचार करतात.

## ३ब.२.६ आये कुछ अब्र - मेघना पेठे :

**'आये कुछ अब्र'** या मेघना पेठे. यांच्या कथेतील नायिका३३-३४ वर्षांची मध्यमवर्गीय नोकरदार अविवाहित स्त्री आहे. लग्नाच्या बाजारात सुंदर, आकर्षक बांध्याची नसल्यामुळे नाकारली गेलेली. कमावती असूनही कुटुंबातील पुरुषप्रधान व्यवस्था स्वतंत्र निर्णय घेणाऱ्या मुलीचे अस्तित्वच नाकारतात. या नायिकेला स्वत:विषयी सुंदर, कमनीय नसल्याचा न्यूनगंड आहे. सेक्स या गरजेसाठी लग्न हीच सामाजिक संरचनेने मान्य केलेली व्यवस्था आहे. मग लग्न न जमणाऱ्या स्त्रीने मनात घुसमटणाऱ्या लैंगिक भावनांचे काय करायचे? अशा विवंचनेत अडकलेली ही नायिका स्त्रीच्या दडपलेल्या लैंगिक जाणिवांना व्यक्त करते आहे. वाचक म्हणून आपल्याला ही कथा वाचताना "बाबांचा संसार माझा कसा होणार? "किंवा "अंत:करणाचे रत्नदीप" या विभावरी शिरूरकर यांच्या कथेतली प्रौढ कुमारिकांच्या मनाची निश्वासिते आठवतात. पण या कथेतील नायिका कालच्या कथेतील 'यमु'पेक्षा वेगळी आहे. ती व्यथा मांडत नाही. विभावरी शिरुरकरांची नायिका या निष्कर्षापर्यंत आली होती की 'शेवटी हा प्रश्न मुलींनी आपण हवा तसा सोडवावा. असे गुंतागुंतीचे प्रश्न दुसरे कुणी आपल्यासाठी सोडवणार नाही.' याच विधानाला उत्तर शोधणारी, मार्ग शोधण्याचा आणि तो अवलंबण्याचा प्रयत्न करणारी नायिका **'आये कुछ अब्र'** या मेघना पेठे. यांच्या कथेत सापडते. ही नायिका विवाहित या सामाजिक दर्जा मिळवण्यासाठी धडपडत नाही. लैंगिक गरजेसाठी लग्न हा एकमेव पर्याय नाही हे ती जाणते. या नायिकेला कथांतर्गत सामाजिक अवकाशामध्ये 'व्यावसायिक वेश्या'अशी व्यवस्था उपलब्ध .एकट्या राहणाऱ्या कमावत्या स्त्रीच्या लैंगिक गरजांसाठी सोबत देऊ इच्छिणारे आणि त्यासाठी 'सेवा'वृत्तीने प्रस्ताव ठेवणारे डहाणूकर किंवा कन्नमवार सारखे पर्याय तिच्यासमोर आहेत.एका बाजूला मोहनसारखा मधाळ बोलणारा, त्याच्या सारखी जाणती आणि काहीतरी हरवल्याची उदास छटा असणारा चेहरा शोधते तर कधी कन्नमवारचा पुरुषी देह तिला आकर्षित करतो. सत्तावीस वर्षात कोणा पुरुषाचा स्पर्श न अनुभवलेली ही स्त्री ज्यावेळी कन्नमवारला एकांतात भेटते तेव्हाच स्त्री-पुरुष नात्यातील शृंगारभाव आणि लैंगिक वासना यातला फरक समजते.' शरीर अनुभवाचा उत्कर्ष बिंदू एकट्यानेही गाठता येतो, हे जाणते. शिरीनचा

जीवनानुभव स्वत:शी ताडून बघत राहते. “कसली शुचिता आणि कसल काय ....कुणाशीही वचनबद्धता, मी तुला आपल्यातल सगळ सांगेन एवढीच असते. माझा माझ्या आयुष्यावरचा प्रयोग करण्याचा हक्क मी कोणालाही विकत घेऊ देणार नाही.....”(पृ. ५२) हे शिरीनचे तत्वज्ञान नायिकेच्या पचनी न पडणारे पण म्हणून आपल्याला सेक्स, जात, पैसा, शिक्षणपाहून निवड केलेला जोडीदार हवाय? की संरक्षण देणारा टिळा, समाजमान्यता देणारे लग्न तिला हवंय का? तर तेही नाही कारण असे आयुष्य दुय्यमपणा देणारे, गुलामगिरीचे असल्याचेही तिला जाणवते.

आपल्या आयुष्याचा मार्ग निवडणे, आपल्या जोडीदाराविषयी आपल्या अपेक्षा किंवा निवडीचे निकष काय असावेत? ही निवड करताना आपल्या आईवडिलांचा संसार, शिरीनचे आयुष्य आणि आजवर भेटलेले उपवर लग्नाळू मुलगे या सगळ्यांचा तुलनात्मक विचार सतत मनात येत राहतो. आश्रित म्हणून घरी आलेल्या मोहनविषयी अठराव्या वर्षात रुजलेले, पहिले प्रेम अत्तरासारखे सतत दरवळत राहते. तिला खूप विचार करूनही निर्णय घेता येत नाही. काही सकारात्मक मार्ग दिसत नाही. जगण्यातली कोंडी, तोचतोचपणा कबुतरांच्या घरभर पंख फडफडवण्यातून आणि शेजारच्या मंगोल सिंड्रोम वयात आलेला मुलाच्या वर्णनातून ठसठसत राहते. अशा वेळेस अनपेक्षितपणे एका निळ्या शर्टवाल्या माणसाशी चहासोबत गप्पा होतात. लग्न अपेक्षा, होकार-नकार कसलीच चर्चा नसलेल्या गप्पा होतात. कथेच्या शेवटी हा निळा शर्टवाला असाच अचानक तिच्या घरी येतो आता तो करड्या रंगावर गुलबट धागे असलेला शर्ट घालून येतो. कुठल्याही अपेक्षेशिवाय अगदी सहज तिच्या व्यक्तिगत अवकाशात प्रवेश करतो. फडफडणाऱ्या एका जखमी कबुतराच्या जखमेवर हळद लावतो, कॉफी येईपर्यंत कोपऱ्यातील पेटी ओढून पेटी वाजवण्यात मग्न होतो. तुम्ही गाता का विचारत पांढरी पाचचा सूर लावत आर्जवी हसतो. हे सगळे वर्तन ,हा सहवास एका सहमानवाचा आहे हे उमजून या नात्याचा स्वीकार करण्यास सूराला शब्द देण्यास ती तयार होणे ही एकप्रश्नाची उकल असू शकते. स्त्री-पुरुष किंवा लैंगिकता - अशारीर प्रेम अशा द्वंद्वाला ओलांडून एका सहप्रवासाची सुरुवात वाचकाला जाणवते. स्त्री-पुरुष नात्यातल्या लैंगिक संबंधाविषयीची पाप ही जाणीव गळून पडणे ही नायिकेच्या पूर्णत्वाच्या जाणिवेसाठी मूल्यात्मक बाब ठरते. मोहनच्या मधाळ प्रतिमेला ओलांडून माणसाला माणसाची सोबत या विकसित जाणिवेपर्यंतचा टप्पा ती गाठते.

मेघना पेठे यांची ही कथा पारंपारिक कुटुंबव्यवस्थेतील पुरुषी सत्ताकारण स्पष्ट करते. चौकट मोडणाऱ्या नायिकेची आत्मचिकित्सा आणि आपल्या जीवनावर आपला ताबा ठेवण्यात कदाचित ही नायिका यशस्वी ठरली.

### ३ब.२.७ महिषासुरमर्दिनी - नीरजा

मुंबईतील गिरण्या बंद झाल्यावर अनेक गिरणीकामगारांप्रमाणे हाती आलेला थोडाफार पैसा उडवून, घरात खुडुक होऊन बसलेल्या विश्रामच्या संसाराचा गाडा ओढणाऱ्या ‘सतीची’ ही कथा आहे. गिरणीकामगारांच्या संसाराची वाताहत या कथेतून व्यक्त होते त्याहीपेक्षा कनिष्टवर्गीय, चाळकरी स्त्री जी बालपणापासून एक अभावाचे जीवन जगते आहे. तिचे प्रातिनिधिक चित्रण सती या पात्राच्या निमित्ताने घडते. सती वास्तव जगत असताना सतत एक स्वप्नरंजन करत असते. ‘पुरुषासारखं तंगड्या लांब करून कॉटवर लोळत पडायचं

आणि छताकडे किंवा आभाळाकडे पाहत स्वप्नलोकात गुंगून जाणे हा तिचा आवडता छंद असे.प्रत्यक्ष वास्तवाचे चटके सहन करताना या स्वप्नरंजनाने तिला दहा हाताचे बळच दिले असते. सतीचे प्रातिनिधिकत्व ठसवण्यासाठी निवेदक तिचे वर्णन करताना म्हणतात, 'मुरलीधर माने किंवा, म्हात्रे किंवा पाटील किंवा जाधव किंवा आणखी कोणत्या आडनावाच्या माणसाच्या  पाच मुलींपैकी दोन नंबरची मुलगी सती. तिचे वडील कट्टर शैव पंथीय असल्याने त्यांनी आपले जावई सगळे गोसावीच शोधले. कफल्लक! कसा बसा संसार ओढत बिड्या फुकत बसणारे !...' (पृ.११५) निवेदकाच्या सूरातील उपरोध कथेत प्रभावी ठरलेला दिसतो. दोनदा नापास होऊन दहावी झालेल्या  सतीचे लग्न विश्रामशी होते. गिरणीत मुकादम आणि चाळीत राहायला प्रशस्त जागा (तीन  बाय तीनची मोरी आणि चार बाय चारचे स्वयंपाकघर असलेली ) या भांडवलावर सतीने होकार दिला होता. काळ्या मण्यांचे सौभाग्यलेणं आणि पोळपाट लाटणे हाती घेत सतीने संसाराला सुरुवात केली. संपानंतर याच पोळपाट लाटण्याने कुटुंबाचा गाडा तिने ओढला .

दिवसाच्या दोन-अडीचशे पोळ्या करताना आपल्याला दहा हात असते तर बर झालं असत असे तिला वाटते. दहा हातात दहा लाटणी, किंवा नऊ हातात लाटणी आणि एका हातात मुंडकं असावं, रक्तबंबाळ... धडाशिवाय ! असं  तिचे स्वप्नरंजनाचे  वर्णन केले आहे. देवीच्या पायाखाली असतो तसा एक पुरुष सती आपल्याही पायाखाली पाहते. आपल्या आयुष्याची भीक मागत गयावया करणारा पुरुष  आणि त्याला जिभेने वेडावणारी सती ...हे तिचे आवडते स्वप्नचित्र असते. या स्वप्नामागची  तिची कोंडी कथेत व्यक्त होते. दळण आण, पोळ्या लाट, पोळ्यांचा रतीब ऑर्डरप्रमाणे पोहोचवणे, अंगभर पीठ पांघरून असं स्वयंपाकघरात शिजत शिजत संपून जाणे तिला मान्य नव्हते. पोळ्यांचा रतीब पोहोचवताना कामत, दिलीपशेट यांच्या आशाळभूत नजरा स्पर्श यांचाही तिला उबग आलेला असतो. तिची इच्छा काय तर सँडविचची गाडी टाकावी, कमी श्रमात बरे पैसे मिळवावे आणि मुख्य म्हणजे नीटनेटक्या  कपड्यात, वेणीफणी करून, फुले माळून, प्रसन्न चेहऱ्याने उभे राहून व्यवसाय करायचा. आपले सामान्यपण झटकून टाकण्यासाठी ती आपल्या मुलांची नावे अनिल (अंबानी आडनाव लावता आले नाही म्हणून) आणि ऐश्वर्या ठेवते. नवऱ्याच्या आजारपणात त्याला सरकारी हॉस्पिटलमध्ये नेणे ही गोष्ट तिच्यासाठी सामाजिक जीवन असते. या सतीचा नवरा पोळ्या द्यायला जाताना अपघातात वारला तर खर म्हणजे सतीसाठी ती दुखःद घटना व्हायला हवी होती. पण टिव्ही वरच्या मालिकांनी मनात रंगवलेल्या स्वप्नरंजनात सतीला नवरा एक्सेचेंज ऑफरमध्ये नाहीतर भंगारमध्ये तरी काढावा असे वाटत असते. त्यामुळे विश्रामचा अपघात तिला अनपेक्षितपणे आपल्या एकसूरी आयुष्याला विराम वाटतो. अपघाताचा पंचनामा, चॅनेलवाल्यांसमोर रुदालीज् प्रमाणे'सिंगिंग ॲण्ड क्रायिंग'चा संगीतमय आक्रोश करत विश्रामचा अंत्यविधी सती आटोपते. नवरा गेल्यामुळे 'मंगळसूत्र, कुंकू आणि फुले' या गोष्टी आपण गमावल्या याची जाणीव तिला होते. तेरा दिवसाचा दुखवटा संपवून सती आपल्या नव्या संसाराला सुरुवात करते. 'घर माझे आहे. पैसाही मीच कमवत होते. राहीन मी एकटीच मुलांसोबत असं म्हणत घर विस्कटून नव्याने लावते. मुलांचे मजेचे दिवस ती त्यांना गमावू देत नाही  त्यांच्या इच्छेप्रमाणे सुट्टी संपेपर्यंत मुले मावशीकडे आनंदाने जातात. सतीचे स्वप्नचित्र पूर्ण होते ती दुर्गा होऊन महिषासुराचा वध करून विजयोत्सव साजरा करते.

munotes.in

नीरजा यांची कथा स्त्री-पुरुष यांच्यातील नातेसंबंधाबरोबरच एकूण मानवी नात्यांमधील सत्तारूपाचा वेध घेते. 'सती' मध्ये कुटुंब व्यवस्थेने दाबून टाकलेल्या स्त्रीचे प्रातिनिधिक व्यक्तिमत्व दिसते. तिच्या सहज प्रेरणा, छोटी-छोटी स्वप्ने सुद्धा पूर्ण होऊ शकत नाहीत असे तडजोडीचे कौटुंबिक आणि सामाजिक जीवन ती जगत असते..

### ३ब.२.८ आईच्या नावाने – प्रज्ञा पवार

आर्थिक मंदी, दिवाळखोरी अशा संकटांमुळे स्त्रीला आपला संसार चालवण्यासाठी खोट्या चेहऱ्याने वेश्या व्यवसायात उतरावे लागते. स्मिताचे बाबा ती तीन वर्षाचे असताना वारले. वडिलांचे स्पेअर पार्टचे दुकान भाड्याचे त्यातही खूप कर्ज करून ठेवलेले. आईचे शिक्षण जेमतेम बारावी, दोनतीन पार्ट टाईम सेल्समनशिपच्या नोकऱ्या करून हातपाय चालवण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या लग्नाचा पर्याय होता पण स्मिताची कायमची स्वतंत्र व्यवस्था करणे आईने मान्य केले नाही. 'तिलोत्तमा वर्गीस' अशी एक उपरी ओळख घेऊन या खंबीर स्त्री, आदर्श आईने आपला संसार चालवण्याची धडपड केली. तिने संगिनी हॉटेलमध्ये आपण रिसेप्शनिस्ट म्हणून काम करत असल्याचे मुलीला सांगून शिक्षणासाठी तिला पाचगणीला पाठवले. स्मिताच्या सगळ्या गरजा दाम दुपटीने पूर्ण करायची. आईच्या नोकरीमुळे परिस्थिती सुधारली स्मिता पाचगणीतले शिक्षण संपवून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येते. तिला आई राहण्यासाठी पुण्यात वन बीएचके चा फ्लॅट घेऊन देते. पैशाने सुबत्ता आली म्हणून १०,००० रुपये खर्चून पेपर खरेदी करणे आणि परीक्षेत यशस्वी होणे हा शोर्टकट आई मान्य करत नाही. 'अभ्यास करून जे मिळवशील ते खरे मार्क त्यातच मला आनंद' अशी भूमिका स्मिताची आई घेते. या प्रसंगाने स्मितासाठी आपली आई टिपिकल शामची आई, एक कर्तृत्ववान बाई हे व्यक्त होते.

इंडियन बँकेत नोकरी करणाऱ्या स्मितावर एकटीने सारे मॅनेज करणाऱ्या आईचा प्रभाव होता. त्यामुळे तिने आई मागे लागूनही लग्नाचे मनावर घेतले नाही. सत्ताविस वर्षाच्या स्मिताच्या आयुष्यात नवीन कुणी येत नाही आणि आई अचानकच नऊ महिन्यापूर्वी वारते. कदाचित तिने संसारही मांडला असता पुढेमागे. पण स्मिताच्या आयुष्यात एक स्थित्यंतर येते ज्यामुळे तिला आपला भूतकाळ आणि आईच्या कष्ट -संघर्षाविषयी वास्तव उलगडते. तिच्यासाठी तो मोठ्ठा धक्का असतो. सुरूवातीला मानसिक आघात वाटतो, फसवले गेल्याची खोल जखम होते. सात दिवस स्मिता या द्वंद्वाशी एकटीच झगडते. आईने काय भोगलं तिने परिस्थितीला एकटीने कसे तोंड दिले हे जाणून घेण्यासाठी. स्मिता चौहान नामक अनोळखी माणसासोबत स्वत:ची ५००० रू.किंमत लावून एक रात्र आईसाठी, आईच्या रात्रीसारखी रात्र जगते. आईच्या नावानं....नवी उर्जा घेते आणि पुन्हा आपल्या विश्वात परतते.

प्रज्ञा पवार यांची कथा स्त्रीच्या संघर्ष आणि सक्षमीकरणाच्या प्रक्रियेबाबत विचारप्रवृत्त करते. वेश्येचा व्यवसाय करून आपल्या मुलीला मुख्य प्रवाहात सक्षम स्त्री म्हणून उभी करणारी तिलोत्तमा ही एक अपारंपरिक, खंबीर, कर्तृत्ववान महिला वाटते. हेडप्रॉस, अत्यंत रिस्पेक्टेबल व्हेटेरन असे कृतक जीवन जगून आदर्श शामच्या आईची मूल्यात्मकता जोपासू शकते. तिचा जीवनसंघर्ष सुशिक्षित स्वतंत्र मुलीच्या मध्यमवर्गीय जाणिवांना छेद देतो.

## ३ब.२.९ दरी - प्रतिमा जोशी



वेश्या व्यवसाय करणाऱ्या देश-विदेशातल्या स्त्रिया आणि या स्त्रियांसोबत काम करणाऱ्या एन जी ओ च्या कार्यकर्त्या, राजकारणी आणि विदेशी प्रतिनिधी हे सगळे एका चर्चासत्राच्या निमित्ताने भेटतात. एड्सच्या संसर्गाला कारण ठरणाऱ्या वेश्या व्यवसायावर बंदी आणावी की या व्यवसायाला लायसन मिळावे म्हणून प्रयत्न करावेत याविषयी चर्चा मंथन सुरु होते. एड्सविषयक प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणजे सेक्स वर्कर स्त्रियांना कंडोम वाटण्याचा कार्यक्रम. प्रत्यक्ष वेश्या व्यवसायातल्या आशा, अनुसया, जमुना, गिरिजा आणि अपर्णा, रिना, ज्योती या एनजीओ चालवणाऱ्या एड्सच्या चलनी नाण्यावर फंडींग गोळा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या उच्चभ्रू स्त्रिया यांचे या प्रश्नाकडे पाहण्याचे दृष्टिकोन या कथेत व्यक्त झाले आहेत. न्यूयार्क, ॲमस्टरडॅम वरून आलेल्या सेक्स वर्कर  नॉर्मा, ज्युलीएट एका जागतिक युनियनची मागणी करतात. बिहार, नेपाळ, बांगलादेश, ओरिसामधल्या सगळ्या आजूबाजूच्या रंगीबेरंगी ठिपक्यांना बघून गिरिजाच्या मनात विचार येतो की घरदार असूनही यातल्या कित्येकजणी या वाटेला कशा आल्या असतील? जमुनाला मोलमजुरीपेक्षा यातच बरे पैसे मिळतात. पण पैसा घरवाले आणि कोठेवाल्यांचे खिसे भरण्यात जातात. “चतकोर रोटी नि पाऊणकोर बिमारी अशी हालत होते.”(पृ.१८३) आणि पैसे कमवता येतात पण या नरकात इज्जत तर हिरावूनच घेतली जाते. अनुसयाला आपण आणि आपली मुलगी शंकर अण्णाने खातेऱ्यात कशी ढकलली हे आठवून शहारते. आशा आणि अनुसया सगळ्या बायांशी बोलतात तेव्हा त्यातील काहींना मुलांना शाळा शिकवायची आहे, काहींना परवडणारी औषधे हवीत, कुणाला म्हातारपणात आसरा हवाय., कुणाला वाटते धंद्याला लायसन मिळाले तर पोलीस ‘गैरकानुनी’ ठरवणार नाही. नॉर्मा सारख्या विदेशी स्त्रियांना वाटते हा व्यवसाय माण साच्या इतिहासापासून चलत आला आहे त्याला बेकायदा ठरवता येणार नाही सोशल वर्कर असतो तसा सेक्सवर्कर का नसावा? या व्यवसायाला कामगार कायद्याखाली संरक्षण मिळावे, सुविधा मिळावी या जमुनाच्या भाषणाला टाळ्या मिळतात. उच्चभ्रूवर्गातील एनजीओ चालवणाऱ्या अपर्णा सारख्या स्त्रियांना वाटते की, “हे लोकसुद्धा फालतू चर्चा करत बसतात. सरळ दोन वाक्यात रिझोल्युशन ड्राफ्ट करायचं, बास्स! इफ वन कॅन सेल हिज टॅलेन्ट, हिज लेबर, देन व्हाय कान्ट वन सेल द बॉडी? पोटाला भूक लागली की आपण रेस्तराँत जातो; पोटाखाली भूक लागली की सेक्स वर्करकडे जायचं. सोप्पंय... तिला पण चार पैसे मिळतात आणि ना, आपल्याकडं सेक्स या शब्दाला पण फालतू सेन्सॉरशिप आहे. अरे, शरीर आहे.. त्याला भूक लागली, ती मिटवली इतकं साधं आहे. इट्स अ ट्रेन्झॅक्शन बिटविन टू बॉडीज.”(पृ.१८२ )

कथेच्या शेवटी आत्मभान आलेल्या आशा,गिरिजा आणि अनुसूया यांना वेश्या व्यवसायाविषयी भांडवलदारी भूमिका कळते. या  एनजीओच्या बाया  आणि आपल्यातील दरी त्या निर्देशित करतात. “तुम्ही लोक तिथं हाटेलात सुखानं झोपताय आन् आमच्यासाठी काय बरं काय वाईट ते तुम्हीच ठरवताय.? .....तुमच्या आमच्यात एवढी दरी हाय की, अनसूया काय. बोलती तेबी तुम्हाला कळंना! इक्ते दिवस आम्ही तुम्ही सांगाल तसं निरोध वाटायचं काम केलं. पण नुस्ते जास्ती पैसे मिळतात एवढंच बघायचं? इथं निरोधची खोकी वाढतात. गिऱ्हाइकं वाढतात. त्याच्या दुपटीनं धंद्याला लागणाऱ्या पोरीबाळी वाढतात. आन् या खाटीकखान्याला तुमी लायसन मागता? आम्ही अनाडी बाया म्हणून तुमच्या मनाला यीन ते तुम्ही बोलता. बाया फसतात. तुमची दुकानं चालतात.” (पृ.१८७-८८ )

munotes.in

प्रतिमा जोशी यांची कथा वेश्या स्त्रियांचे शोषणवास्तव उलगडते. जागतिकीकरणाने शरीरविक्रयतेचा, चामडी विकण्याचा बाजारच उभा केला आहे तर एनजीओ ही भांडवलदारपूरक किवा धार्जिणी व्यवस्था कशी झाली आहे याचे भान ही कथा देते. शोषित, गुलाम ठरवलेल्या वेश्यांना आपल्या गुलामगिरीची जाणीव झाली तरी काळोखी दरी अजून ओलांडता आली नाही. संघर्ष सुरूच आहे.

### ३ब.२.१० माझ्या जन्माची गोष्ट - मनस्विनी लता रवींद्र

आपल्या आजीचा जन्म, आपल्या आईचा जन्म आणि आपला जन्म अशी मातृपरंपरा आणि जोडीला प्रत्येक पिढीतील पुरुषप्रतिमा यांची सांगड घालून संपूर्ण कथानक गुंफले आहे. याकथेत निवेदक रुढीग्रस्त पुरुष प्रतिमेची जडता आणि प्रत्येक पिढीतील स्त्रीनेपुरुष वर्चस्वाला तोंड कसे दिले, आपल्या जगण्याचा मार्ग कसा सुकर केला याचा ऐतिहासिक विकासक्रमच रचला आहे. निवेदक स्त्रीचे पणजोबा काशिनाथ कट्टर मूलतत्ववादी विचारांचे बायकोला इंग्रज अधिकाऱ्या समोर न आणणारे, तिला आरसाही वर्ज्यकरणारे आणि त्यांनी स्वत:च्या मुलावरून बायकोवर संशय घेतला म्हणून तिने स्वत:ला जाळून घेतले. निवेदक स्त्रीचे आजोबा म्हणजे आईने जाळून घेतल्यावर घर सोडून शहरात गेलेले पणजोबांचे तिसरे चिरंजीव जे पत्रकार असलेल्या गृहस्थांच्या आश्रयाने राहिले, शिकले. त्या गृहस्थांनी आपल्या पुतणीशी त्यांचे लग्न लावून दिले. आजोबा सामाजिक, राजकीय बदलांवर भाष्य करणारे, एकमेकांना निवडीच स्वातंत्र्य देतो असे म्हणत, मुलीच्या जन्माच्यावेळी वडिलांनी हजर असणे गरजेचे नाही असे स्वातंत्र्य घेतात. आजी बाळंतपणात बंडखोर स्त्रियांविषयी खूप वाचत होती. तिला वाटत असे की आपली मुलगी इझोरा डंकन, सिमोन द बुव्हा किंवा सावित्री बाई फुले होईल. आजोबांनी आईला तिच्या जन्मानंतर पंधरा दिवसांनी पाहीलं. आजी-आजोबांचा डिव्होर्स झाला तेव्हा आई सतरा वर्षांची होती. मूल जन्माला येताना वडिल जवळ नसल्याने पुरुषाला बाईच्या प्रसववेदना न कळण्याची जणू परंपराच आहे आपल्या घराची असावी असे आजीचे शब्द आईला आठवतात. आई-बाबांनी एकच मुलीला जन्म दिल्याने बाबाला काहीच बघता आले नाही. आजीची एकुलती एक मुलगी शिकण्यासाठी लंडनला जाते. आजी सारखी बंडखोर नसली तरी धुसफूसणारी होती असे आपल्या आईचे वर्णन निवेदक स्त्री करते. 'विस्थापन आणि स्थलांतरण' या विषयावरच्या तिच्या रूट्स नामक लेखावर चर्चा करायला आलेल्या भारतीय वंशाच्या वाटणाऱ्या मुलासोबत खडाजंगी चर्चा होते. त्या तरुणाच्याच प्रेमात आई पडते. त्याचे बाबा भारतीय आणि आई आयरिश असते. या मुलाचे पणजोबा म्हणजे निवेदक स्त्रीचे पणजोबा (काशीनाथ) ज्या इंग्रज डॉक्टरकडे काम करीत असत. ज्यांच्या भावाची बायको. जी आठ महिन्याची गरोदर असताना डॉक्टरबरोबर पळून गेली. लंडनला पोहोचल्यावर त्यांना मुलगा झाला. जे त्या मुलाचे निवेदक स्त्रीच्या मित्राचे आजोबा. त्यांना आपल्या आई-बाबांनी अनैतिक काही तरी वर्तन केले असे वाटून त्यांनी आपल्या आईचा प्रचंड राग केला आणि आपली बायको पण आईसारखी पळून जाईल या भ्रामक कल्पनेने त्यांनी आपल्या बायकोचाही खूप छळ केला. आधी चर्च -चर्च केलं मग हिंदू धर्म स्वीकारून कर्मठ, कडक वातावरणात मुलांना वाढवले. स्थलांतराचे आणि वांशिक अस्मितांचे दुष्परिणाम या लंडनमधल्या मुलाच्या वडिलांनी भोगले. निवेदक स्त्रीची आई हे ऐकून आपल्या पणजोबांच्या कथेतील साम्य ऐकून आश्चर्य चकित होते.आणि अशाप्रकारे आईचा प्रियकर

तिचा बाबा होतो आणि आपल्या जन्माच्या वेळी हजर राहून तो मागच्या परंपरेतील पुरुष प्रतिमेची साखळी तोडतो.

कथा आजीचे आजोबा, आईचे आजोबा, वडील आणि मी अशी वंशावळ, त्या माणसाचा इतिहास, त्यांच्या कुटुंब, स्त्री-पुरुष सबंधविषयक जाणिवा, जीवनविषयक धारणा आणि स्थलकालानुरूप बदललेला सांस्कृतिक अवकाश यांची गुंतागुंत स्त्री निवेदक रचत जाते. बहुपेडी अशी आशयबंधाची गुंफण दिसते.

मनस्विनी लता रवींद्र यांनी गृहिणी असलेली स्त्री, नवरा, मुलगा या पुरुषसत्तेकडून संसारात दुय्यमपणा कसा अनुभवते हे अभिव्यक्त केले आहे. निवेदक स्त्री आपल्या आई-वडिलांच्या पिढीत आई एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून पुरुष या परतत्त्वाशी  वाद-विवाद घालत आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करते. परंपरा, वांशिकता यांच्या ओझ्याखाली बाईची होणारी घुसमट कळणारा पुरुष निवेदक स्त्रीचा बाबा होणे ही एका आदर्श स्त्रीपुरुष नातेसंबंधाची नांदी असू शकते.

### ३ब.२.११ निर्वाणाची स्वगते – वंदना महाजन

नर्मदा नावाच्या एका कष्टकरी ग्रामीण स्त्रीच्या जीवनातील दुख:, उपेक्षितता आणि तिने दुख:मुक्तीसाठी शोधलेला मार्ग यांची ही कथा आहे. कोरडवाहू शेती करणाऱ्या कष्टकरी घरात नर्मदेचा जन्म झाला. घरातल्या मोठ्या मुलीसाठी धाकट्या भावंडांची आई आणि शेतात, घरात राबत राहणाऱ्या आईची सखी होण्याचा समंजस योग ठरलेला असतो. शेजारच्या शिक्षक दाम्पत्याला तिच्या या समंजसपणाचे कौतुक म्हणून त्यांनी तिचा वाचनाचा छंद जोपासला. तरी पुरुषप्रधान व्यवस्थेच्या चौकटीतल्या बापाला वाचन सहन होत नसे. “मोठी मास्तरीन वाया चालली, फेक ते पुस्तक. ”म्हणणाऱ्या बापाला पंधरा वर्षाच्या मुलीचे जग रहाटीनुसार लग्न लावून देणे महत्वाचे वाटले. आपल्यापेक्षा बरी आर्थिक परिस्थिती, बागायती शेती एवढचं बघून त्यांनी नर्मदाचे लग्न तीन मुले असणाऱ्या विधुराशी लावून दिले. तीन मुलांची कायदेशीर सावत्र आई अशी ओळख मिळालेल्या नर्मदेकडून मूल नको असे म्हणणाऱ्या नवऱ्याने, निंबाने तिच्यावर पाच वर्षात तीन गर्भपात लादले. सासरी येऊन सगळ्यांसाठी एक हक्काची मोलकरीण आणि नवऱ्यासाठी एक उपभोगाचे साधन ठरली. कष्ट, गर्भपातामुळे खिळखिळी झालेली प्रकृती या परिस्थितीने गांजलेली ही स्त्री जेव्हा आपले निराधारपण व्यक्त करते आणि संसाराचा त्याग करेन असे म्हणते तेव्हा सासू या समाजरचित स्त्रीलाही असे वाटते की हिला कुणाची तरी फूस आहे. त्याच बळावर ही घर सोडून जाण्याची भाषा करते. सगळे घर ज्यांची ती सेवक होती ते तिला घराबाहेर हाकलतात. नवऱ्याने तर मारून  अर्धमेली करतो. हेच असते ग्रामीण स्त्रीचे कुटुंबजीवन याचे भान वाचकाला येते. शोषित स्त्रीला घराबाहेर पडणे हा मुक्तीचा मार्ग सोपा नाहीच. दिशाहीन भटकत नर्मदा अजिंठ्याच्या लेण्यांच्या परिसरात येते. हॉटेलात पोळ्या लाटण्याचे काम करून पोटाची सोय होते आणि अजिंठ्याची लेणी पहात त्यांचा अर्थ लावत लावत मनावरच्या जखमा भरून येतात. लेण्यातील महामाया, गौतमी, यशोधरा, आम्रपाली, हरिती, सुजाता या सगळ्या बुद्धांच्या कथेत वावरणाऱ्या स्त्रियांच्या जाणिवांना नर्मदा गाईड म्हणून शब्दबद्ध करण्याची धडपड करते. ही तिची ज्ञानात्मक वाढ म्हणावी लागेल. स्त्री असणे हे दुःखाचे कारण असेल तर नाती, संसार, समाज आणि शोषण, अर्थकारण

यासगळ्या बाईला बंधन घालणाऱ्या गोष्टींना सारून विमुक्ता होण्याचे बळ या बुद्धभूमीत नर्मदेला मिळते.

वंदना महाजन यांची कथा स्त्रीचे कुटुंबांतर्गत होणारे  शोषण आणि संसारापासून परात्म होणारी अस्वस्थता कोंडी व्यक्त करते. अजंठ्याच्या बुद्धलेण्यांमधील कलात्मकता आणि बुद्ध शिकवणूकीतील प्रज्ञा आणि करुणा ही शिकवण यांमुळे नर्मदेच्या मनाला शांतता लाभते.

**स्त्रीवादी दृष्टीकोनातून कथांचे विश्लेषण करताना आढळणारे काही ठळक मुद्दे :**

- लग्न या व्यवस्थेविषयी या कथासंग्रहात विविध पातळीवर चर्चा घडते. लग्नसंस्था ही स्त्रीकडे वासना, प्रजनन याच उपयोगिता मूल्याने पाहते. आए कुछ अब्र.. कथेतील वडील मुला-लेकरांसमोर आईला 'भाकड बकरी' म्हणतात, लग्न न जुळणाऱ्या लेकीला 'पेल्विक मसल्स जून झाल्यावर काय उपयोग' असा प्रश्न विचारतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व कुटुंबप्रमुखाची अधिसत्ता दर्शवते. माझ्या जन्माची गोष्ट मधील आजीचे आजोबा आपल्या सुंदर बायकोला नजरबंदीतच ठेवतात. एकापाठोपाठ लादली जाणारी बाळंतपणे बाईवर लादून तिला संसाराच्या तुरुंगात बंदिस्त केले जाते. बाळंतपणात प्रसववेणांपासून अनभिज्ञ राहणारी पुरुषप्रधान परंपराही गृहिणीला दिले जाणारे गुलामपण व्यक्त करते. लग्न संस्था ही माणसांच्या लैंगिक, भावनिक गरजा भागवण्यासाठीची समाजमान्य चौकट आहे. पण या चौकटीत बाई बंदीवान होते. संसार, मुलांचे संगोपन अशा जबाबदाऱ्या तिच्या एकटीवरच येऊन पडत असल्याने एक प्रकारे ती या संसारापासून परात्म होते 'निर्वाणाची स्वगते'कथेतील. नर्मदेच्या ठिकाणी ही परात्मता आपल्याला  ठळक दिसते. आधुनिक स्त्रीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कथेतील स्त्रिया लग्न संबंधात एका 'सहमानवाचा सहवास' अपेक्षितात. सुटेगिराण, आए कुछ अब्र ...' या कथांमधून ही अपेक्षा व्यक्त होते. तशी स्वप्नवत शक्यताही निवेदक सूचित करते. ऐतिहासिक काळापासून चालत आलेली कुटुंबातील स्त्रीची वंचितता आणि दडपणूक संपेल, तिला स्वतंत्र मानवी दर्जा मिळेल तेव्हाच स्त्री-पुरुषांमध्ये सहमानवाचे  नातेसंबंध निर्माण होऊ शकेल. 'दुष्काळ' कथेतील नवविवाहिता घरातील लैंगिक वर्चस्वाच्या राजकारणाला प्रत्युत्तर देणे सवयीचे करून घेणे आणि बदलाची वाट पाहणे किंवा अशक्य वाटल्यास लग्नसंबंधाची गाठ सोडणे असा मार्ग निवडते. बदलासाठी ती कृतिशील झालेली दिसते. अशी लग्न व्यवस्थेची चिकित्साच या कथासंग्रहात घडते.

- स्त्रीची संसारातील भूमिका वेठबिगारी किंवा उपभोग्य वस्तू मूल्याने कशी ठरते हे वास्तव निर्वाणाची स्वगते, महिषासूरमर्दिनी या कथांमधून ठळकपणे व्यक्त होते. नर्मदा किंवा सती दोघींनाही स्वत:विषयी, संसाराविषयी परात्मता निर्माण झालेली दिसते नर्मदा आपल्या परीने मुक्तीचा शोध घेते. सतीच्या आयुष्यात अपघाताने स्वातंत्र्य येते.

- विविध स्तरातील स्त्री जीवनवास्तव या कथासंग्रहातून साकार झाले आहे. विवाहित - अविवाहित असा सामाजिक दर्जा बाळगणाऱ्या या स्त्रिया ग्रामीण-शहरी अशा दोन्ही स्तरातल्या आहेत. या कथांमधील स्त्रिया नोकरदार वर्गातल्या, घरगुती व्यवसाय

करणाऱ्या असंघटीत कामगार वर्गातल्या किंवा सेक्स वर्कर स्त्रिया आहेत. सामाजिक उत्पादन संबंधात सहभागी असूनही त्यांना आपल्याबाबत बाळगला जाणारा दुय्यम भाव समजतो. सेक्स वर्कर असणाऱ्या आशा, अनुसया यांना आपल्या आर्थिक, सामाजिक शोषणाला कारणीभूत असलेल्या. भांडवलदारी पुरुषप्रधान व्यवस्था किंवा अगदी कल्याणकारी शासनव्यवस्था सुद्धा आपल्याला या नरकात ढकलण्यास कारणीभूत आहेत याविषयी जागरूकता निर्माण झालेली दिसते. या स्त्रिया राजकीय भूमिका घेऊन संघर्षाला उतरत नसल्या तरी त्यांना आलेले भान हे मूल्यात्मक आहे.

याच संदर्भाने प्रिया तेंडूलकर यांच्या कथेतील निवेदिता पुरुषी राजकारणाला शह देताना बाईपण, संसार, सदा वाघमारेची विधवा बायको यांचा साधनात्मक उपयोग करून जो राजकीय सत्ताबदलाचा खेळ मांडते किंवा डाव उलटवते ते आश्चर्यचकित करणारे ठरते. पुरुषी वर्चस्व असणाऱ्या राजकारणाच्या खेळात समाजरचित संकल्पनांचाच आधार घेत खेळी खेळणारी निवेदिता "राजकारण हे बाईचे क्षेत्र नाही." या पारंपारिक समजुतीला शह देते.

- मातृरुपात साकार होणारी स्त्री ही समाजरचित आहे की पारंपरिक चौकट मोडणारी याचे विश्लेषण या कथासंग्रहातील कथांच्या आधारे करता येईल. या प्रत्येक आईला भोगाव्या लागलेल्या दडपशाहीतून आपले एक सुटकेचे किंवा सामोरे जाण्याचे शास्त्र तयार झाले आहे. जे त्या आपल्या लेकीला सांगत असतात. आये कुछ अब्र... मधली 'अम्मी' आणि खेळ मांडीयेला मधील 'माई' दुष्काळ मधली आई, सुटे गिराण मधील आई या पुरुषप्रधान व्यवस्थेला झेलणाऱ्या स्त्रिया आपल्या मुलींसोबत जो संवाद साधतात त्यात त्यांची परिस्थिती शरणता आहेच. आपल्या मुलींनी लग्न करावेच असं त्यांना वाटते. लग्न का करावे तर शरीराच्या सुखासाठी असे अम्मीला वाटते. निवेदिताची माई तिला नेहमी म्हणायची , "..जरा बाई सारखं वागायला शिका. नाहीतर आयुष्यभर रडायची पाळी येईल. "सुमीची आई "पाठची बहीण ना ती ? तीच आता तुझ्या सुखदु:खाला म्हणते." जी कुंदा सुमीला उंची नाही म्हणून तिला नकार देणाऱ्या मुलासोबत लग्न करून जाते तिचा आधार घ्यायला सांगणारी आई बाईचे अवलंबून राहणे सुचवते. 'आईच्या नावाने..' या प्रज्ञा पवार यांच्या कथेतील आई श्यामच्या आईची जीवनविषयक मूल्यात्मक जाणीव रुजवते. पण तितकीच एका अपारंपरिक आईची प्रतिमा उभी करते.
- या कथासंग्रहातील कथांमधून स्त्री आणि लैंगिकतेची जाणीव, पावित्र्य-पाप-योनिशुचिता याविषयीची अभिव्यक्ती आलेली दिसते. 'आये कुछ अब्र...' कथेतील नायिका एकटी राहते तेव्हा समाजाला ती परिपूर्ण अशी सामाजिक व्यक्ती वाटत नाही. कन्नमवार सारखे लोक तिच्यासमोर जे प्रस्ताव ठेवतात. त्यावरून एकट्या बाईचे अवमूल्यन ठळक होते. लग्न याव्यतिरिक्त इतर मार्गाने शरीर सुख मिळवणे हे तिला पाप वाटते. आपण सुंदर नसल्यामुळे आपल्याला शरीरसुख मिळणार नाही असे आत्मपीडन ती अनुभवते याउलट शिरीन मात्र चौकट मोडणारी स्त्री दिसते. "कसली शुचिता आणि कसलं काय ?....आयुष्य आत्मशोधासाठी आहे. कुणाच्या तरी दावणीला बांधून घेऊन, आरामात चरत आणि वीत राहतात त्या गायी म्हशी. आपला जन्म यासाठीच असावा? नो. आपण प्रयोग करायला हवेत." (पृ.५२ ) शिरीनचे विचार

स्त्रीवादी परिदृष्टीतून आलेले वाटतात. ना पारंपरिक प्रतिमा ना स्त्रीवादी प्रतिमा काय निवडायचे याचा विभ्रम नायिकेच्या मनात दिसतो.

- स्त्रीला नोकरी-व्यवसायामुळे मिळणारे आर्थिक स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य यामुळे व्यक्ती म्हणून समाजात एक अस्तित्व अनुभवणाऱ्या स्त्रिया सती, नर्मदा आहेतच. पण 'आईच्यानावाने..' या कथेतील तिलोत्तमा वर्गीस आणि तिने एकल पालकत्वाने वाढवलेली स्मिता या दोघी स्त्रिया "एकट राहणं हे नैसर्गिक असतं" हे सिद्ध करू शकल्या आहेत. तिलोत्तमा स्मिताकडे लग्नासाठी पाठपुरावा करत असली तरी तिच्या खंबीरवर्तनाने स्मिता एकट राहून मूल दत्तक घेण्याचा विचार करण्यास प्रवृत्त होते.

**आपली प्रगती तपासा :**

१ अभ्यासक्रमाला निवडलेल्या कोणत्याही दोन कथांचा सविस्तर आढावा घ्या.

## ३ब.३ सारांश

एकूण या कथा समाजातील विविध स्तरातील स्त्रियांच्या सामाजिक वास्तव आणि समस्यांना शब्दरूप देतात. विवाह, कुटुंब, सामाजिक संरचना यांची स्त्रीलक्ष्यी चिकित्सा या संग्रहातील कथांमधून घडते..

मुक्तीचा मार्ग कोणता? यांची दिशा दाखवण्यास या कथा मार्गदर्शक ठरल्या आहेत. केवळ कौटुंबिक वातावरण आणि त्या अंतर्गत विषमतानुभव मांडणे अशी या कथासंग्रहातील कथांना मर्यादा पडलेली नाही. विविध स्थल, काल, अवकाशाने या संग्रहातील कथानुभव आशयदृष्ट्या समृद्ध झाला आहे.

munotes.in

## ३ब.४ प्रश्न

**दीर्घउत्तरी प्रश्न .**

१) स्त्रीवादी साहित्याची संकल्पना स्पष्ट करा.

२) तुमच्या अभ्यासक्रमाला असलेल्या उर्मिला पवार यांच्या कथेचा आढावा घ्या.

३) स्त्रीवादी साहित्याची परंपरा केव्हा पासून सुरू झाली विवेचन करा.

४) ' पाऊस आला मोठा ' या कथेचा भावार्थ स्पष्ट करा.

## ३ब.५ संदर्भ

तिचा अवकाश- संपा.डॉ.वंदना महाजन, डॉ.विनोद कुमरे, डॉ.सूर्यकांत आजगावकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.नोव्हे.२०२१

❖❖❖❖

**तृतीय वर्ष कला सत्र - सत्र – VI**

**अभ्यासपत्रिका क्र. ६ भाग २**

**'साहित्य आणि समाज'**

**( विषय कोड : ८६५८५ )**

नमूना प्रश्न पत्रिका गुण – १००

सूचना: १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

१) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत .

२) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न.१. ललित वाड;मय म्हणजे काय? वाड:मयातील सामाजिक जाणिवेचे स्वरूप उलघडून दाखवा. **(२०)**

**किंवा**

१८७४ ते १९२० या काळखंडास मराठी साहित्यात आधुनिक कालखंड म्हणून ओळखले जाते, विवेचन करा.

प्रश्न २. दलित चळवळीचे स्वरूप लिहा. **(२०)**

**किंवा**

'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकातून दलित जाणिवा कशा पद्धतीने व्यक्त झालेल्या आहेत, ते सविस्तर लिहा.

प्रश्न . ३. स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा व स्वरूप सविस्तर स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

स्त्रीवादी साहित्याची परंपरा केव्हा पासून सुरू झाली विवेचन करा.

**किंवा**

प्रश्न ४. तुमच्या अभ्यासक्रमाला असलेल्या उर्मिला पवार यांच्या कथेचा आढावा घ्या. **(२०)**

**किंवा**

**स्त्रीवादी दृष्टीकोनातून कथांचे वाड;मय प्रकाराचे विश्लेषण तुमच्या भाषेत सविस्तर विवेचन करा.**

**प्रश्न ५ खालील प्रत्येक गटातील एकेक टीप लिहा . (२०)**

**अ गट**

१) साहित्य समाज संबंध

किंवा

ललित वाड्मय आणि भाषा

गट ब

१) 'भाई तुम्ही कुठे आहात!' या नाटकाची भाषाशैली

किंवा

स्त्रीवादी साहित्य हे जाणिवेचे साहित्य

❖❖❖❖

munotes.in